REGISTERD NO7, 1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० ७ माहे जून सन १८७४ इ० अंक २३

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १८८ |
| "अखेर | १ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| "दुसरे खेपेस | ०२ |

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयाच्या आहेत. हे औषध खात्रीचे असून यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटी प्रमाणे पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें किंमत ६ सहा आणे.

हें औषध गजकरणाशिवाय खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारे लागू होतें.

### नोटिस.

नोटिस— उत्तमराव दत्ताजी देशमुख मुक्काम अंदुरे तालुके बाळापूर जिल्हा अकोले यांस शोदमल बागमल दुकान पंचगव्हाण तालुके अकोट जिल्हा मजकूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडे दस्तऐवजावरून २०० रुपये येणें त्यापैकीं एक वेळ ५० व एक वेळ ४६ मिळून ९६ रुपये तुह्मी वसूल दिला. बाकी १०४ रुपये मुद्दल शिवाय व्याज घेणें राहिलें आहे. याला तीन वर्षे होत आलीं आहेत. कित्येक वेळां मागणें केलें तुह्मी देऊ देऊ ह्मणाला पण आजवर रकम दिली नाहीं ह्मणून हल्लीं तुह्मास मुद्दाम ही नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत सदहू १०४ रुपये मुद्दल व व्याज आमचे दुकानीं आणून पावते करावे व या नोटिशीचा खर्च द्यावा. या प्रमाणें तुह्मी न केल्यास तुह्मावर दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासुद्धां सर्व रकम भरून घेऊ. कळावे तारीख २ माहे जून सन १८७४ इसवी.

(सही) शोदमल बागमल
दस्तुर गणेश

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असे समजूं नये.

मूर्तिजापुर, ता० १ जून सन १८७४ इ.
रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि० वि० पुष्कळ दिवसांपासून लायब्ररी होत आहे ह्मणून गावकरी चातका प्रमाणें वाट पहात होते त्याप्रमाणें ईश्वर कृपेकरून आज तारखेस येथें लहानशी लायब्ररी सुरूं झाली. ह्या लायब्ररीचे स्थापनेचे कामीं तहशिलदार मि० मुबारकअली व नायबतहशिलदार रा० जीवनराव नरसिंह यांणीं परोपरी श्रम केले. अजून लोकांस अशा स्तुत्य कामाचा काय उपयोग हें समजूं लागलें नाहीं, सबब अशा स्थितींत लोकांचीं मनें या कामाकडे सहज रीत्या वळतील असें नाहीं. पुष्कळ पाटिल पांडे यांणीं लक्ष दिलें पाहिजे. व आपापल्या शक्त्येनुसार रुपया, आठआणे लायब्ररीस बक्षिशीदाखल दिलेही. तहशिलदारानीं फुकट जागा दिली शिवाय दोन तीन वर्तमानपत्रें लायब्ररीस देण्याचें कबूल करून दरमहा १ रुपया वर्गणीही देण्याचें कबूल केलें आहे. लायब्ररीचा बहुतेक बोजा तहशिलदारानीं खुद्द आपल्या अंगावर घेतला आहे ह्मणून या बाईचा आज जन्मोत्साह झाला. आतां या ह्यानेजिंग कमिटींत ग्रामस्थ सभ्य सावकार मेंबर आहेत आणि त्यांणीं मनावर घेऊन लटपट केल्यास येथील लायब्ररी थोड्या काळांत उत्तम स्थितींत पोंचेल यांत संशय नाहीं.

हल्लीं नऊ वर्तमानपत्रें लायब्ररींत येतात पैकीं एक अगदी इंग्रजी, एक उर्दु व बाकीचीं मराठी आहेत. अजून पुस्तकें वगैरेविषयीं तजवीज झाली नाहीं; पण बाहेरून कोणी उदार गृहस्थानीं पुस्तकें किंवा लायब्ररीकरितां सामान वगैरे पाठविल्यास त्यांचे उपकार होतील.

येथें घाशीराम गुलाबराय ह्मणून सावकार आहेत. यांचें परोपकाराकडे चित्त विशेष आहे हें लक्षांत आणून सरकारानें यांचेवरची ५० रु० पोलिसपट्टी कमी केली. यांणीं धर्मार्थ दोन धर्मशाळा व जनावरांस अहोरात्र पाणी पिण्याकरितां एक हौद बांधिला आहे. शिवाय ब्राह्मणभोजन वगैरे धर्मपर करितातच. हे गृहस्थ ह्यानेजिंग कमिटींत आहेत ह्मणून आह्मास मोठी उमेद आहे कीं तहशिलदारानीं लावलेल्या लहानशा झाडास मोठमोठे पल्लव फुटतील यांत संशय नाहीं. कारण यांचे मनांत जरा आलें ह्मणजे ते एक दम पुढें सत्वोदित चालेल असे करतील असा त्यांचा स्वभावच आहे. यांस अपुरे काम आवडत नाहीं. विशेष माहिती मिळाल्यास मागाहून लिहीन कळावे लोभ असावा ही विनंती.

आपला एक बातमीदार.

वाशिम ता० २९ माहे मे १८७४
रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि० वि० आलिकडे उष्णता बरीच वाटूं लागली आहे. सकाळचे ७ वाजल्यापासून संध्याकाळ होईपावेतों घरांतून बाहेर निघवत नाहीं.

मेहेरबान डिपुटी कमिशनर साहेब यांची स्वारी पुसद तालुक्यांतून येथें येऊन पुन्हा रिसवडाकडे निघून गेली.

मे० अबदुल हक साहेब येथील एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर हे १० दिवसांचे किरकोळ रजेवर नगराकडे गेले आहेत. येत्या सोमवार पावेतों परत येतील.

येथील बाळकृष्ण ह्मणून एक पोष्टाचा शिपाई आहे त्यावर खटला चालून त्याजला ५० रुपये दंड जहाला, पत्रें वाटण्यांत अव्यवस्था हेंच मुख्य कारण त्याजवर खटला होण्याचे असावे.

येथे एका गृहस्थानें खाजगी पत्रावर सरकारी तिकिटें लाविलीं. त्याजवर हल्लीं खटला चालू आहे. निकाल काय होतो तें पाहवे.

मे० ह्याकफरसन साहेब पोष्टाचे अधिकारी हे रिसवडाकडे निघोन गेल्याचे ऐकतो.

पुसद तालुक्यांत एक मनुष्याचा खून झाला. त्याजविषयीं सविस्तर हकिकत मागाहून कळल्यावर लिहूं.

येथील देवपेठेंतील शाळेकरितां नवीन इमारत बांधण्याचें काम सुरू आहे व बहुतेक संपतही आलें आहे.

रोहिले लोक इकडे येणार ह्मणून गावांत मोठीच हूल उठली आहे. परंतु त्यांत फारसा तथ्यांश असेलसें वाटत नाहीं याचप्रमाणें सुमारे च्यार महिन्याचे पूर्वी गावांत मोठा गवगवा झाला होता.

येथें एके गृहस्थाचे घरीं तारीख २४ रोजीं रात्री चोरी झाली. रोख व डागदागिने मिळून सुमारें १५०० रुपयांचा ऐवज गेला असे ऐकण्यांत आहे. चोराचा अद्याप पत्ता लागला नाहीं. सदरहू रात्रीस त्या घरांत घरचे पैकीं कोणीच नव्हते.

डेप्युटी एजुकेशनल इन्स्पेक्टरचे आफिस ता० ४ मे पासून डे० कमिशनर कचेरींत गेलें. कळावे हे विनंती.

आपला मित्र
"लोकहितेच्छु"

## पिशाचमोचन क्षेत्र.

रा० प्र० क० यांस—

वि.वि.महाराज, मी फिरत फिरत श्री क्षेत्र संवदे येथें आलो व येथील जे चमत्कार माझे पाहण्यांत आले आहेत ते आपल्या वाचकांकरितां येथें लिहितो. प्रथम या क्षेत्राची थोडी बहुत माहिती सांगून नंतर या क्षेत्राचा मूळचा स्तुत्य उद्देशही सांगितला पाहिजे. हें क्षेत्र पुण्यापासून सुमारें ५० कोश आहे. रेल्वे मार्गानें गेले ह्मणजे मेजरवे स्टेशनावर उतरले पाहिजे. तेथपासून सुमारें तीन कोश पुढें ते राहते. या स्टेशनाजवळ एक उतारू लोकांकरितां धर्मशाळा आहे, पण तिची स्थिति फारच वाईट आहे. ह्मणजे तींत वीत वीत लब्ज ग पडलेले असून शिवाय केरून फुपाटा यांची बरीच समृद्धी असते.

श्री क्षेत्र संवदे हें फार लहान असून येथें ब्राह्मणाची वस्ती अगदीं कमी आहे. येथें श्रीबाळनाथ देव आहे व श्री मनोहर स्वामि यांची येथे समाधि आहे. हे महान भक्त होऊन गेले. यांचें येथें देवापेक्षाही मोठें महात्म आहे. येथें थोडे वेळां अर्तीं होते. पण अगोदर स्वामी महाराजांची अर्ती झाल्यावांचून देवाची होत नाहीं. अर्तीं धुपार्तीच्या वेळेस पिशाच्चे अंगात येऊन बोलतात. या स्वामी महाराजांची अशी कथा (संवदें महात्मांत) आहे कीं, यांचे वडील सिदोजी यानीं भैरवाची बाति उत्तम भक्ती केली. व त्यांस श्री बाळनाथ प्रसन्न झाले आणि ते त्यांस ह्मणाले कीं, तुला जें कांहीं अपेक्षित असेल तें माग. नंतर सिदोजीच्या पोटीं पुत्र संतान वगैरे कांहीं नसल्याकारणानें त्याणें पुत्र प्राप्तीचा वर मागितला तदनंतर देवानीं सांगितलें कीं, मीच तुझे पोटीं येईन. पुढें कांहीं महिने लोटल्यावर एक दिव्य पुत्ररत्न झालें. व त्याचें नांव मनोहर असें ठेविलें. हा महान भक्त झाला. व त्याला भैरवाचे वरप्रदान झालें कीं, जे यात्रेकरू ऐथें येतील ते तुझे अगोदर पूजन करतील, नंतर माझें करतील. त्याप्रमाणें हल्लीं येथें चालू आहे.

श्री बाळनाथ यांचे अर्ती धुपार्तीच्या वेळेस पिशाच्चे सेवेकऱ्यांचे अंगांत येऊन बोलतात, व त्यास श्री भैरवनाथ दंड मारतात. येथें जे जे सेवेकरी येतात ते पिशाचें वगैरेच्या पीडेपासून मुक्त होऊन मोठ्या आनंदानें परत आपल्या घरीं जातात येथें भैरवास सेवा घातली असतां मनुष्य सर्व पीडेपासून मुक्त होऊन जातो. संवदें येथे सर्प चावून मनुष्य मरत नाहीं इतकेच नव्हे तर जनावर सुद्धां मरत नाहीं. जर कदाचित कोणास सर्पदंश झाला तर लागलीच त्यास देवळांत नेतात व अंगारा तीर्थ त्यास देऊन ढोल वाजवितात. हा येथील मोठा चमत्कार आहे कीं, ढोल अगदी पाण्यांत बुडवून काढल्या प्रमाणें बद बद वाजतो. त्या मनुष्यांचा (अथवा जनावरांचा) सर्प चावलेला उतरतो व ढोल पुनः पूर्ववत खणखणीत वाजूं लागतो !!! भुतें, चेडी, करणी, पिशाचबाधा वगैरे पीडा देवास सेवा घातली असतां जातात व तो मनुष्य पूर्वीप्रमाणें चांगला होतो. श्री बाळनाथाच्या देवालया जवळीकच ज्ञानवापी ह्मणून एक विहीर आहे. हें मोठें तीर्थ आहे. या ज्ञानवापीच्या सभोवतीं तीन वडाचीं झाडें आहेत. यावर सेवेकऱ्यांच्या अंगांतील समंध राहतात. श्री बाळनाथाची अशी कथा आहे कीं, परशुरामानीं द्वादश योजनें समुद्र मागें सारून चितपावन ब्राह्मणांस राहावयास स्थान दिलें. पण त्यांचें ऐहिक पीडेपासून संरक्षण व्हावें ह्मणून परशुराम श्री क्षेत्र वाराणशीस गेले व तेथें जाऊन श्री काळभैरवाचे

स्तुती केली. तेव्हां ते त्यास प्रसन्न होऊन परशुरामाचे ह्मणणें कबूल केलें व हरिहरेश्वरीं येऊन राहिले. हें प्रसिद्ध क्षेत्र असून तेथें मनुष्याच मागील सर्व पीडा दूर होतात हें सर्वांस विदित आहे. नंतर कोणे एके समयीं श्री नारदाची स्वारी फिरत फिरत हरिहरेश्वरीं आली व तेथील सर्व प्रकार पाहून त्यांस अत्यानंद झाला. परंतु महाराष्ट्र जन सर्व पीडा भोगीत आहेत हें त्यांचे लक्षात येऊन त्यांनीं श्रीकाळभैरवाची स्तुती करून त्यास प्रसन्न करून घेतलें व इकडे कोठें तरी येऊन वस्ती करावी ह्मणून त्यांजजवळ मागणें मागितलें. नंतर काळभैरवांनीं श्री क्षेत्र संवदे येथें येऊन वस्ती केली. येथें नग्न बाळरूप धारण करून सेवेकऱ्यांचें संकट दूर करण्याकरतां त्रिशूळ, खगड्, डमरू वगैरे चारी हातांत चार आयुधें घेऊन दक्षिण दिशा अवलोकित उभे राहिले आहेत. येथें पिशाच मोचन, ह्मणून तळें आहे. ह्या ठिकाणीं पिशाच जाऊन गती घेते. हा गांव करमाळ्यापासून तीन कोस आहे. येथील श्री बाळनाथ यांची पूजा गुरवाची आहे, येथें नेहमी सेवेकरी असतात. येथें पिशाच्याचा न्याय होऊन त्यास लवकर गती मिळते. येथें पिशाचे सेवेकऱ्यांच्या अंगांत आली ह्मणजे पाहणारास फारच चमत्कार वाटतो. येथें मागे एका सेवेकऱ्यास गाय लागली होती तेव्हां ती त्याचे अंगांत येई. त्या सेवेकऱ्यास तिनें लागण्याचे कारण असें सांगितलें कीं, तिचा तिचा यजमान जेव्हां जेव्हां वैरण घाली तेव्हां तेव्हां हा तिच्या पुढील काढून आपल्या गाईस घाली तेणेंकरून ही उपाशी मरू लागली. दिवसे दिवस अगदीं कृश होत गेली आणि पुढें काहीं दिवसांनीं ती गाय मेली. व ती अशा दुःखामध्यें मेल्या कारणानें त्यास लागली. पुढें तीस देवानें गती देऊन पिशाच योनींतून मुक्त केलें! अशा चमत्कारिक गोष्टींचा न्याय होतो. असो पत्रविस्तारास्तव पुरे करतो. लोभ असो द्यावा.

श्रीक्षेत्र संवदे, ता० करमाळें जि० सोलापूर. तारीख २६ मे सन १८७४ इ०

एक चमत्कार पाहणार.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य ८ शके १७९६

## कापडाची एक तरी गिरणी वऱ्हाडात अवश्य व्हावी.

हे स्वदेशीय साहू लोक हो, व्यापारी लोक हो, धंदेवाले लोक हो, विद्वान लोक हो, व देशहितेच्छु लोक हो, तुह्मीं हें काम मनावर घ्या. तुह्मा सर्वांच्या ऐक्यानें ही गोष्ट जशी चांगली होईल तशी दुसऱ्या कोणत्याही प्रकारानें होणार नाहीं. कापुस दाबून गठ्ठे बांधण्याच्या गिरण्या परदेशीय लोकांनीं करण्याचे मनावर घेतलें तर ठिकठिकाणीं केल्यां. उमरावतीस दोन च्यार आहेत, खामगावास दोन च्यार आहेत, शिगावास आहे, अकोटास आहे, मूर्तिजापुरास आहे, वढनेऱ्यास आहेच; अहाहा! काय हा त्यांचा उद्योग! व काय हा त्यांचा परक्रम! आमचा कापुस पळवून नेण्यासाठीं ९० लक्ष रुपये खर्चून १०१६ यंत्रें त्यांनीं आमचे देशांत आणून मांडिलीं; परंतु तो वचावून ठेवण्यासाठीं, व त्याचीं वस्त्रें करून देशाची लज्जा राखण्यासाठीं एक देखील कापड विणण्याचे यंत्र आपल्यानें मांडवत नाहीं; अहाहा! काय हा आमचा देशाभिमान! व काय ही आमची कळकळ! देशबांधव हो, दोन आठवड्यापूर्वीं तुह्मांस सांगितलें कीं कापडाचीं यंत्रें देखील जिल्ह्या जिल्ह्याच्या जागीं मांडण्याकरितां विलायतेंत तीस लक्ष रुपये भांडवल जमवून युरोपियन लोकांनी एक कंपनी उभी करण्याचा निश्चय झाला आहे. आणि जर कां ती लवकर येऊन इकडे ठाणीं मांडील तर मग आपल्या व्यापार करण्याला किंवा स्वतंत्र निर्वाहाला कांहीं मार्ग रहाणार नाहीं. गरीब शेतकरी लोक देशाला अन्न निमार्ण करितात आणि युरोपियन व्यापारी हिंदुस्थानाला कापड पुरवितात या प्रमाणें मुख्य अन्न वस्त्राचा निकाल झाला मग इतर धंदे चालणार कसे? शेतकरी लोकांनीं साल मजकुरीं वऱ्हाडांत तीन लाख गठ्ठे कापुस तयार केला व तो तितका विलायतेस गेला ह्मणले ही बेरीज सुमार तीन कोटीच्या जवळजवळ झाली. इतका माल आपले देशांत पैदा होऊन त्याचीं वस्त्रें न होतां तो कच्चाच्या कच्चा बाहेर देशीं जावा यांत आपले देशाला मोठी नादानी आहे. ही गोष्ट अजून आपले लक्षांत येत नाहीं याला काय ह्मणावे? प्रतिवर्षीं तीन कोटीचा कापुस जाणे ही केवढी मोठी रकम झाली! त्याचे कापसाचे सर्व कापड इकडे तयार झालें तर ते किती कोटीचें होईल? त्यावर किती मनुष्यांचा कसा उत्तम रीतीनें निर्वाह चालेल! मजुरांस अन्न मिळेल, कारागिरांस उद्योग मिळेल, शेतकऱ्यास नवी उमेद येईल, धनिकांच्या पैशाची वृध्दी होईल व देशाचे भाग्य वाढेल. जर कापडाच्या गिरण्यांसारखे मोठाले कारखाने देशांत झाले नाहींत तर देशाचें भांडवल वाढणार नाहीं. या साठीं जे तीन कोटि रुपये कापसाच्या मोलाचे देशांत आले ते कोठें एके ठिकाणीं जमले काय? नाहीं. त्यांचा खुर्दा होऊन सांदी कोपऱ्यांतून पडला असेल तो व्यर्थच समजावयाचा. पांचपन्नास लाकडें वेगवेगळीं पडलेलीं असलीं तर तीं व्यर्थ कुजून जातात पण तीच सुतारानें व्यवस्थित रीतीनें लाविलीं तर त्याची सुंदर इमारत होते व तीपासून बहुतांस उपयोग होतो. द्रव्याची गोष्ट अशीच आहे व याविषयीं आम्ही विशेष कथन करावे असे नाहीं. आपणाला सर्व कळतें आहे; पण आपलें औदासिन्य व आळस आपणाला उठूं देत नाहींत याला काय करावे? महाराज उठा, जागृत व्हा, आसपास नजर फेका, परकियांनीं तुह्मास ग्रासून टाकून कसे निर्माल्य केलें आहे तें विच्यारपूर्वक लक्षांत आणा, अजून वेळ गेली नाहीं. तुह्मी शहाणे आहात, पराक्रमी आहात व चतुर आहात. मनावर घ्याल तर सर्व कराल, पण मित्र हो, आतां काय ते कराच. वेळ जात चालली आहे. अशी शुभशकुनाची संधी वारंवार येणार नाहीं. आह्मी तुह्माला फार सांगत नाहीं. प्रथमतः नमुन्याला आपल्या वऱ्हाडांत मिळून या वर्षीं एक तरी कापडाच्या गिरणीची उभारणी करा. वऱ्हाड प्रांत लहान नाहीं. यांत जिल्हे सहा आहेत, चांगल्या व्यापाराचे गांव दहा बारा आहेत. उत्तम प्रतीचे व्यापारी डोंदशाहून कमी नसतील, मध्यम प्रतीच्यांची संख्या त्याच्या दुप्पट होईल व कित्येक झाकलेले असतील ते प्रसंगानें उजेडांत येतील. या कामाची एकवेळ उभारणी मात्र झाली पाहिजे ह्मणजे [illegible] हीं तेलेन ते अधिक यंत्र उभीं करतील [illegible] प्रथम आरंभास मात्र अडचण आहे. ती कित्येक चांगल्या सावकार लोकांनीं पुढारीपणा घेऊन काढून टाकिली पाहिजे. याजकरितां उमरावतीस व खामगावास साहूलोकांनीं आपले मंडळीची सभा करावी. त्यांत चार विद्वान व वकील लोक यांस बोलवावे. व साहूसाहूमध्यें खानगी काहीं द्वेष असले तर ते बाजूस ठेवावे आणि सारे वऱ्हाडांतील लोक मिळून हें काम उभारावें. एकेक हजार रुपयांचा भाग ठेविला तर पुरे होईल. व भागांची भरती होईल असें आह्मास वाटतें. मुंबईतील शेट गोकुळदास मुरारजी, आनरबल मंगळदास नथुभाई सारखे कित्येक थोर सावकार आपणास या कामीं मदत करितील व माहिती देतील यांत संशय नाहीं. तसेंच वऱ्हाडांतील साधारण लोकही आपली तुटकी फुटकी शंभर रुपयांची पुंजी दहा दहा जण एकत्र करितील तर कित्येक भागाचे ग्राहक होतील. व पहिल्या प्रतीचे सावकार दहा वीस भागही एकेकटे घेतील असा आमचा अजमास आहे. त्यांनीं हे काम करावयाचेंच असें मनावर मात्र घेतलें पाहिजे, ह्मणजे होण्याला अवकाश लागणार नाहीं हे खचीत आहे.

तर सावकार लोक हो, व्यापारी लोक हो, इतर धंदेवाले लोक हो, वकील लोक हो, विद्वान लोक हो, व देशहितेच्छु लोक हो, सदरीं सांगितलेली गोष्ट लवकर मनावर घ्या. प्रसंग फार बिकट आहे. व सरकारचें साह्य तर उत्तमच आहे. तें कसें तें पाहा. सरकारच्या नोकरांनीं व्यापार करूं नये व वकील लोकांनींही व्यापार करूं नये असे नवीन नियम झाले आहेत. नोकऱ्यांची तर चंगळ उडाली आहे. १० वर्षें रक्ताचें पाणी करून व डोकें अधू करून विद्या शिकावी, बी. ए. व्हावे. तर ३६ रुपयाच्या जागेला ते लायक होतील ह्मणतात, ही गोष्ट मुंबई इलाख्याला लागू आहे. मद्रास इलाख्यांत तर पंधरावरही बी. ए. मिळू लागले आहेत तेव्हां प्रसंग कसा आहे तो मनांत आणा. म्याट्रिक्युलेशनची तयारी करून पाच रुपयांची जागा पतकरावी, कीं अक्षरशत्रु राहून रोज दोन आण्याचा हेल मिळवावा यांतून कोणते पतकरावें असा विच्यार करण्याचा प्रसंग आला आहे. स्वदेशीय लोकांचें वर्चस्व व हिताचे मार्ग नष्ट झाले आहेत. ते आतां विवेकानें शोधून काढिले तर तरणोपाय आहे; युरोपियन लोकांच्या कापडाच्या गिरण्या जिल्ह्या जिल्ह्यांतून आल्या ह्मणजे त्यांजवर काम करणारेही तिकडून येतील. रेल्वेकडे नजर करा, ६० रुपयांवरही-अहतक गोरे लोक नोकर मिळतात. तेव्हां या नव्या कारखान्यावर त्यांहून कमी दराचेंही भरती येईल व आपले उद्योग नष्ट होतील. यांच्या गिरण्या झाल्या ह्मणजे आपले कापडाचे माग जे थोडेबहुत आहेत ते देखील नसलेच ह्मणून समजा. व यांतीं आणि कापडकरीही मग तेच होणार. सराफी व सावकारी तर आपली बुडाल्या सारखीच आहे कारण गवर्नमेंटरी, ट्रेझरी नोटी यांचीं दुकाने त्यांच्या मुठीवर आहेत. सच तेव्हां आतां चांगल्या विच्यारानें, ऐक्यानें, व हुशारीनें आह्मी सुचविलेला मार्गांचें अवलंबन केला तर आपलें हित आहे हें सर्वांनीं समजावें व उद्योगास लागावें. बराच विस्तार झाला ह्मणून आतां आह्मी आपली आज रजा घेतो.

## डा० भाऊ दाजीचा मृत्यू.

आह्मांस लिहिण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं मुंबईचे नामांकित गृहस्थ डा. भाऊ दाजी शनिवारीं ३० मे तारखेस रात्रीं मरण पावले. यांचें नाव ज्यांनीं ऐकून सुद्धां माहित नाहीं असे गृहस्थ हिंदुस्थानांत थोडेच असतील. व हिंदुस्थानचा गोष्ट राहो पण यांचे मरणानें युरोप खंडांत व अमेरिका खंडांतही कित्येक लोकांस दुःख झाल्या वाचून रहाणार नाहीं. आमच्या हिंदुस्थानांतील हें एक रत्न हरपलें असें ह्मणण्यास काहीं बाध नाहीं. हे गृहस्थ बाहेर गावाहून लहानपणीं गरीब स्थितींत मुंबईस गेले व तेथें आपले उद्योगानें, विद्येनें, व पराक्रमानें ते पूर्ण वैभवास चढले. ह्मणजे ते सरकारचे नोकर नसतां स्वतंत्रतेनें वागून त्यांनीं इतका पैसा मिळविला कीं त्यांचा खर्च एखाद्या संस्थानिकाप्रमाणें टोलेजंग असे. वैद्यक खात्यांत ते मोठे निष्णात होते व देशहिताच्या कामीं ते मनापासून झटत असत. मुंबई असोशियशन, ईस्ट इंडिया असोसियेशन इत्यादि त्यांच्या श्रमाचीं फळें होत. स्त्रियांच्या विद्याभ्यासावर त्यांचें फार लक्ष्य असे. व कित्येक उदार मंडळींनीं एक मुलींची शाळा डा० भाऊ दाजी यांच्या नावानें चालू केली आहे व त्यांनीं जमविलेल्या फंडाच्या व्याजांतून तिचा खर्च भागत आहे.

शोधकपणा विषयीं डा० भाऊ दाजी यांची पराकाष्ठा होती. संस्कृत ग्रंथ, प्राचीन लेख, नाणीं, लेणीं, इत्यादिकांविषयीं त्यांनीं माहिती ऐकिली कीं पुरे, त्याच संपादनाचे कामीं त्यांचें मन गढलेच. मग त्यास किती ही श्रम, खर्च, व काळ लागो त्याची ते पर्वा करीत. नसत व त्या त्या

वस्तूंचा संग्रह करीत असत. यांचे कडे दोन तीन शास्त्री पंडित हमेशा नोकर असत. त्याच प्रकारें कामाचे प्रसंगानें इंग्लिश व फ्रेंच लोक देखील नोकर असत. अशा शोधाकरितां त्यांनीं हिंदुस्थानांत एक मोठें परिभ्रमण केलें होतें व त्या शोधाचे संबंधानें आपले अभिप्राय व सिद्धांत छापून प्रसिद्ध केलेले आहेत व त्याकरितां त्यांची मोठी कीर्ति आहे.

या महापुरुषानें आपले शोधानें रक्तपितीवर एक उत्तम व अद्वितीय औषध काढिलें व तें देऊन बहुत रोग्यांस व्याधिमुक्त केलें. त्याबद्दल विलायत सरकारचा आणि त्याचा पत्रव्यवहार होऊन त्या राष्ट्रांतही त्यांची मोठी ख्याति झालेली आहे.

अगदी सामान्य स्थितींत असतां केवळ आपले कर्तबगारीनें इतक्या उच्च स्थितीस चढलेला यां सारखा दुसरा मनुष्य दाखविण्यास आह्मांस आढळत नाहीं. इंदुप्रकाश कर्त्यांनीं यांना भोजराजाची उपमा दिली आहे ती आह्मांस यथायोग्य वाटते. ज्ञानोदय कर्त्यांनीं यांच्या कृत्या विषयीं लिहिलें आहे कीं "यांच्या कृत्याचा लेख जरी या लोकीं नाहीं तरी ईश्वराच्या स्मरणरूप ग्रंथांत असेल यांत संदेह नाहीं. व अशाच दुसऱ्या गोष्टींवरून त्यांची कीर्ति या देशांतच नव्हे पण युरोपांत व अमेरिकेंतही फार पसरली आहे. डेन्मार्क देशांत प्रोफेसर वेस्टरगार्ड व युनैटेड स्टेटस देशांत प्रोफेसर अगासीस यांच्या सारख्यास त्यांचें नाव प्रसिद्ध होतें इतकेंच नाहीं, तर मोठ मोठ्या गोष्टींविषयीं यांचा त्यांचा पत्रव्यवहार होत असे, व कांहीं नवीन ग्रंथ झाला ह्मणजे ते मुद्दाम यांस तो नजर पाठवित असत."

यांची लोकप्रियता फार मोठी होती. सामान्य मनुष्याला हे प्रिय असतील यांत फारसें नवल नाहीं पण मोठाले राजकारणी पुरुषही यांस फार चहात असत. अर्धांग वायूच्या आजारानें दोन वर्षें झालें हे घरांत पडून राहिले तर पुष्कळ लोक त्यांच्या भेटीस हमेशा जात असत. इंदूरचे राजे श्रीमंत तुकोजीराव होळकर मुंबईस गेले होते तर ते डा० भाऊला भेटण्याकरितां मुद्दाम त्यांचे घरीं गेले होते. तसेंच सर बार्टल फ्रियर पुन्हा मुंबईस आले होते व त्यांस भाऊ दाजी आजारी पडल्याची खबर समजली तर ते लागलेच त्यांचे भेटीस गेले होते. गवरनर जनरल साहेबांस वेरूळचीं लेणीं पाहावयाचीं होतीं तर त्यांनीं भाऊ दाजी यांस आपणा बरोबर येण्याविषयीं विनंती केली होती. यावरून त्यांचे सौजन्य व त्याविषयीं लोकांचें अगत्य कसें होतें तें दिसून येतें.

सांवतवाडी प्रांतांत मांजरें या गांवीं भाऊ दाजी यांचा सन १८२३ सालीं जन्म झाला. व ७ वर्षांचे असतां ते मुंबईस आले. त्यांना स्कालरशिप व सोन्याचें पदक मिळालें होतें. तसाच एक उत्तम निबंध लिहिल्याबद्दल त्यांना ६०० रुपये बक्षिस मिळालें होते. भाऊ दाजी थोडे दिवस सब असिस्टंट सर्जन होते. नंतर त्यांनीं नोकरी सोडून स्वतंत्रतेनें वैद्यकी करण्याचा धंदा चालविला. व त्यांत त्यांस चांगलें यश आलें. किती प्रकारच्या विद्यापीठाशीं यांचा संबंध होता हे पुढील यादीवरून कळेल.

डा० भाऊ दाजी हे ग्रांट मेडिकल कालेजाचे ग्राजुएट होते. रायल एशियाटिक सोसैटीचे आनररी मेंबर होते. तिच्या मुंबईशाखेचे उपाध्यक्ष होते. पारिसच्या एशियाटिक सोसैटीचे मेंबर होते. जर्मनी देशाच्या ओरियंटल सोसायटीचे मेंबर होते. अमेरिकेंतील ओरियंटल सोसैटीचे मेम्बर होते. पेन्सिलवनिया प्रांताच्या हिस्टारिकल सोसैटीचे मेम्बर होते. फिलोलाजिकल सोसैटीचे फेलो होते. बंगाल एशियाटिक सोसायटीचे मेम्बर होते. लंडनच्या लिनियन सोसैटीचे फेलो होते. आस्त्रिया देशांतील वियेना प्रदर्शनाचे करिस्पांडिंग मेम्बर होते. मुंबईच्या मेकयानिक व जाग्राफिकल सोसैटीचे मेम्बर होते. युनिव्हर्सिटीचे फेलो व सिंडिक होते. स्टुडंटलिटररी सोसैटीचे अध्यक्ष होते. विक्टोरिया आणि आल्बर्ट म्युझियमचे आनररीसेक्रेटरी होते. नेटिव जनरल लायब्ररीचे अध्यक्ष होते. बाबे असोसिएशनचे उपाध्यक्ष होते. जुविनाइलइंप्रुव्हमेंट लायब्ररीचे पेट्रन होते. व दुसऱ्याही कित्येक सार्वजनिक कामांत ते अनुषंगून होते ह्मणून अशा महापुरुषाचे मरण देशाला अतिशय हानिकारक होय यांत संशय नाहीं; पण ईश्वराच्या इच्छेपुढें कोणाला कोठें जाववत नाहीं!

मरणसमयीं यांचें वय ५१ वर्षांचे होतें. व दीड वर्ष बिछान्यावर पडून यांचे फार हाल झाले ह्मणून त्यातून हे सुटले हे एक बरें झालें असें आतां ह्मटलें पाहिजे. यांना पुत्र किती आहेत ते ठाऊक नाहीं; पण रा० विठ्ठल राव ह्मणून एम एच्या परीक्षेत पास झालेले त्यांचे एक चिरंजीव आह्मांस ठाऊक आहेत व बंधु डा० नारायण दाजीही प्रसिद्धच आहेत ह्मणून त्यांचें नाव त्यांच्या मागें केवळ अगदीं लोपेल असें वाटत नाहीं.

## वऱ्हाड.

रोहिणीचे दोन पाऊस मंगळवारीं व बुधवारीं अकोल्यास बरे पडले. काल सकाळीं कोंकणझडी सारखा तासदीड साधा पाऊस पडत होता. हवा थंड झाली आहे.

—000—

रा० विनायक महादेव गाडगीळ बाळापुरचे नायब तहशिलदार यांबद्दल तहशिलदारांनीं कांहीं रिपोर्ट केल्यावरून त्यांना हुजूर आणिलें आहे. व त्यांचा जबाब वगैरे घेतला. आतां त्यांना दुसरे कोठें नायबी मिळणार किंवा हुजूर कारकून राहणार याचा अजून निकाल झाला नाहीं.

—000—

तहशिलदार कचेरीपासून टेंपलबगीच्याकडे जाणारा मोठा रस्ता खराब झाला आहे त्याचे रिपेरीकरितां मुनसिपल कमिटीनें ४०० रुपये सांक्शन केलें आहे.

—000—

दिवाणी कोर्टें व हायस्कूलें बंद आहेत तीं बुधवारीं १० वे तारखेस सुरू होतील.

—00—

गेल्या आठवड्यांत वाशिमास रोहिले लोक गेले होते त्यांनीं आसपास तर धामधूम केलीच पण शहरांतही पुष्कळ केली. आमच्या एका मित्रानें तेथील त्यांची एक गोष्ट लिहिली आहे कीं तीनआण्यांनीं शेकडा याप्रमाणे त्यांनीं एके ठिकाणीं आंबे ठरविले. व मालक पाहण्याकरितां तिथे इसम आले होते. आल्याबरोबर एकेकानें तीन तीन आंबे खाऊन मालका पाहिला व ५० आंबे घेऊन पाऊणआणा दिला. व मालकानें ही एकेकानें दोन दोन आंबे घेतले. तेव्हां मालकानें विचारिलें कीं हे आंबे तुह्मी कशाकरितां घेतले? ते ह्मणाले "चखी लेने खानेवास्ते लिये" याप्रमाणें रोहिल्यांचा जुलूम चालतो कोणी थोडी तक्रार केली तर पाटीलबुवा त्यास समजूत देतात. व त्याच दिवशीं पाटलानें एके वाण्यास जोडेही मारिले असें ऐकतो. हा बंदोबस्ताचा प्रकार खरा असेल तर मोठा विलक्षण होय. तेथील पोलिस इन्स्पेक्टर मि० खाजे महंमद यांनीं रोहिल्यांच्या गडबडींत आपलें काम फार झटून केलें असें समजतें.

—000—

उमरावती — मि० नागोराव जयकृष्ण अ० काटन कमिशनर हे रजेवरून आले व त्यांणीं आपल्या कामाचा च्यार्जही घेतला.

—000—

खान बहादुर महमद शाहाबुद्दीन अटयाचीडे एक महिन्याचे हक्काचे रजेवर १।२ दिवसांत जाणार आहेत. प्र लि.

—000—

### पत्रें पाठविणारांस.

वाशीम येथील ह० व इलिचपूर येथील वटवाघूळ आणि एक लिहू इच्छिणारा यांचीं पत्रें पोचलीं तीं पुढील अंकांत प्रसिद्ध होतील.

## मागाहून आलेली नोटिस.

रा० राजश्री विष्णु सखाराम बापट डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ धि कोर्ट हल्ली अकोले यांस खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं आपण मला दोन तिऱ्हाइताच्या मतें ७ सात रुपये पगार ठरवून व जाण्या येण्याचा खर्च कबूल करून आचाऱ्याचें काम करण्याकरितां पुण्याहून इकडे आणिलें. पुढें करारा प्रमाणें पगार न देतां तुह्मी मला ६ सहा रुपये प्रमाणें कांहीं महिन्यांचा पगार दिला. असो सध्या उभयतांचा बेबनाव झाला आहे व त्याचें कारण आपण व आह्मांत याकरितां आपणाकडे दोन महिन्याची बाकी १२ रुपये थकली आहे तां व परत जाण्याकारितां ९॥१४ एकूण २१॥१४ नोटिस पोचल्यापासून आठ दिवसांच्या आंत नोटिशीच्या खर्चा सुध्दां देऊन तंटा मिटवावा. नाहीं तर सदरहू बद्दल आपणावर दिवाणी कोर्टांत फिर्याद करण्याची तजविज केली जाईल. कळावे तारीख ६ माहे जून सन १८७४

(सही) गणेश विश्वनाथ खडेकर

यांची निशाणी

**स्वयंपाकाची पळी.**

## वर्तमानसार.

चंद्र लोकावर गोळ्यांत बसून गेलेल्या तीन गृहस्थांपैकीं दोघे वाटेंतच मरण पावून मार्डनसाहेब जाऊन सुखरूप पोचले.

महाराणी साहेबानीं कित्येक गृहस्थांस नवीन स्टार आफ इंडियाचे किताब दिले ते :—

नाइट कमांडर.

आर एच डेविस

कर्नल आर मिड

कर्नल एल पेली.

कंपानियन.

आनरबल अशली ईडन

व्ही. एच. शालक

राजा रामनाथ टागोर

पालनपुरच्या नबाबांनीं अमदाबादचे वकील मि० रणछोडदास कपुरचंद यांस आपले संस्थानांत चिफ जस्टिसचे जागेवर बोलाविलें आहे.

मि० नारायण दाजी जी० जी० एम० सी० यांस ग्रांट मेडिकल कालेजांत बाटनीचे आक्टिंग प्रोफेसर नेमिलें.

रा० सा० विश्वनाथ गोविंद चोळकर यांस जुन्नरास सेकंड क्लास सेकंड ग्रेड सबार्डिनेट जज्ज, रा० सा० विश्वासराव गाडले यांचे जागेवर, नेमिलें व चोळकरांचे संगमेश्वरच्या जागेवर रा० सा० विष्णु मोरेश्वर केळकर यांस नेमिलें.

बंगाल्याकडील दुष्काळपीडित प्रांतांत बराच पाऊस पडला ही आनंदाची गोष्ट होय. मुंबईच्या वर्गणीची एकंदर रकम २२०६१८ रुपये झाली; व विलायतेहून ११ लक्ष रुपये आले. सरकारांतून ज्यांचें सर्वोपरी किंवा अंशतः पोषण होत आहे अशा विपत्तिग्रस्तांची संख्या २९ लक्ष आहे असे समजतें.

हैद्राबाद स्टेट रेल्वेचे काम सिकंदराबादे पर्यंत पुरें झालें. मधील स्टेशनें राहिलीं आहेत तीं होण्यास सुमार तीन महिने लागतील. व नोवेंबरचे पहिले तारखेस सदहू रस्त्यावरून आगगाडी जाण्याची सुरवात होईल व त्या समारंभास आपले गवरनर जनरल लार्ड नार्थब्रुक साहेबही कदाचित तेथें जातील असें अर्धे मुर्धे समजलें आहे

दार्जीलिंगकडे चहाची लागवड चांगल्या स्थितींत आहे.

शाहागंज येथ रेशिमाची लागवड चांगल्या स्थितींत आहे.

गायकवाड सरकार नवसरीस आपली राजधानीची जागा करणार.

नागपुरापासून छत्तिसगडापर्यंत सरकारी रेल्वे करण्याचा विचार चालू आहे. लहान प्रमाणाची रेल्वे करण्यास ६३ लक्ष रुपयांचें सांगिशन मागितलें होतें ते विलायत सरकारानें त्या रेल्वेपासून बरोबर फायदा आहे असे दाखविल्यानंतर देण्याचें कबूल केलें होतें त्याप्रमाणें चीफ कमिशनर साहेबांनीं फायद्याचें पत्रक तयार करून पाठविलें आहे. व दरसाल साडे तीन लक्ष रुपये फायदा होईल असें त्यांत लिहिलें आहे.

शिंद्यांनीं लखनौस जाऊन एका मुसलमानाचे घरांतून एक स्त्री तिचे इच्छाविरुद्ध बाहेर काढून आणिली; ती प्रथम यांजपाशीं होती असें ह्मणतात पण या वेळीं तिनें लग्न केलेलें होतें. गवरनर जनरल साहेबांस ही गोष्ट समजून फार वाईट वाटलें. शिंद्यांनीं तिच्या नवऱ्याची क्षमा मागितली पण तितक्यानें त्याला समाधान झालें नाहीं. तेथील चिफ कमिशनर साहेबांनीं एकदम शिंद्यास परत जाण्यास सांगितलें व त्याप्रमाणें ते निघून गेले. लखनौस आले तेव्हांही ते गुपचुप आले होते. राजे लोकांचा जाण्या येण्याचा पाठ असा नसतो.

मुंबई एथील प्रसिद्ध गृहस्थ रामचंद्र लक्ष्मणजी, भाऊरसुल यांचे चिरंजीव यांस मागच्या आदितवारीं देवाज्ञा झाली. लक्ष्मण हरिचंद्रजी अथवा भाऊरसुल यांच्या मरणा नंतर, रामचंद्र लक्ष्मणजी यांणीं, भाऊरसुल धक्का सरकारास विकला व त्या बदल सरकारानें १,२०,००० रुपयांचें वंशपरंपरा वेतन करून दिलें आहे. शिवाय मुंबई बाहेरही यांचे मोठें इस्टेट आहे.

ता० २२ माहे मजकूर रोजीं कर्नल ला यांणी नवानगरचे जामसाहेब यांस भोजनास बोलाविलें होतें. भोजन एका तंबूंत झालें परंतु टेबलें वेगळीं असून तीं दूर पाडलीं होतीं व मध्ये गादीची हद केली होती. अन्नसामग्री ला साहेबानें दिली होती तथापि स्वयंपाक जामसाहेबांच्या आचाऱ्यांनीं केला होता. नेटिव लोक हातानें जेवतात परंतु यासमयीं साहेबलोकाप्रमाणें जामसाहेब सुरी काटा घेऊन जेवले.

मुंबईंतील प्रसिद्ध गृहस्थ मि० रस्तमजी जार्देसर वाडिया यांचे चिरंजीव मि० [illegible]टजी रस्तमजी यांची सिविलसर्विसची परीक्षा उतरली.

अयोध्या प्रांतात हरदुर्द एथील एका चांभाराची पांचवर्षांची मुलगी गरोदर आहे.

कर्जाच्या रुपयांकरितां कैदेची शिक्षा देऊं नये, असा रशियाच्या सरकारानें तारिख २९ माहे एप्रिल रोजीं ठराव केला. हा दिवस रशियाच्या बादशाहाचा जन्मदिवस होता. ने. ओ.

आसाम प्रांतांत कित्येक पेट्रोलियम नामक तेलाचे झरे आहेत. त्यांपासून सुमारे दर दिवस ६०० ग्यालन तेल मिळतें. मधून मधून केव्हां केव्हां त्यांतून पाणीही वाहूं लागतें.

महाराणी विक्टोरिया यांचे द्वितीय चिरंजीव ड्यूक आफ एडिंबरो हे ऐर्लंड देशाचे कायमचे व्हाईसराय होणार असे सिविल व मिलिटरी ग्याझेट वरून समजते. यांचा वार्षिक पगार १० लाख रुपये ठरविला आहे. सु. प.

रा० रा० श्रीधर विठ्ठल दाते यांस २०० रुपये दंड व एक महिन्याची साधी कैद झाली होती. व दाते यांणी अपील जिल्हा जज्जाकडे केलें होतें. त्याची चौकशी होऊन सदहूं शिक्षा कमी झाली.:— यांस पुन: दोन वर्षांची सक्त मजुरीची कैद आणि १००० रुपये दंड या प्रमाणें झालेली शिक्षा कायम होऊन ते तारिख २५ रोजीं धुळ्याचे जेलांत दाखल झाले. दाते यास एकंदर ४ वर्षें कैद व २००० रुपये दंड. ही शिक्षा तर कायम झाली. एकूण तीन खटल्याचा निकाल झाला. आणीक खटल्याची प्रेषी बरीच शिल्लक आहे असे कळते. अलीकडे यांचे मूळचे प्रकृतींत फरक पडून कांहीं पित्तवायूचा विकार झाल्याचे कळत आहे. खा. वै,

---

## बंगालचा दुष्काळ.

( उमरावतीच्या वक्तृत्वोत्तेजक सभेपुढें रा० [illegible] बाळकृष्ण देव यांनीं केलेलें भाषण )

(मागिल अंकावरून पुढे चालू )

आतां मित्रहो मी तुम्हांस आतांच कळविलें कीं आपल्या देशबांधवां पैकीं वीस लक्ष मानवीप्राणी ह्या दुर्धरप्रसंगानें अन्नरहित झाले आहेत. आतां इतक्या माणसांस दुष्काळ दिवस अन्न पुरवावें कसें, व तें पुरवावें कोणी ह्या विषयीं श्रोत्यांचे अंत:करणांत आशंका साहजीकच उद्भवणार आहे. आतां या प्रसंगीं आनंदाची गोष्ट इतकीच कीं आपल्या दयाळू सरकारानें अन्नाचा पुरवठा बराच केला आहे व यथाशक्ती करीतही आहे. दुष्काळ निवारणार्थ सरकारानें जी सार्वजनिक कामें सुरू केलीं आहेत तीं सारीं मिळून सरकारास आजपावेतों च्यार कोटि रुपयांचा खर्च आला असेल व आणखी दुष्काळ येईल. सुमारे सात लक्ष अन्नेच्छु माणसे ह्या सार्वजनिक कामावर खपत आहेत. तिरहुत येथें कामावर येणारांची संख्या दहा दिवसांत वीस हजारांपासून तों एक लक्ष दहा हजारांपर्यंत वाढली व अशीच दिवसानुदिवस वाढत आहे आणि निभाव तर बरेच महिने लागला पाहिजे तेव्हां कसें होईल तें परमेश्वर जाणे.

आतां ह्या प्रसंगीं संतोषाची गोष्ट इतकीच समजली पाहिजे कीं सरकार आपल्या कर्तव्याविषयीं यथाशक्ती जागृत आहे. ओरिसा प्रांतांत दुष्काळ पडला होता त्यावेळीं जसें निद्रिस्थ होते तसे आतां नाहीं त्या दुष्काळाच्या वेळीं आपल्या देशबांधवां पैकीं सुमारे वीस लक्ष मानवी प्राणी ह्या जगास मुकले. हर हर!!! केवढा तो दुर्धर प्रसंग !! त्यावेळीं काय त्या बिचाऱ्यांची अवस्था झाली असेल! इतकें असूनही त्या वेळच्या आपल्या हिंदुस्थानांतील मुख्य अधिकाऱ्यांनीं त्या दु:खपीडित लोकांच्या पोषणाविषयीं बिलकुल काळजी घेतली नाहीं परंतु आपले प्रस्तुतचे गव्हरनर जनरल लार्ड नार्थब्रुक साहेब यांनीं सांप्रत दुष्काळानें पिडलेल्या लोकांचे प्राण वाचविण्याविषयीं फार काळजी बाळगली आहे असें दिसतें. हे मनुष्याच्या सुखाचे केवळ सांगाती असून दु:खाचेही विभागी होण्याचे यांणीं पत्करलें आहे हा परोपकारच समजला पाहिजे, नाहीं तर गोऱ्या कातड्याच्या अहंपणाखालीं आणि रिकाम्या ढोंगाखालीं त्या लोकांची किती भयंकर स्थिति झाली असती ह्याची कल्पना देखील करता येत नाहीं. परदेशी लोक इतके सदय कीं मागच्या दुष्काळाच्या वेळीं परदेशाहून दुष्काळ निवारणार्थ आलेलें द्रव्य देशांत अबादानी आहे अशा प्रकारची व्यर्थ तारीफ सांगून परत करविलें हे जर खरें असेल तर त्या लोकांची आज काय स्थिति असेल बरें! केवळ दुष्काळ पीडित जनांची हळहळ मात्र त्यांच्या माथां बसली असेल. कारण परदेशाहून अशा कामीं येणारे द्रव्य केवळ खऱ्या सत्धर्म हेतूनें व देशबांधवाच्या खऱ्या कळकळीनेच आलें असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण ईश्वरी आशीर्वादाखेरीज आपल्या देशातून त्यास कांहींच अपेक्षित नसतें; नाहीं तर आपले लोकच पहा इंग्लंडांत किंवा अमेरिकेंत दुष्काळ पडला असला आणि तिकडे साह्य केल्यानें आमच्या लोकांस पदव्या, मोठमोठे किताब वगैरे मिळण्याचा संभव असला किंवा एखाद्या मोठ्या अधिकाऱ्याचा स्नेह जडण्याचा संबंध असला तर आमचे लोक सर्वस्व देखील देण्यास कबूल होतील. फार लांब जावयाला नको यंदाच्याच दुष्काळाच्या वेळीं जर आपल्या गवरनर जनरल साहेबांनीं असा एखादा जाहिरनामा ग्याझिटांत प्रसिद्ध केला असता कीं, जे लोक ह्या प्रसंगीं साह्य देतील त्यांस मोठमोठाले किताब, पदव्या दिल्या जातील असा जाहिरनामा प्रसिद्ध होण्याचाच उशीर कीं आपले होळकर सरकार आपल्या वर्गणीच्या आकड्यावर दोन च्यार पूज्यें ज्यास्त टाकतील तसेच सिंदे सरकार हेही आपला वर्गणीचा आकडा चढवतीलच. आतां राहिले गाईकवाड सरकार तेथें तर सर्वच विलक्षण खबुतरांचीं लग्ने करण्यांत लाखो रुपये खर्च होतात मग असा पदव्या मिळण्याचा अलभ्य लाभ ते टाळते काय? छे कधींही नाहीं. ह्या विलासी राजे साहेबांनीं तर थैल्याच्या थैल्या अर्पण केल्या असत्या. सांगलीकर वगैरे छोट्या सरकारांनी देखील केवळ पदव्या मिळण्याकरितां बराच पैसा ह्या कामीं ओतला असता परंतु आतां ह्या सर्वांस खऱ्या सत्धर्म हेतूनें साह्य देण्याविषयीं प्रार्थना जरी केली, मोठ्या कामगारांचे वजन भरीस घातले तरी काटकसर करून थोडी रकम देखील यादीवर पडण्याची मारामार पडते. शिव शिव !! काय ही आमच्या लोकांची दशा? परदेशवासी लोकांनीं आह्मास सर्वच कामांत लाजीं पहाण्यास लावावे असेच आमच्या नशीबीं आलें आहे काय? आपल्या देशांतील लोकांवर जो भयंकर दुष्काळ गुजरला असतां त्याचा देखील कळवळा प्रथमत: त्यांनांच असावा ना? आपल्या देशांतील दु:खित लोकांस साहाय्य करण्याकरितां देखील फंड जमविण्याचे प्रथमत: यांणींच मनावर घ्यावें ना? पहा वेस्ट मिनिस्टर येथें विलायतेंत आपल्या देशांतील दुष्काळपीडित लोकांत साह्य करण्याकरितां एक सभा भरली होती तींत प्रथमतां यांनीं आपल्या देशांतील लोकांस साह्य करण्याचें मनांत आणिलें होतें परंतु तेथें एक शहाणे सभासद पुढें आले आणि पांडित्य करूं लागले कीं, आपण बंगाल्यांतील दुष्काळपीडित लोकांस साह्य करण्याविषयीं मनांत आणणें हा केवळ अन्याय होय, कारण जर हिंदुस्थानांतील लोक जे बंगाल्यास इतके जवळ आहेत कीं, चार दिवसांच्या अंतरावर देखील पुरते नाहींत ते जर दुष्काळपीडित लोकांस साह्य करण्याचे बिलकुल मनांत देखील आणित नाहींत तर चार हजार कोसावर दूर रहाणाऱ्या आपल्या लोकांनीं त्यांस सहाय्य करण्याचें मनांत आणणें हे न्याय्य आहे काय? पहा, किती प्रकारें परदेशी लोक आपणास दूषणें देतात तर बांधवहो, जर तुह्मास आपल्या देशाचा कांहीं अभिमान असेल, आपणास परदेशीलोक नेहमीं खालीं पहाण्यास लावितात याची कांहीं चाड असेल तर आपल्या नावाचा हा कलंक दूर करण्यास लवकर प्रवृत्त व्हा. असतु. प्रस्तुतच्या प्रसंगीं आपले गव्हरनर जनरल साहेब ज्याअर्थीं ह्या कामीं मनोभावें उद्युक्त झाले आहेत त्याअर्थीं सर्वच लोक यथाशक्ती साह्य करूं लागले आहेत. खुद्द आपल्या महाराणीसाहेबांनीं दहा हजार रुपये दिले. कदाचित कोणी असे ह्मणतील कीं, एवढ्या मोठ्या राणीसाहेब कोट्यावधी प्रजेवर राज्य करणाऱ्या व कोट्यावधी रुपयांचा वसूल घेणाऱ्या असून यांणीं अशा प्रसंगीं दहा हजार रुपया इतकी थोडी रकम द्यावी हे आश्चर्य नव्हे काय? तसेच कोणी असें ह्मणतील कीं, या प्रसंगीं राणीसाहेबांनीं किती जरी साह्य दिलें असतें तरी राजाचा प्रजेशी जो उचित धर्म त्यापेक्षां ज्यास्त तिनें कांहींच केलें नसतें. तसेच कोणी असेंही ह्मणतील कीं, जो मुलख राणी सरकारास कोट्यावधी प्राण्यांचा रक्तस्राव होऊन प्राप्त झाला, त्या देशांतील लोकांचे प्राण रक्षणार्थ राणी सरकारांनीं वेळ पडली असतां दहा हजार रुपयां इतकी थोडी रकम देणे ह्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं तर असें ह्मणणारास माझे इतकेंच उत्तर आहे कीं, राणीसरकाराकडून आपणास जें संरक्षण प्राप्त होतांहे व त्यांचे आपणावर जे उपकार आहेत त्यावरून पाहिलें तर आपल्या दयाळू महाराणीसाहेबांनीं आज जी दहा हजार रुपयांची रकम दिली ती दहा लक्ष रुपयांच्या ठिकाणीं समजली पाहिजे तसे ह्या प्रसंगीं आपले गव्हरनर जनरल साहेब श्रम घेत असून त्यांत सरकारचा बिलकुल व्यत्यय नाहीं हे तरी आपले भाग्यच समजलें पाहिजे; नाहीं तर पूर्वींच्या दुष्काळाच्या वेळीं तर त्या वेळच्या अधिकाऱ्यांनीं दुष्काळ पडला अशी वार्ता देखील सरकारच्या कानावर घातली नाहीं. बरें स्वतां तरी साह्य द्यावयाचें असतें तर तेंही नाहीं. लोकांचीं मनें वळविलीं नाहींत सारांश चोहोकडून जेव्हां दुष्काळपीडित लोकांस त्या वेळीं बिलकुल आश्रय मिळत नाहींसें वाटलें तेव्हां त्रस्त होऊन ते स्थलांतर करण्यास देखील प्रवृत्त झाले. तसें करूनही त्यांची दुर्दशा व्हावयाची ती झालीच. कित्येकांची क्षुधेनें गात्रें क्षीण होऊन त्यांचे प्राणोत्क्रमण झालें. कित्येकांनीं अभक्ष्य खाऊन मटमटा प्राण दिले. कित्येकांना वनांतील हिंस्र पशूंनीं खाऊन टाकलें अशी जेव्हां दुर्दशा झाली, चोहोकडून चारी पत्रकारांनीं उच्चस्वरें आरोळ्या मारिल्या त्या वेळीं कोठें विलायतेहून सत्यासत्यतेची परिक्षा पहाण्याकरितां विलायतेहून कमिशन आलें होतें परंतु त्या वेळचे हिंदुस्थानचे अधिकारी मिजासी असल्यामुळें त्याचा व्हावा तसा परिणाम झाला नाहीं सांप्रत तसें कांहीं नसून दुष्काळ पीडित जनास अन्न पुरविण्याचीच केवळ सोय झाली आहे असें नाहीं तर ह्या दुष्काळापासून उत्पन्न होणाऱ्या ज्या व्याधी त्या दूर होण्याकरितां जागोजाग वैद्य व औषधालयें ह्यांची स्थापना झाली आहे आतां ईश्वराजवळ आपणा सर्वांची हात जोडून इतकीच प्रार्थना असली पाहिजे कीं ते सर्व सुखी असावे व ह्या [illegible] दुष्काळाचे लौकर निरसन व्हावें ह्मणजे झालें. हा राज्यकर्त्यांच्या संबंधानें या दुष्काळाचा विचार झाला. आतां आपल्या कर्तव्यकर्माच्या संबंधानें विचार करूं.

पुढें चालू

---

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे व. स. छा. छा. प्र. केलें.

REGISTERD NO7, 1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० १४ माहे जून सन १८७४ इ० अंक २४


## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,,अखेर | २ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,,दुसरे खेपेस | ०२ |

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयाच्या आहेत. हे औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं औषध थंड पाण्यात भिजवून गंधाचे उटी प्रमाणे पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ६ सहा आणे.

हे औषध गजकरणाशिवाय खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारे लागू होतें.


## पत्रव्यवहार.

या सदाराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

वाशिम तारीख ३ माहे जून सन १८७४
रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० मी खालीं चार ओळी लिहितो त्यास आपल्या पत्रीं पूर्ववत् जागा द्याल अशी आशा आहे.

येथें रविवारापासून रोहिले लोक आले आहेत. त्यांस गावापासून सुमारें अर्ध्या मैलावर रहाण्यास जागा दिली आहे. या लोकांपैकीं बायका आणि पुरुष यांची ओळख करणें हें मोठें चातुर्याचें काम समजलें पाहिजे. येथें त्यांतील एकाचें लग्न झालें त्याचा समारंभ बरा झाला व वधुवराच्या अंगावर दागिणे बरेच होते असें ऐकले. हे अद्याप येथेंच आहेत.

हे ज्या वेळेस गावांत येतात त्या वेळेस त्यांस कोणताही जिन्नस घेणें झाला तर त्यास मूळ जी किंमत असेल त्याचा बारावा अगर पंधरावा हिस्सा देतात व कधीं कधीं बळजबरीनेही घेऊन जातात. असे झाल्या नंतर एखादा धीट दुकानदार जर असला तर तकार करूं लागतो, मग त्यास ते एक वेळ "चुप बैठो" असें ह्मणतात इतक्यावर जर तो गरीब बिचारा गप बसला तर बरें नाहीं तर त्यास मुष्टीमोदक व चापटपोळ्या यांचे भोजन यथास्थित मिळतें. अशा प्रसंगी पोलिस पैकीं कोणीही जवळ असले तरी त्यांच्या तोंडांतून ब्र निघत नाहीं मग बंदोबस्त करणें तर दूर राहिलें.

कित्येक लोक असें ह्मणतात कीं इंग्लिशाच्या राज्यांत लोकांस अगदीं त्रास होत नाहीं परंतु या आठवड्यांत केवळ सवाई मोगलाई झाली आहे. या प्रमाणें हिंदूनें जर थोडासा दंगा केला असता तर त्यांचा काय परिणाम झाला असता! परंतु जबरदस्ताचा सोटा खांद्यावर या प्रमाणें झालें आहे.

एके दिवशीं या लोकांच्या बायका डि. कमिशनर साहेबांच्या बंगल्यांत शिरल्या होत्या परंतु त्या वेळेसही त्यांस कोणी बोलले नाहीं.

हे बायका पोरांसुद्धां सुमारें १०० आहेत. यांच्या हातून वारंवार अशी क्रूर कर्मे घडून येतात परंतु सरकार तिकडे फारसें लक्ष देत नाहीं, इंग्लिश सरकारास हे शंभर भारी आहेत असे माझ्यानें ह्मणवत नाहीं.

येथील दोन चार दुकानदारांस व कांहीं गरीब लोकांस बरेंच लंबे केलें आहे. व पाटील लोकांस गरीब लोकांचा सूड उगवण्यास हा प्रसंग बरा आहे. या लोकां जवळ बहुतकरून सर्व प्रकारचीं हत्यारें आहेत.

हे लोक आल्यापासून आठवड्याचा बाजार व रोजची गुजरीही बरोबर भरत नाहीं तेणें करून कांहीं घेणें झालें तर मोठी अडचण पडते. ईश्वर करो आणि हे लोक र जावोत.

येथील पोष्टांतून कित्येक महत्वाचीं पत्रें बरोबर पोंहचत नाहींत. अशी दाट आवई उठली आहे. इकडे पोष्टमास्तर जर लक्ष देतील तर फार चांगलें होईल.

आकाश ढगांनीं व्याप्त असतें. व संध्याकाळचे सुमारास पर्जन्य येत असतो एडिटरराव पत्रविस्ताराची क्षमा असावी.

एक वाशिमकर
विद्यार्थी

---

वाशिम ता. माहे जून सन १८७४इ.
रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि० वि० मी मागे पाठविलेल्या ओळीस जागा दिली हें पाहून मला फार समाधान झालें. व पुढें असेंच पाठविण्यास उल्हास आला. आतां ह्या ओळी पाठविल्या आहेत त्या वाशिमच्या माझ्या शेवटच्याच समजल्या पाहिजेत कारण मी दुसरीकडे जाणार आहे.

वाशिमास तीन तलाव आहेत. त्यांत एक वाशिमाच्या दक्षिणेस आहे त्याचें नांव दारिद्रहरण. यांत पूर्वी धूत असत. परंतु त्यास साहेबांनी आल्या प्रमाणेच झालें. वाशिमास जे बंगले झाले ते या तलावाच्या दगडावर झाले, दुसरा तलाव बालाजीच्या देवळा नजीकच आहे. त्यांचे नांव देवतळें हा तलाव फारच चांगल्यारितीनें बांधला आहे. याचें पाणी अगदी हिरवेगार आहे. हें हिरवे पाणी जाण्याकरितां सरकारानें पुष्कळ उपाय केले." या तलावावरील धुणें तर बंद केलें. कोणास तोंड धुऊं देत नाहींत ' परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तिसरा तलाव वायव्य दिशेला गांवापासून जरा लांब आहे. त्याचें नाव पद्मालय. "वत्सगुल्म" हें वाशिमचें पूर्वींचे नांव आहे. या गांवाचें जे वर्णन आहे त्यास वत्सगुल्म ह्मणतात. त्यांत या तलावाविषयीं जे वर्णन केलें आहे त्याविषयीं थोडक्यांत लिहितो. पूर्वी एथें एक राजा आला होता. त्याच्या अंगात कांहीं पूर्व जन्मांतराच्या योगानें किडे पडले होते. तो एथें आल्यावर एका झाडाखालीं उतरला. उन्हाळा दिवस असल्याकारणानें त्याच्या अंगाची फारच तलखी होऊं लागली तेव्हां त्यानें आपल्या चाकरास थोडें पाणी आणावयास सांगितलें. चाकरानें पाण्याकरितां आसपास बराच शोध केला परंतु त्यास कोठेंही सांपडलें नाहीं इतक्यांत तेथें एक गोपद्म ह्मणजे गाईचे पाऊल व त्यांत पाणी आहे असे त्याचे नजरेस पडलें. ते पाणी थोडें हातांत घेऊन आला व त्या राजाच्या तोंडास लाविलें कांहीं वेळानीं त्याच्या तोंडांतील व अंगातील सर्व किडे खालीं पडले व दुसरे दिवशीं त्याला कांहीं बरें वाटूं लागलें. मग त्यानें दररोज ते पाणी अंगाला लावीत जावें. कांहीं दिवसानीं त्याचे अंग सर्व बरें होऊन तो चांगला झाला. नंतर त्यानें त्या ठिकाणीं हा तलाव बांधिला. हल्लीं एथें स्नानाकरितां फार लांबचे लोक येतात मनुष्याचें प्रेत जळाल्यावर जी कांहीं हाडें रहातात तीं याच तलावात टाकितात. परंतु त्याचें अगदी पाणी होऊन जाते. मला या विषयीं फार संशय होता. परंतु तीन वर्षांपूर्वीं जो पाण्याचा दुष्काळ पडला होता त्या वेळेस हा तलाव अगदीं कोरडा पडला होता. यांत एक कुंड आहे त्यांत मात्र पाणी पुष्कळ होतें. त्या वेळेस या तलावात हाडाचा एक तुकडाही माझ्या नजरेस पडला नाहीं. असा या तलावाचा महिमा असून वर सांगितलेल्या तलावांची व्यवस्था या प्रमाणें झाल्यानें सर्व धुण्याचा भडिमार या तलावावर आहे. मुसलमान लोक आपली महिनोगणती न धुतलेलीं व ज्यांत हजारो उवा पडलेल्या अशीं वस्त्रें यांत धुतात तेणेंकरून याचे पाणी असे खराब होऊन गेलें आहे कीं तोंडात घातल्या बरोबर ओकारी येते. तर माझी कमेटीस अशी विनंती आहे कीं त्यांनीं या तलावावरील धुणे बंद करून दुसरे जे दोन तलाव आहेत त्यातून एकांत धुण्याची परवानगी द्यावी. कारण या शिवाय या गावाला धुवण्याची सोय नाहीं. कळावे हे विनंती.

आपला एक
क्ष

---

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि० वि० अहो एडिटरराव जागे व्हा. निजलात काय? चांगले स्वच्छ पौर्णिमेचे चांदणें पडलें आहे तें अवलोकन करा. मी आपला वटवाघूळ स्वप्न सांगण्यास आलो आहे, इकडे अवधान ठेऊन, माझे स्वप्नाचा उलगडा करा. मीं नवाबाच्या वाड्याच्या पडक्या भिंतींत रहाणारा वटवाघूळ आहे, मी निशाचर असल्यामुळें इतर पक्षी माझा द्वेष करितात. तरीं माझे ज्ञातींत मला बराच मान मिळतो. आतां हे आठवाचे दिवस असल्यामुळें मला माझे एके मित्रानें आपले घरी भोजनास बोलाविले भोजन झाल्यावर भानेनाचे परिश्रमानें मला थोडीशी डुलकी आली. इतक्यांत मीं एक चमत्कारिक स्वप्न पाहिलें. मी ज्या पडक्या भिंतींत रहातो तिजपासून बरेच लांब उत्तरेस एक मोठा पडका वाडा पाहिला, त्याचे एके फटींत एक पारव्याचा जोडा होता, त्यांतील पारवी दुसऱ्या एका पारव्यावर फिदा होती. त्याचा इला जोर असल्यानें इनें आपले ज्ञातींत बरीच विटंबना केली, त्याच भिंतीचे खालचे खुराड्यांत एक तरुण लांब दाढीचा न्यायी कोंबडा रहात होता, त्याकडे इनें आपली फिर्याद नेली. कोंबड्यानें पारवीचा रंग रूप पाहून न्याय करण्याचें कबूल केलें. त्यानें पारव्यास बोलावून आणून त्याचा दोष त्यास कळविला, व जर हा दोष खोटा असेल तर तूं आपले वीर्य चोंचींत आणून मला दाखीव असें त्यास सांगितलें. पारव्यानें तें कबूल करून त्याप्रमाणे केलें. ही त्या लांब दाढीच्या कोंबड्याची न्याय करण्याची रीत पाहून मला मोठें हसें आलें, इतक्यांत माझे शेजारी माझा मित्र दुसरा वटवाघूळ बसला होता, त्यानें मला जागे करून हसण्याचें कारण विचारिलें; मात्र मी स्वप्नांत झालेली हकीकत सर्व सांगितली पण त्यास याचें तथ्य समजलें नाहीं. आतां हें स्वप्न चांगलें किंवा वाईट हें एडिटरबुवा तुम्ही सांगाल ह्मणून तशीच भरारी मारून आपणाकडे आलो आहे.

एलिचपुरच्या नवाबाच्या वाड्याच्या पडक्या भिंतींतील
वटवाघूळ.

---

जन्मदरिद्र्यास वैभव प्राप्त झालें असतां अघोर कर्मे घडतात तीं.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. पत्रकर्ते महाराज आपणाकडे खालीं लिहिलेल्या दोन ओळी पाठविल्या आहेत त्यांस जागा द्याल अशी आशा आहे.

जन्मदरिद्र्यास खालीं सांगितलेल्या तीन गोष्टींनीं वैभव प्राप्त होतें. सदाश्रय, बुद्धिकौशल्य (ज्या सदराखालीं विद्या येते) आणि आर्जव अथवा गोडबोलणे झटल्यास चिंता नाहीं. ज्या विद्येच्या योगानें कुविचार जाऊन अंतःकरणामध्यें सुप्रसन्नता होते, जिच्या योगानें योग्यायोग्य गोष्टी कळतात, दुष्ट कर्माचें आचरण न करि

तां सर्वकाळ चांगली कर्मे करण्याचा प्रयत्न कां करावा, निष्पक्षपातानें वर्तन केलें असतां काय होतें, सर्वांवर ममता कशाकरितां करावी, हें ज्याच्या योगानें कळतें अशी विद्या त्यास प्राप्त झाली असतां त्यापासून फारसे अघोर परिणाम होत नाहींत. परंतु अर्धवट शिकल्यास जर कर्मगतीनें मोठा हुद्दा प्राप्त झाला तर फारच भयंकर कर्मे त्यांच्या हातून घडतात. आतां अर्धवट विद्वानास मोठा हुद्दा मिळणें ह्मणजे त्याच्या तर्फे आर्जव व देणाऱ्याच्या तर्फे आश्रय ह्या दोन्ही गोष्टी आल्या. यासकरितां त्यासविषयीं निराळा उल्लेख करण्याची फारशी जरूर नाहीं. आपल्यास द्रव्य तें कसें, त्याचा उपयोग कसा करावा, तें आपल्या कीर्तीत कारणभूत कसें होईल हें त्यास कांहींच ठाऊक नसल्या कारणानें त्याची व्यवस्था काय करूं आणि काय न करूं असें होतें. सर्वांस ठाऊक आहे कीं, मनुष्याला चांगली गोष्ट येण्याला पुष्कळ काळ घालवावा लागून श्रमही पुष्कळ करावे लागतात. परंतु दुर्गुण झटले ह्मणजे हात जोडून पुढें उभे असतात. एक वेळ थोडासा पाय घसरला कीं त्या मनुष्यास ते आपलासा करून टाकितात. आणि आपणास, काय पण सर्व जगास ठाऊक आहे कीं, द्रव्य हें भूल घालणारें सर्व मोहोत्पत्तीचें स्थान होय. विद्यार्थ्याची मति सुगुणावमानिनी होते व दुर्गुणास प्रेमानें आलिंगन देणारी होते. अनाथास छळणें, सेवकजनांस गांजणें, मोठेपणाचा तोरा मिरविणें, दुसऱ्याचें वित्त हरण करणें, परस्त्रियांचा अभिलाष करणें, गांज्या ओढणें, द्यूत खेळणें, इत्यादि अघोर व्यसनामध्यें बेटा गुंग होऊन पडतो व मी काय आज आनंदसमुद्रांत गटंगळ्या खात आहे, मी सुखाच्या शिखरावर चढलों आहे, जगमर्यादेंतील मनुष्यें केवळ माझ्या पादाक्रांत झालीं आहेत, माझ्या नांवाचा जिकडेतिकडे डंका वाजतो आहे, आज मी करीन ती पूर्व दिशा असें त्यास वाटत असतें. इकडे दुर्गुण वृद्धिंगतेस येऊन पापाचा घडा भरत असतोच. त्याच्यावर ज्याजस्तुतीचा वर्षाव चोहोंकडून चालला असतो. हांजी हांजी करणारे ज्याचें थोडें बहुत बरें वाईट करणें त्याच्या स्वाधीन असतें ते त्याच्या अंगावर नाचत असतात. आणि 'सर्व सुखाचे वाटेकरी' या ह्मणीप्रमाणें रात्रंदिवस युक्तिप्रयुक्तीनें आपली प्रीति लावून त्याची मर्जी संपादण्यासाठीं त्याचें वित्त हरण करण्यास झटत असतात. अहंपणा, मदमत्सरादि मदिरांनीं त्याची मति धुंद झालेली असते. कोणीही निःस्पृहतेनें त्याचे दुर्गुण दाखवित नाहींत; आणि एखाद्यानें दैववशात दाखविले असतां त्यास ते रुचत नाहीं. ज्यानें मदिरा प्राशन केलेली असते त्याला ज्याप्रमाणें प्राशनाच्या पूर्वी उच्चारिलेलीं वाक्यें स्मरत नाहींत त्याप्रमाणें दुर्व्यसनरूप मदिरांनीं ज्याचीं इंद्रियें गुंग झालीं आहेत त्याला मी किती योग्यतेचा मनुष्य आहे, मी वर्तन कसें करावें वगैरे चांगल्या गोष्टी समजण्याची स्फूर्ति कोठून होणार? ज्याप्रमाणें दुर्वास ऋषीनीं शकुंतलेला शाप दिला आणि मग दुष्यंत राजा तिला विसरला. त्याप्रमाणें कर्मशापित तो त्याची कितीही कानउघडणी केली तरी कोठून मार्गावर येणार? सर्व आसमंतात असणारे लोक त्याच्या नाशासाठीं उद्युक्त झालेले असतात. अशा प्रकारचे व्यसनी लोक जर मोठमोठ्या हुद्यावर असले तर परोपकार करणें, दुसऱ्याचें कल्याण करणें वगैरे सत्कृत्यें घडण्याचा अभाव असतो. इंग्लंडाहून इकडे मोठमोठ्या हुद्यावर जे गृहस्थ येतात ते कुलीन घराण्यातले असतात आणि सात पिढ्यापासून कुलीन घराणें असल्यावांचून त्यांतील मनुष्यास पार्लमेंट सभेंत बसूं नये असा तेथील कायदा आहे. गव्हर्नर वगैरे अति मोठ्या हुद्यावर लार्ड ह्मणून जे अत्यंत कुलीन लोक असतात त्यांची नेमणूक होते. असो. तुमचा आमचा हा पहिलाच प्रसंग आहे यासकरितां आतां लिहिणें पुरें करितों. पुढील अंकांत आपण कृपा केल्यास या विषयावर आणखी थोडेसें लिहून दुसऱ्या विषयावर लिहिण्याची माझी इच्छा आहे ती पुरविणें आपणाकडे आहे. कळावें ही विनंती.

एक हिंदू इच्छिणारा.

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ वद्य ३० शके १७९६

## उमरावती व खामगाव रेलवे.

ख्रिस्ती लोकांच्या शास्त्रामध्यें असें एक वाक्य आहे कीं "मागा ह्मणजे मिळेल आणि ठोका ह्मणजे उघडेल." व त्याच प्रतीची आपली एक ह्मण आहे कीं "प्रयत्नीं परमेश्वर." या दोहोंचा बहुत गोष्टींत चांगला अनुभव येतो. तसाच या रेलवेच्या कामींही हल्लीं आला. उमरावतीची रेलवे कमी उत्पन्नामुळें गेले पावसाळ्यांत बंद झाली होती तशी या वर्षीही होण्याचा सुमार दिसला ह्मणून तेथील लोक अगोदरपासूनच सावध झाले. व त्यांनीं आपल्या गैरसोयी दाखवून रेलवे बंद न करण्याविषयीं कमिशनर साहेबाकडे अर्ज केले व त्यांनीं ही लोकांची दाद घेऊन रेसिडेंट साहेबास रेलवे बंद न करण्याविषयीं चांगली शिफारस केली व ती त्यांनीं मान्य करून पर्जन्य काळांतही उमरावतीची रेलवे बंद न होतां चालू रहावी असा ठराव केला. लोकांनीं सरकारास असें कळविलें होतें कीं पावसाळ्या दिवसांत कापुस वगैरे मालाचें उत्पन्न कमी होतें ह्मणून रेलवेला फायदा कमी होतो आणि या तोट्याच्या भयानें रेलवे बंद होत असेल तर तो तोटा उतारूंकडून, पार्सलें, व माल यांवरील मोराचे दर वाढवून पुरा करून घ्यावा. वाढवून पाहिजे त्याच्या दीडपट हशील करून रेसिडेंट साहेबांनीं रेलवे चालू ठेवावी. ह्मणजे उमरावतीपासून बडनेऱ्याचें तिकिटें प्रतीचे हशील पहिले दोन आणे पडत होते ते आतां नगरात अर्धेपर्यंत तीन आणे पडेल. हे लोकांस फार नाहीं व यांत लोकांचा बिलकूल तोटा नाहीं. कारण गुदस्त साली रेलवे बंद झाल्यावर लोकांनीं गाडी लावलेली होती व त्याजवर दर माणशीं तीन आणे घेत असत व त्या उन्हापावसांतून उघड्याच नेत असत तो ताप आतां चुकला. या प्रमाणें उमरावती रेलवेची व्यवस्था झाली. आतां खामगाव रेलवेकडे दृष्टि देऊन पहा.

खामगावची रेलवे उद्यापासून बंद होणार व ही गुदस्ता तिगस्ता याच प्रमाणें बंद झाली होती. तिजविषयीं कोणी कधीं उद्योग केला नाहीं ह्मणून त्यास सोयीचें फळही मिळालें नाहीं. उमरावतीस दोन वेळां गाडी जाते व खामगावास सारी एकदा व तीही पावसाळ्यात बंद होते तरी लोक तिजविषयीं कांहीं कुरकुर करीत नाहींत व सरकारापुढें गाऱ्हाणें नेत नाहींत तर लोकांचा बंदोबस्त कसा व्हावा? व त्यांनां सुख सोयी कशा मिळाव्या? ते आह्मांला कळत नाहीं. उमरावतीकरासारखी खामगावचे लोकांनीं खटपट केली असती तर त्यांचें कार्य झालें नसतें असें आह्मांला वाटत नाहीं. पारसच्या स्टेशनाला प्यासेंजर ट्रेन लागत नव्हती व त्यामुळें बाळापूरच्या लोकांची गैरसोय होत होती तर त्यांनीं त्याविषयीं अर्ज करून दाद मागितली व त्यांचे मागण्याप्रमाणें पारसच्या स्टेशनावर गाडी थांबूं लागली. कपाशीच्या हंगामांत स्टेशनांस्टेशनाहून कपाशीचे गठ्ठे जातात त्याचें पत्रक कित्येक वेळां आमचे वाचकांनीं पाहिलें आहे त्यावरून त्यांस आठवत असेल कीं नागपुरापासून भुसावळ पर्यंतच्या कोणत्याही स्टेशनावरचा माल खामगावापेक्षा अधिक नाहीं. खामगावाला गठ्यांची संख्या प्रती आठवड्यात उमरावती पेक्षांही कित्येक हजारांनीं ज्यास्तां असे. तेथील असें उत्पन्न व अशा भरभराटीचा तें गाव असतां त्याला रेलवे होऊन त्यावरून दिवसांतून एकादाही गाडी न चालावी व लोकांनीं पराकाष्ठेची गैरसोय व्हावी हें त्यांचें दुर्भाग्य होय. आह्मांला तर खास वाटतें कीं उमरावतीकरासारखी त्यांनीं खटपट केली असती तर त्यांचीही सोय झाली असती.

या प्रसंगीं आह्मांला आणखी हेंही सांगितलें पाहिजे कीं खामगावच्या गाडीच्या योजनेंत एकंदर चूक आहे. खामगावाहून तिनी सांजा गाडी निघून जलंबवर येते तेव्हां मुंबईबाजूकडे जाणारांची बरीच सोय होते पण या बाजूकडे ह्मणजे पूर्वभागाकडे येणाऱ्या उतारूंस तीन प्रहर रात्र तिष्ठत बसावें लागतें. तसें मुंबईकडून खामगावास येणारे उतारूंची दशा तर विचारूंच नका. पहांटेच्या प्रहररात्रीं जलंबच्या स्टेशनावर येऊन सतत सहा प्रहर त्यास कुचंबत [illegible] तेव्हां पुढें गाडी मिळे. व तीही आतां मिळणार नाहीं. ही मोठी गैरसोय आहे.

आह्मास कोणी असें सांगितलें कीं, अशा गैरसोयीची गाडी खामगावास असल्यामुळें ती बंद झाल्याबद्दल लोकांस कांहींच वाईट वाटत नाहीं. व गाडी बंद झाल्या पुढें त्याची उलटी अधिक सोय होते ह्मणजे लारिसा चालू होतात. व प्यासेंजर आणि मिक्स अशा दोन्ही गाड्यांच्या वेळा साधून उतारूंस जलंबवर आणितात आणि खामगावास पोचवितात तें त्यास फार सुलभ पडून त्यांचा वेळ व्यर्थ जात नाहीं. व या सोयीकरितां त्यांनां काय तो एकच आणा जास्त पडतो. ह्मणजे तिकिटें ह्याला तीन आणे दर आहे व लारिसाला चार आणे पडतात."

ही गोष्ट खरी असेल व तशी असल्याचा संभव आहे. परंतु येणेकरून झालें काय? आगगाडीचें जें उत्तम सौख्य तें लोकांनां यथास्थित मिळालें नाहीं व अशीच स्थिति राहील तर पुढें मिळणार नाहीं. यांत सरकारचें दुर्लक्ष तर आहेच पण लोकांचीही मोठी कसूर आहे. कारण लोकांनीं आपणास काय पाहिजे तें सुयुक्तिक रीतीनें मागितलें पाहिजे. ह्मणूनच आह्मी ह्मणतो कीं, 'मागा ह्मणजे मिळेल किंवा ठोका ह्मणजे उघडेल' हें वाक्य किंवा 'प्रयत्नीं परमेश्वर' ही ह्मण लक्षांत ठेऊन आपले सुखसोयीकरितां लोकांनीं सदा सर्वकाळ झटलें पाहिजे. पाळण्यें पाहून कोणी अमृत पाजित नसतो व कदाचित पूर्वी तसें असेल तरी हल्लीं तो काळ नाहीं.

असतु. पुढील हंगामांत तरी खामगावची आगगाडी लोकांच्या सोयीची होईल व तशी होण्याकरितां लोक झटतील अशी आह्मी आशा बाळगतों.

## बडोद्याचें राज्य.

बडोद्याचे हल्लींचे राजे श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांच्या कित्येक गैर गोष्टींविषयीं इंग्लिश सरकारानें कमिशन नेमून चौकशी केली व कमिशनानें गायकवाडांच्या विरुद्ध रिपोर्ट केला त्यावरून काय परिणाम होतो हें पाहण्याकडे पुष्कळ लोकांचें लक्ष्य लागून राहिलें आहे. व वाईट परिणामाविषयीं कित्येक लोक कल्पनाही करीत व खुद्द श्री० मल्हारराव महाराज यांस ही संशय वाटून ते आपले नवीन दिवाण मि० दादाभाई नवरोजी यांस विलायत सरकारापुढें इन्साफ मागण्याकरितां पाठविणार अशीही बातमी होती परंतु शुभवार्तेचा एक बूट निघाला आहे तो असा— श्री० मल्हारराव यांस एकंदर सक्त ताकीद व्हावी कीं यापुढें उत्तम रीतिनें राज्य चालविण्याविषयीं त्यांनीं दक्ष असावें. व तसें ते न करतील तर मग इंग्लिश सरकार अखेरचा काय बंदोबस्त करणें आहे तो करतील अशा अर्थाचा हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला आहे किंवा होणार आहे अशाविषयीं इंग्लिशमन पत्राच्या आधारें टाइम्समध्यें लिहिलेला आह्मी एक लेख वाचला. व त्याप्रमाणें घडेल तर फार चांगलें होईल.

श्री० मल्हारराव गायकवाड यांच्या डोळ्यास अंजन आहे व येणेकरून त्यांचे डोळे साफ होऊन त्यांनां पुढील कार्यभाग दिसला पाहिजे तरच त्यांचें हित आहे. व ईश्वर त्यांस आतां चांगल्या रीतीनें वाग

ण्याची व राज्याची सुधारणा करण्याची सद्बुद्धी होवो असे आम्ही इच्छीतो.

हिंदुलोक पूर्वी सार्वभौम होते व यावत समुद्र वलयांकित त्यांचें राज्य होते असे आपण ऐकतो पण तो काळ हल्लीं गेला. आतां हिंदुलोकांचीं राज्यें कागदावर आहे ते ठाग असाप्रमाणें थोडीं राहिलीं आहेत व त्यांनाही खरोखरीचे कित्येक वारीस आहेत म्हणून त्यांनी ते आपल्यानंतरचे ठाग काढावे. व ईश्वराच्या कृपेनें आम्हा सर्व हिंदुलोकांत त्यांना जें विशेष वैभव आहे तें त्यांनी राखावें. यांत त्या राजांना व आम्हा सर्व हिंदुलोकांनाहि पराकाष्ठेचें भूषण आहे. याजकरितां राजे लोकांनीं वर्तन चोख ठेविलें पाहिजे नाहींपेक्षा विकाळ काळ टपला त्यांकरीतां पाजळून तयार आहेतच हें पाहून सावध असावें.

## बंगाल्यांतील दुष्काळ.

बंगाल्याकडून या आठवड्यात ज्या बातम्या आल्या आहेत त्यावरून त्या दुष्काळग्रस्त लोकांची विपत्ती संपण्याच्या बेतास आली असे ऐकून आम्हांस संतोष वाटतो. कृपाळू परमेश्वरानें लवकरच निभावणी केली. तिरहूटप्रांताची पहाणी करून लेफ्टीनेट गवरनर साहेब मोंगिरास परत गेले. लोकांच्या निर्वाहाकरितां सरकारी खर्चानें बांधकामें सुरू केलीं. उत्तम रीतीने चालली आहेत कोणास अगदीं उपोषण किंवा कोणीचे अन्न न मिळाल्यामुळें भयंकर परिणाम अशा गोष्टी फारच क्वचित घडल्या. मुजफरपूर येथें २ लक्ष लोक कामावर लागले. इतके लोक तयच्या कामावर लागतील असें पहिल्याने वाटलें नव्हते. व सीतामढी येथें लोक कामावर येतील असें वाटलें होते तितके तेथे आले नाहींत. त्यामुळें तिकडे जो धान्याचा साठा करून ठेविला होता यांतून १२००० टन धान्य मुजफरपुरास व ७००० टन मधुबानीकडे पाठविले. उत्तर पुरणीया प्रांतात आलीकडे पाणी पिकेची अधिक झाली व उत्तर बाहार प्रांतात तर सरकारी तांदळा शिवाय दुसरे तांदुळ विकत मिळतच नाहींत. जूनमहिन्यामध्यें पूर्व तिरहूट प्रांतात ३७००० टन धान्य लागेल. बहूकडे पाऊस चांगला पडल्यामुळें आलिकडे मजूर कामावर लोक कमी येऊ लागले आहेत. दक्षिण तिरहूट प्रांताकरितां लोकांचे खानगी धान्य पाटणामार्गें दररोज ८०० टन जात आहे याप्रमाणे तिकडील हाल चाल आहे.

## वऱ्हाड.

जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी चिखलदऱ्याहून इलिचपुरास आली. तेथे एक लेहमचा मुकदमा आहे तो पाहून तदपीक उमरावतीस येणार व तेथे दोन खोनाचे मुकदमे व काहीं दिवाणी काम आहे ते पाहून २० वे तारखेच्या सुमारास येथें येणार असें ऐकण्यात आहे.

—000—

आम्हांस लिहिण्यास संतोष वाटतो की रा० रा० हणमंतराव रामचंद्र मेहकरचे अकटिंग तहशिलदार यांस रेसिडेंट साहेबांनी कायमचे तहशिलदार केले. सुभानजी खंडोजी मरण पावल्यानें रिकामी झालेली जागा यांस दिली अशी रेसिडेन्सी आर्डरमध्यें नंबर १८ची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे.

—000—

परजन्यानें या आठवड्यात अकोल्यास अगदीच टाळा दिला. त्यामुळें गेल्या आठवड्यात जो थोडाबहूत पडला आला होता तो नाहींसा झाला. व रात्री पराकाष्टेचा ऊष्णा होऊं लागला आहे. आसपास वाहीं आठवड्यात बराच पाऊस पडला असे म्हणतात पण अकोल्यास व अकोल्याचे दोन तीन कोसांत पाऊस नाहीं असें म्हणतात. नदीचें धरण या आठवड्यात सोडून दिलें. तेणेंकरून नदीचे पाण्याला व लागेला घाण येऊं लागली आहे. पुढे काय होईल सांगवत नाहीं.

—000—

हैद्राबादचे रेसिडेंट मेहेरबान साँडर्स साहेब हिंदुस्थान सरकारचे कौंसलदार होण्याविषयीं बातमी होती त्याप्रमाणें तूर्त घडत नाहीं असें म्हणतात व निजाम सरकार वयांत येईपर्यंत ते हैदराबादेस रहाणार.

—000—

रा० विश्वनाथ नथराम यांस पूर्व वऱ्हाडांत सेकंड ग्रेड प्रोविशनरी सब ओव्हरसिअर नेमिलें.

—000—

विद्याखात्याचे डायरेक्टर रा० सिक्स्मर साहेब चिखलदऱ्याहून उद्या निघणार व २० वे तारखेस येथें येणार असें समजतें.

—000—

मि० इलियट साहेब इजुकेशनल इन्स्पेक्टर रजेवरून येऊन आपले कामावर रुजूं झाले.

—000—

रा० रा० सखाराम दत्तात्रय जळगावचे तहशिलदार यांणीं एक महिन्याची रजा मागितली आहे.

—000—

मिठाविषयींचा सन १८७४चा १० वा आकट वऱ्हाडात लागू केला व नार गावच्या स्टेशनापासून पूर्व भागात दरमणास दरशेकास तीनपंचमांश पै कर घेण्याचा हिंदुस्थान सरकारानें ठराव केला आहे.

—000—

उमरावती—धर्मार्थ दवाखान्याचे वैद्यमिस्तर महालिंगम पिले यास कांहीं दिवस कामावरून दूर केल्याबद्दल पूर्वी लिहिलेंच होतें. आतां असें कळतें कीं, त्यांची चौकशी होऊन त्यांना आकोला लेकेच दवाखान्यात ४० ६० दरम्याचे जाग्यावर नेमले.

—000—

कोर्शी— येथें नवीन एकस्ट्रा असिस्टंट कमिशनरचे कोर्ट स्थापन होणार आहे असें कळतें. पण सुटी संपताच सुरू होईल असें वाटत नाहीं. याबद्दल आम्ही सरकारास सुचवितो कीं, तेथें लौकर कोर्ट सुरू होईल तितकें चांगलें. कारण आतां वरातील सुरवात असल्यामुळें तिकडील पक्षकार लोकांस पुष्कळ अडचण होणार आहे.

—000—

मे० रेनिक साहेब असिस्टंट कमिशनर यांना रजेवर जाऊन बरेच दिवस झाले परंतु त्यांच्या जाग्यावर कोणी आल्याचे दिसत नाहीं. यामुळें बहुतेक कचेरीचीं कामें तुंबलीं असतीलसे वाटत. प० लि०

## वर्तमानसार.

स्वेझ संयोगीभूमीचा कालवा बांधण्या प्रीत्यर्थ १३, ७७ ४०,००० रुपये लागले असें कळतें.

सातारा जिल्ह्यांत डफळ्यांचे जत म्हणून एक जहागीर संस्थान आहे तें त्यांच्या अयोग्य वर्तनामुळें सरकारात घेतलें. व डफळ्यांनां ८०० रुपये पेनशन ठरवून दिलें असें कळतें.

मुसलमान लोकांनीं मोहरमाचे पूर्वी मुंबईस पारशीलोकांशीं जो मोठा दंगा केला त्याजबद्दलची व्यवस्था मुंबई सरकारानें नीट ठेविली नाहीं याजबद्दल त्यांस टपकपादारख वरिष्ठ सरकाराकडून कांहीं लिहून आलें आहे असें म्हणतात.

सांगलीकर श्रीमंत तात्यासाहेब पटवर्धन हद्दपार केलेल्या २२ लोकांना बरोबर घेऊन मोठ्या हौसेनें सांगलीस गेले.

वर्तमानपत्रा करितां तारायंत्रातून बातम्या आणविणें झाले तर चौथाई दरानें मिळतील. पण त्यांत कांहीं व्यापार संबंधाची बातमी असू नये असा जुलई महिन्यापासून ठराव होणार.

सालमजकूरचा विलायतेस झालेल्या हिंदुस्थान संबंधी सिविलसर्विसच्या परिक्षेत मद्रासचे एक गृहस्थ व मुंबईचे पारशी एक गृहस्थ पास झाले असें समजतें.

कोल्हापूरचे कैलासवासी राजाराम महाराज फ्लोरेन्स येथें मरण पावले त्यांच्या सन्मानाकरितां तेथें त्यांचा एक पुतळा करून तो मोठ्या समारंभाने स्थापन केला असे तारायंत्रातून वर्तमान आलें आहे.

रा. ब. बेचरदास अंबाइदास यांनीं उदारपणानें १०००० रुपये सरकारास दिले. या रुपयाच्या व्याजाचा खर्च अमदावादेस मुलीच्या विद्याभ्यासाकरितां ट्रेनिंग स्कूल होणार आहे त्याकडे करावा अशी त्यांनी आपली इच्छा सरकारास कळविली आहे.

म्हैसूरचे राजपुत्र यास पुढील वर्षापासून बंगलोर येथें ठेवण्याच्या विचारास विलायत सरकारानें रुकार दिला. मास्तर व नोकरचे विद्यार्थी यासहित ते बंगलोरास रहाणार.

मुंबईत कापडाच्या आणखी कांहीं नवीन गिरण्या लवकरच सुरू होणार आहेत. असें समजतें त्यांतून कोणी एकादा वऱ्हाडांत काढील तर फार चांगलें होईल.

मि० नेंडर बर्न सिंधचे जुडिशीयल कमिशनर तेथें जाऊन काम पाहू लागले.

हिंदुस्थानांतील कमिसरी खात्याच्या व्यवस्थेत कांहीं फेरफार करावा असा सरकारचा मानस आहे व त्या विचारा करितां एक स्वतंत्र कामदार नेमणार आहेत.

अयोध्या रेल्वेचा राजघाट येथें गंगा नदीवर पूल झाला व त्यावरून गाडी जाऊ येऊ लागली.

कलकत्त्याहून मे महिन्यांत १८९९१४ रतल चहा बाहेर प्रांती गेला.

कपुरथळ्याचा राजा आजारी आहे व डाक्टरानीं सल्ला दिली आहे कीं हवा पालटण्याकरितां डोंगरावर जावें. परंतु त्याप्रमाणे घडेल किंवा नाहीं पहावें.

बंगाल इलाख्यांत कालेजें व शाळा मिळून १४३०० आहेत. यांतील सुमार ४०० लोकांच्या खर्चावर चालतात.

कुमार हरेंद्र कृष्ण यांच्या उत्तम वर्तणुकीकरितां सरकारानें त्यांना राजेबहादूर असा किताब दिला.

मुंबईच्या ट्रामवे गाडीला भाड्याचे दर अजून कमी होतनाहींत म्हणून लोक त्यांतून जाण्यास फारसे बसत नाहींत. मद्रासेंत दर कमी असल्यामुळें ट्रामवेंनीं गाड्यांचा रोजगार नसवून टाकिला आहे.

सुरतेस तापीनदीवर पूल बांधण्याचा ठराव झाला. त्याला साडेपांच लक्ष रुपये खर्च लागणार आहे.

गोदावरी जिल्ह्यांत कोळशाच्या खाणी नवीन सापडल्या आहेत.

सरकारी शाळांत यापुढें लिटिलगो पास झाल्याखेरीज मास्तर नेमावयाचे नाहींत असा मजकूर सुरतेच्या एक पत्रात लिहिला आहे.

बेलजियम देशास फ्रान्सचें भय वाटावयास आरंभ झाला आहे. जर्मनीचा व फ्रान्सचा पुनः लढाईचा प्रसंग आला तर फ्रान्स बेलजियम देशावर हल्ला करील अशा विषयीं वर्तमानपत्रांत मजकूर यावयास लागला त्यामवरून फ्रेंच वर्तमानपत्रांत फ्रान्सचा कोणाशीं तंटा करण्याचा इरादा नाहीं असा मजकूर आहे.

पुण्यास होणाऱ्या घोड्याच्या प्रदर्शन करितां दरसाल ५००० रुपये देण्याचा सरकारानें ठराव केला.

रावबहादूर गोपाळराव हरि देशमुख अमदाबाद येथील स्माल काज कोर्टाचे जडज यांस कच्छची दिवाणगिरी लवकर मिळणार अशी वदंता आहे.

सय्यद अबदुल्ला म्हणून गृहस्थ गवरनर जनरलचे शिफारशीवरून सन १८५० सालीं विलायतेस गेले होते. तेथें कांहीं युनिव्हर्सिटी व कालेजांत प्रोफेसर होते, तेथे युरोपियन स्त्रीशीं लग्न केले, हल्लीं हिंदुस्थानांत परत येण्यास निघाले.

बंगाल सरकारचे चीफ सेक्रेटरी मि० बर्नार्ड यांस बंगाल्यांतील दुष्काळाचे काम संपल्या नंतर नागपुरचे चीफ कमिशनर नेमणार.

स्वदेशी चाकू. शिवराम आणि कंपनी— यांणीं इंग्रजी नमुन्याचा कच्छाकाठचे लांकडी मुठीचे तयार केलेले स्वदेशी चाकू— या चाकूनें पराशी पेने व लेखण्या उत्तम रीतीने करितां येतात. सुबकपणांत व शोभेंत ही हा चाकू इंग्रजी त्या नमुन्याच्या चाकूची बरोबरी करितो, हा विक्रीस तयार झाला आहे. एका चाकूची किंमत ८ आणे पडते. ने. ओ.

गोरी मडम मुसलमानीन झाली— एक मडमनें आपला नवरा जिवंत असतां पठाणा बरोबर शादी केली. हे वर्तमान तिच्या पहिल्या युरोपियन नवऱ्यास कळल्यावरून त्याणें तिजार व मुसलमान नवीन पठाण नवऱ्यावर व त्या कामास सामील जे लोक आहेत त्या सर्वांवर खटला मुंबईस माजिस्ट्रेटाकडे सुरू केला आहे म्हणोन स्टेट्समन वरून समजले आहे. त्या मडमेस मुलेंही आहेत.

ब्रह्मदेशाचा राजा हा आपला व आपल्या कुटुंबांतील पोषाक तयार करीत आहे. एका वडील मुलीच्या पोषागास सुमार २,००,००० रुपये खर्च लागेल असा अदमास आहे!

गेल्या वर्षी लिवरपूल येथून २९,३४० टण मीठ कलकत्यास आलें.

नार्थवेस्ट प्रांताचे लेफ्टनेट गवर्नर सर जान स्ट्राची हे एका नेटिवास असिस्टन पोलिस सुपरइन्टेन्डेन्ट नेमणार आहेत.

मुंबईचा एक मारवाडी लवकरच मुसलमान होईल असे ह्मणतात.

मुदतीच्या कायद्यात्रमाणें कर्जाच्या दस्तैवजाची मुदत संपण्यापूर्वीं कर्माची रकम प्रतिवादीने लेखी कबुल केली असेल तर मात्र त्या कबुलीच्या तारखेपासून पुन्हा मुदत मोजिली जाईल असे मद्रास हायकोर्टाने ठरविले आहे. अ. द.

फ्रेंच फौज — यंदाच्या सालों फ्रेंच लोकांच्या फौजेंत ३२३ तोफखान्याच्या ब्याटरीज आहेत. एकंदर सर्व मिळून ४,७१,००० लोक व ९९,००० घोडे आहेत. यांचा लष्करचा खर्च २४,८९,००,००० पासून १८,६०,००,००० रु० पर्यंत वाढला. फौजेची व्यवस्था वाढत्या झोकावर आहे. सन १८७८ त फौजेंत एकंदर ८,००,००० लोक होतील असें समजते. याखेरीज निरनिराळ्या तऱ्हांचा बंदोबस्त व व्यवस्था ही चालली आहेत.

मद्रासेतील टपालच्या शिपायांत कट— मद्रासच्या जनरल पोस्ट हपिसांतील पत्रे वटाणारे, जमादार व शिपाई यांस पोस्टमास्तर यांनीं सारखा पोशाक घालण्याविषयीं हुकूम फर्माविला. या पोशाखास पंधरा रु० खर्च येणार व ते रु० दरमाहा दोन रु० पगारांतून कापून घेण्याचा पोस्टमास्तरानीं ठराव केला. हा जुलुम ते लोक कबूल करीनात. ता० १ रोजीं त्या सर्वांनीं याप्रमाणे कमी पगार घेण्याचें नाकबूल केलें साहेबानीं त्यांस बर्तर्फ करण्याचा धाक दाखविला तरी देखील करीनात तेव्हां साहेबांनीं हुकूम रद्द केला आणि मग काम सुरळीत चालू झालें.

नवीन एक चमत्कार — हल्लीं सर्व पृथ्वींत इजिप्तांतील चीयप्स येथील पिरमिड (बुरूज) यासारखी उंच इमारत नाहीं. याची उंची ४८० फूट आहे. परंतु अमेरिकेंत फिलाडेल्फिया येथें याच्या दुप्पट उंचीचा बुरूज बांधण्याची खटपट चालली आहे. हा बुरूज अमेरिकन स्वातंत्र्याच्या पहिल्या शतकाच्या प्रदर्शन समारंभाकरितां तयार होत आहे. हा समारंभ आणखी दोन वर्षांनीं होईल. हा बुरूज लोखंडाचा बांधणार आहेत. तो वांटोळा असून पायथ्याशीं त्याचा व्यास १९० फूट असून शिखरास ३० फूट होईल. यांत चार सरकणाऱ्या कोठड्या केल्या जातील त्याच्या योगानें पांचशें मनुष्यें एकदम वर जाऊं शकतील.

सुरतच्या स्मालकाजकोर्टाच्या जज्जास यंदाच्या उन्हाळ्यांत कोर्ट का बंद ठेविलें नाहीं ह्मणून हाय कोर्टाच्या जज्जांनीं विचारलें आहे.

सरकारानें अडीच कोटि रुपयांचे कर्ज शेकडा चार टक्के व्याजानें घेण्याविषयीं सूचना प्रसिद्ध केली आहे. कर्ज देणारांनीं ता० ८ जूलैपर्यंत सरकारास कळवावें.

मध्यएशिया— काशगर व कलदशा यांजवर हल्ला करण्याची भीति चिनी लोक घालीत आहेत रशिया अमीरासह संरक्षणाची तयारी करीत आहे. असें लं. च्या ता० २ च्या तारेवरून कळतें. हा एक तंट्याचा निराळाच चमत्कारिक प्रकार दिसत आहे.

श्री. कैलासवासी गोपाळराव मैराळ यांचे कनिष्ठ (?) चिरंजीव रा० रा० बाप्पासाहेब यांनीं हैदराबादेंत नवीन पेढी ता. १८ मे रोजीं स्थापन केली. या पेढीस सर सालरजंग यांचे सहाय आहे.

इं. प्र.

पुणे—रावजी बिन सखाराम व अमृता या उभयतांस खून केल्याचे बाबतींत मे० सेशन जज्ज साहेब यांणीं काळे पाण्याची शिक्षा दिली असून त्याजवर त्यांणीं हाय कोर्टात अपील केलें. दरम्यान गेले दिसेंबरमहिन्यांत तुरुंगांतून ४१ कैदी पळाले त्यांत हे दोघे पळून गेले. इकडे अपिलाचा निकाल हायकोर्टानें करून आरोपितांस सोडण्याचा हुकूम फरमाविला तो आरोपी नाहींत. पुढें आरोपित आपण होऊन हजर झाले. त्याजबद्दल चौकशी होऊन मे. सिटी माजिस्ट्रेट साहेब यांणीं सहा सहा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा दिली.

व्यंकटेशाच्या गिरीच्या डोंगराच्या पायथ्याशीं सोन्याची खाण मिळण्याच्या उद्योगाकरितां मद्रासेंतील एक कंपनी जमून काम सुरू झालें आहे ह्मणोन समजलें आहे, ज्ञा. प्र

गुलाम महमदखान काबुलास येऊन दाखल झाल्यापासून अमीर अगदी गडबडींत असतो. अमीर पूर्वीं इंग्रजांच्या वकिलाशीं अगदी मोकळ्या मनानें बोलत असे, पण तो आतां तसे करीत नाहीं. सरदार व खान वगैरे कोण कोण त्याकडे जातात हे पाहण्याकरतां अमिराच्या गुप्त हेराचा गुलाममहमदखानाच्या घरावर अगदी पाहरा असतो.

काबुल व बुखारा या प्रांतांतून दरसाल सुमारें ३५०० घोडे हिंदुस्थानांत येतात. या ३५०० पैकीं सुमार ५०० निजामाच्या हैद्राबादेस खपतात, सुमार १००० घोडे नेटिव संस्थानिक वगैरे घेतात, सुमार ९०० हिंदुस्थान सरकारच्या लष्करांत खपतात व बाकीचे खासगी लोक घेतात असा अदमास आहे. अ. द.

रशिया प्रशिया व फ्रान्स— विलायतचे बादशहा लंडन शहरीं गेले होते त्याचें खरें कारण समजत नाहीं ह्मणून आह्मी थोड्या दिवसांपूर्वीं लिहिलें होतें खरें कारण अजूनही समजत नाहीं, परंतु मुंबई ग्याझेटाच्या लंडन एथील बातमीदारानें लिहिलें तें आह्मी कळवितो: सन १८७० सालीं फ्रान्स व प्रशिया यांची लढाई सुरू होण्यास निमित्त असें झालें कीं, प्रशियाच्या राजकुळांतील राजपुत्र, स्पेनच्या गादीवर बसावा असा प्रशियाचा इरादा होता. प्रशियन व फ्रेंच लोकांचें हाडवैर शेकडो वर्षांपासून आहे. वैऱ्याच्या राजकुळांतील राजपुत्र स्पेनच्या गादीवर बसला असतां आपल्यास उपद्रव होईल अशा कारणानें, प्रशियाचा हा बेत सिद्धीस न जावा ह्मणून फ्रान्सच्या नेपोलियन बादशहानें प्रशियाशीं लढाई आरंभिली. लढाईचा परिणाम काय झाला हें वाचकांस माहित आहे. आल्सेस व लोरेन हे फ्रान्सचे दोन प्रांत प्रशियानें घेऊन शिवाय फ्रान्सपासून प्रशियानें २०० कोटि रुपये दंड घेतला. या शिवाय फ्रान्सचे अतोनात नुकसान झालें तथापि फ्रान्सनें तीन वर्षांच्या आंत २०० कोटि रुपये दंड देऊन टाकून हल्लीं फौजेची कडेकोट तयारी चालविली आहे. फ्रान्सची उत्तम प्रकारची सिद्धता झाली ह्मणजे सूड उगविण्याकरितां फ्रेंच लोक प्रशियाबरोबर लढाई करतील यांत संशय नाहीं. परंतु फ्रान्सची सिद्धता झाली नाहीं तोंच कांहीं तरी कुरापत काढून फ्रान्स बरोबर पुन: लढाई करून त्यां देशास रसातळास नेण्याचा प्रशियाचा बेत दिसत आहे. व हा बेत सिद्धीस नेण्याकरितां कांहीं तरी निमित्त सांपडावें ह्मणून प्रशियाचा उद्योग आहे. सुमारें एक महिन्यापूर्वीं युरोपांत मोठी लढाई उत्पन्न होण्याचे चिन्ह दिसत होतें, परंतु इंग्लंडचे परराज्यसंबंधी प्रधान अशा तऱ्हेचे कांहीं पार्लमेन्ट सभेंत बोलल्यामुळें प्रशियाचा बेत सिद्धीस गेला नाहीं व पुढें असें होऊं नये व इंग्लंडास आपल्या तर्फेचें करून घ्यावें ह्मणून प्रशियाच्या बादशहानें रशियाच्या बादशहास इंग्लंडास पाठविलें असावें असें मुंबई ग्याझेटाचा बातमीदार लिहितो. अशा कांहीं कारणाकरितां रशियाचे बादशहा इंग्लंडास गेले असले तर त्यांनीं आपलेंही हित पाहिलें असेलच. कानस्टांतिनोपल घेण्याकरितां रशिया कित्येक दिवसांपासून प्रयत्न करीत आहे व हा हेतु सिद्धीस नेतेवेळेस प्रशिया रशियास मदत करील असें दिसतें. हा सर्व प्रकार कसा असला तरी युरोपांत मोठी लढाई लवकरच सुरू होण्याचीं चिन्हें दिसत आहेत.

**नेटिव कसब**— विलायतेहून तयार होऊन आलेलें हरएक प्रकारचें सामान पाहिलें ह्मणजे आह्मास आश्चर्य वाटून तसें आपल्यास करितां येणार नाहीं असें वाटतें. परंतु तें कसें करावें हें आमच्या लोकांस शिकविलें असतां करितां येईल इतकेंच नाहीं, परंतु उत्तेजन नसल्यामुळें हिंदुस्थानांतील कसब दिवसेंदिवस कमी होऊं लागलें आहे. तथापि तें अजूनही इतकें राहिलें आहे कीं, विलायतेंत होणाऱ्या व ज्या वस्तु हिंदुस्थानांत करितां येणार नाहींत असें वाटतें त्या कित्येक नेटिव लोक आपल्या जुन्या स्वल्पगोष्टी हत्यारांच्या योगानेंच करूं शकतात; आमचें हे ह्मणणें यथार्थ आहे हें पुढें लिहिलेल्या मजकुरावरून वाचक कबूल करितील. वायव्य प्रांतांतून मुंबईग्याझिटास एकानें पत्र लिहिलें आहे त्यांत तो असें लिहितो कीं, "बंदुकासंबंधी, आश्चर्य वाटण्यासारखी माहिती एका गृहस्थानें पायोनिअर पत्रास लिहिली आहे ती अशीः— लुधियाना येथील एक लोहार, बाक्स्टर जातीचे काडतुस [बंदुकींत बार भरण्याचे तोटे] उत्तम प्रकारचे करितो. सिकलकोट येथील लोखंडी काम करणारे कारागीर, एन्फिल्ड जातीच्या बंदुकांत फेरफार करून त्या स्नायडर जातीच्या करून देतात व त्यांच्या कामांत यत्किंचितही फरक असत नाहीं. याप्रकारच्या फेरफाराचें काम लोहारानें इतकें उत्तम करून दिलें कीं, या बंदुकींत व सरकारी बंदुकींत अंतर मुळींच राहिलें नाहीं. लोहारानें दुरुस्त करून दिलेली ही बंदुक, हिंदुस्थानचे गवरनरजनरल लार्ड मेयो यांच्याकडे पहाण्याकरितां पाठविली होती. व कर्नल नागेंट यांणीं असें लिहून पाठविलें होतें कीं, याप्रमाणें हजारो एन्फील्ड बंदुकी स्नायडर करितां येतील व प्रत्येक बंदुकींत या प्रकारचा फेरफार साडेतीन रुपयांत करितां येईल." हिंदुस्थानच्या फौजेस लागणारा दारू गोळा वगैरे सर्व प्रकारचें सामान विलायतेहून येतें व त्याबद्दल कोट्यावधी रुपये खर्च होतो. हें सामान येथल्या येथे तयार करविलें असता निमें अथवा निमेपेक्षां कमी खर्चांत होईल परंतु कर्नल नागेंट यांणीं सदहू प्रमाणें लिहून पाठविलें होतें त्याचा हिंदुस्थानसरकारानें असा निकाल केला कीं, 'बंदुकीचे काम उत्तम प्रकारचें मजबूत झालें आहे तथापि राजकारणाकरितां, अशा प्रकारच्या कामांत नेटिवांस उत्तेजन देणें बराबर नाहीं.' हिंदुस्थानसरकारानें असा निकाल केला तेव्हां नेटिवांचे दुर्दैव असें ह्मणणें भाग येत. इंग्लिश सरकार आपल्या प्रजेकडून कोणच्या प्रकारचा अभ्यास करवित आहे हे आज दुसरीकडे लिहिले आहे ते वाचले ह्मणजे, हिंदुस्थानसरकारच्या सदहू ठरावाचें आश्चर्य वाटल्याखेरीज राहणार नाहीं. यंदाच्या पूर्वींच्या व आतांच्या इंग्रज सरकारच्या राज्याच्या बळकटीचा विचार केला ह्मणजे, पूर्वींपेक्षां आतां शतपट राज्य बळकट झालें आहे असें वाटतें. आतां हिंदुस्थानांत गोरी फौज जास्त असून शस्त्रांची तयारी पूर्वींपेक्षां दसपटीनें चांगली आहे इतकेंच नाहीं, परंतु पूर्वीं रेलवे व तारायंत्रे नवतीं तीं आतां झालीं आहेत. पूर्वीं रयतेजवळ थोडकीं व जंगलेलीं तरी शस्त्रे होतीं व त्यापासून प्रसंगीं ती आपलें संरक्षण करीत असे. परंतु आतां प्रजा निःशस्त्र केली आहे. दाखल्यावांचून कोणास शस्त्र बाळगूं व विकूं देत नाहींत. याप्रमाणें कडेकोट बंदोबस्त असतां, फौजेस लागणारीं हत्यारें नेटिवाकडून करविण्यास व या कामांत त्यांस उत्तेजन देण्यास सरकार कां भितें हें आह्मास समजत नाहीं. हिंदुस्थानचें उत्पन्न, खर्चास पुरत नसतां फौजेस लागणारी सामग्री विलायतेहून आणविण्यांत, तेथील व्यापाऱ्यांचें व, कारखानदारांचें हित करून देण्याशिवाय दुसरा कांहीं फायदा असेल असें आह्मास वाटत नाहीं. राजकारणाकरितां या कामांत नेटिवांस उत्तेजन देणें बराबर नाहीं असा हिंदुस्थान सरकारानें निकाल केल्याविषयीं सदरहु पत्रांत लिहिले आहे परंतु या सबबेत कांहीं हंशील वाटत नाहीं. कारण लढाऊ सामान तयार करणारांनी राज्य काबिज केल्याचें जगाच्या इतिहासांत आजपर्यंत झालें नाहीं. असें आहे तर विलायतच्या कारखानदारांकडे लक्ष न देतां, फौजेस लागणारें सामान होईल तेथपर्यंत, थोड्या खर्चांत नेटिवाकडून तयार करवून, या कामीं हल्लीं जो निरर्थक खर्च होत आहे त्याचा बचाव करावा. ने. ओ.

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे व. स. छा. छा. प्र. केलें.

REGISTERD NO 7, 1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० २१ माहे जून सन १८७४ इ० अंक २५

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| साल अखेर | १ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| पहिल्यांदा दर ओळीस | ०१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| दुसरे खेपेस | ०२ |

### गजकरणाचें औषध.

आमचे दुकानांत गजकरणाचे आ षधाच्या डब्या विकावयाच्या आहेत. हें औ षध लाविले असतां यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटी प्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ६ सहा आणे.

हें औषध गजकरणाशिवाय खरूज व नायटे यांसरही चांगले प्रकारें लागू होतें.

### नोटिस.

नोटिस—विठ्ठल त्रिंबक घिनमिने रा हणार मौजे शिरपुर प्रगणे दहिहंडा तालुके मूर्तिजापूर यासला सोनाजी नल्हद पर भाजी देशमुख मोकदम कुळकर्णी मौजे आगोद प्रगणे दहिहंडा तालुके दर्यापूर यासकडून देण्यांत येते कीं तुह्मी वाकिली चे कामी आमचे तर्फे पूर्वी होते त्यास म जकूर तुह्मास कामावर नेमणें नाहीं ह्मणोन तुह्मास पूर्वी तारिख १० माहे एप्रिल सन १८७४ इसवी रोजी समक्ष जबाब दिला त्याप्रमाणें तुह्मी आमचे तर्फेतील कोणते ही दिवाणी कामांत किंवा उत्तरपक्ष चाल विण्याचे काम जिल्हे अकोले व एलिचपूर व उमरावती या तिन्ही जिल्ह्यांत चालवू नये तसाच वकिलीचा असतां तुह्मास हक्क मिळणार नाहीं जे मुखत्यारपत्र तुह्मास प्रथम दिलें तें तारिख १० माहे मार्च सन १८७४ इसवी रोजीं रद्द केलें आहे हल्लीं ही नोटिस तुह्मास कळविण्याकरितां लिहि ली आहे त्याप्रमाणें समजून असलेले मुख त्यारपत्र आमचे आह्मास परत आपण द्यावें कळावे. तारिख १९ माहे जून सन १८७४ इसवी.

( सही ) सोनाजी नल्हद परभाजी देश मुख कुळकर्णी यासकडून मुखत्या र रामराव सदाशिव गुमास्ते

नोटिस—राघो बल्लाळ कृष्णपक्षी. राहणार पेठ अवरंगपूर प्रगणे पंचगव्हाण तालुके अकोट जिल्हा अकोला यास नो टिस देणार चतुर्भुज रघुनाथदास. राहणार पेठ मजकूर तालुके जिल्हे मजकूर यास कडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी आप ले घर पेठेंतील. एकंदर तसें चाळीस अठोन खांब पंचवाशी आहेत. याची चतुः सिमा पूर्वेस दरवाज्याचे पुढें रस्ता मैदान. प श्चिमेस रस्ता व भगत माहताचें देऊळ द क्षणेस सितारामभट मुळे याचे घर उत्तरेस विठ्ठलखपाईचें देऊळ या चतुःसिमेचे घर तुह्मी आह्मांस विकले व त्या बद्दलचे खरेदी खत. तारिख २० माहे एप्रिल सन १८६९ इसवी रोजीं लिहून नोंदून दिले आहे व सदर्हू घर आह्मी आपले ताब्यां त घेऊन तुह्मास त्या घरांत आह्मी भाड्या ने ठेविलें. त्याजबद्दल तुह्मी भाडेचिठ्ठी लि हून दिली तीही नोंदली आहे. घर खा ली करून देण्याविषयीं आह्मी तुह्मास ए क दोन वेळा सांगितलें असतां देतो ह्मणू न सांगत गेले परंतु खाली करून दिलें ना हीं सबब या नोटिशीनें तुह्मास कळविण्यां त येते कीं भाड्याचा आकार दरमहा रुप ये दोन प्रमाणें आमचे ताब्यातपासून आज तारखे पर्यंत झालेला व घर असे पंधरा दिवसांत सर्व निकाल करा व आह्मास घराची जरू र आहे सदर्हू मुदतींत रुपयाची आदाई व घर न मिळाल्यास रीतिप्रमाणें फिर्याद करून घराचे भाडें खर्चासुद्धां घेऊन घर ही खाली करून घेतलें जाईल कळावें ता रिख १९ माहे जून सन १८७४ इसवी.

( सही ) चतुर्भुज रघुनाथदास साहू रहाणार पेठ अवरंगपूर.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असे समजूं नये.

### लक्ष द्या.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि० वि० आपणाकडे खालीं लिहिले ल्या चार ओळी पाठविल्या आहेत त्यास येत्या अंकीं जागा द्यावी.

आज बहुतेक दिवसापासून कित्येक दे शहितेच्छु लोकांनीं आपल्या देशाचे क ल्याण होण्या प्रीत्यर्थ विद्या उचलिल्याचे ऐ कून व पाहून अत्यानंद होतो. लोकांचीं म नें देशाचे हित करण्याकडे लागावीं ह्मणू न वर्तमानपत्रकर्ते व कित्येक परोपकारी पुरुष यानीं कीर्तिने केलीं व आर्टिकल दिलीं व देत आहेत ही आनंदाचीच गोष्ट सम जली पाहिजे.

हा आनंद होत आहे तोंच इंदुप्रका शकर्त्यांनीं ‘परदेशस्थ लोक आपल्या दे शांत सुताच्या गिरण्या स्थापन करणार’ अशा मजकुराचें थोड्या दिवसांमागें आप ल्या पत्रांत आर्टिकल दिलें होतें; यामुळें कित्येक मनापासून देशहिताच्या कामात झटणाऱ्या पुरुषांची मनें उदास होऊन नोकळ देशाभिमानी लोक ह्मणूं लागले कीं, साऊं द्या हो यांस काय आहे? आप लें काय चालते. हे त्यांचे शब्द ऐकून स्वदेशाभिमान न बाळगणाऱ्या लोकांनही गोष्ट आनंदास कारण होऊन तेही ह्मणू लागले कीं, पाहिले ‘हिंदु लोक बारंभशूर’ हें खरें

आज आम्ही स्वदेशहितास मनापासून झटणाऱ्या देशबांधवांस असें सुचवितो कीं, मित्रहो, आपल्यास ईश्वरानें असा द याळू, न्यायी राजा दिला असतां सर्वथैव त्याचाच जिवावर मजा मारणें हें चांगलें काय? हे चांगलें नाहीं. असें समजून आपण स्वदेशहिताच्या कामीं झटण्यास उद्युक्त झाला तर हें काम पूर्णपणें शेवटा स न्या, मांचेस्टरच्या व्यापाऱ्यास आपण चिडविलें तर आतां पूर्णपणे शेवट करा. मांजाच्या मधल्यास मध ची इच्छा धरून जर तुह्मी दगड मारला तर सांभाळून मारा, नाहीं तर धरिलेला हेतु सिद्धीस न जातां उलटा माशांपासून त्रास होईल या चा विचार करा धरिलेलें काम शेवटा स न्या.

वऱ्हाडसमाचार कर्त्यांनीं ‘‘वऱ्हाडांत ए क तरी गिरणी व्हावी’ अशा मजकुराचें आपल्या पत्राच्या गेल्या अंकात आर्टिकल दिलें होतें त्या प्रमाणें आह्मीही शेट साव कार यांस त्यांनीं केलेल्या सूचनेकडे ल क्ष देण्याविषयीं विनंतीनें सुचवितो कीं, वऱ्हाडांत आपणा सारखे श्रीमान लोक ब हुत असून या कामास झटणारेही आहेत तेव्हां मागें सरू नका वर्तमानपत्र कर्त्याचे मुख्य कर्तव्यकर्म ह्मटले ह्मणजे अडा णी लोकांस सदुपदेश करून त्यांचीं मनें सत्कृत्याकडे लावावीं. त्या कर्तव्य कर्मा प्रमाणें आपल्या प्रिय समाचार कर्त्यांनीं आपल्यास केली ती सूचना रास्त असून आपण आपल्या वऱ्हाडांत गिरण्या स्थापन केल्यास व देशहिताच्या कामीं झटल्यास आपणास व आपल्या समाचार कर्त्यास भूषणाची गोष्ट आहे.

आपल्या खानदेशांतील ‘‘खानदेशवैभव कर्त्यांनीं’’ तर असे प्रकार लिहिण्याचे सोडलें. आतां शास्त्यांनीं आपल्या वैभवांत भाकडकथा, दुसऱ्या पत्रांतील उतारे घेण्याचे पूर्णपणे अमलांत आणिले. यांत त्यांस काय वैभव वाटत असेल तें नाटो.

मुंबईइलाख्यांत सर्व जिल्ह्यांपेक्षां आमचा खानदेश जिल्हा मोठा आहे. यांत शेट साहुकार यांची ही वस्ती बरी आहे परंतु यां तील लोक अशा कामाकडे लक्ष्य लावण्या त असमंजस आहेत. त्यास अशा प्रकार चा बोधकरण्याचें काम वैभवकर्त्यांचें असू न ते तसें करण्यांत वेळ न घालवू न‘‘ आह्मी खानदेशांतील वैभव’’ असा बाणा बाळगीत असतील तर व्यर्थ आहे. तुकारामानीं एके ठिकाणी असें ह्मटलें आ हे कीं, ‘निंदकाचें घर असावें शेजारी, निंदा घरोघरी व्हावी माझी’ यामप्रमाणें वैभव कर्त्यांनीं आमच्या लिहिण्याचा रोष न मानतां खरोखर आमच्या लिहिण्याचा विचार करावा आह्मी सत्य सांगत अस लो मग पात्र वेगळी गोष्ट आहे.

याप्रमाणें आमच्या प्रिय मित्रास हीच सूचना करून आह्मी आमरजा घेतों. मिती ज्येष्ट कृष्ण १४ मंदवासर मुक्काम अश्वत्थपुरी.

देशहितेच्छु.

मूर्तिजापूर—ता. १२ जून १८७४. रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

जयगोपाळ वि. वि. गेल्या अंकांत आप ले बातमीदारानें लिहिल्याप्रमाणें येथील लायब्ररी स्थापन झाल्याचा व कित्येक सभ्य गृहस्थांनीं मदत केल्याचा मजकूर सर्वथैव खरा आहे. व ही लायब्ररी दिवसाली आहे यांत संशय नाहीं. ही लहानपणी जर इतकी लोकप्रिय आहे तर कांहीं कालांनंतर ही नावारूपास चढेल यांत संशय नाहीं.

तारिख १० मिनहू रोजीं सायंकाळीं मे० हार्डिंग साहेब डेपुटी कमिशनर उमरा वती यांची स्वारी उमरावतीहून येथें रेलवे मार्गानें आली. त्यांचे बरोबर मे० लेन साहेब पोलिस सुपरिंटेन्डेंट उमरावती हे ही आले होते. हे उभयता काल प्रातः काळीं सर्व गाव पहाण्यास आले होते. गावांतील तहशिलकचेरी, हिंदुस्थानी व इंग्रजी मराठी शाळा त्याप्रमाणें लायब्ररी वगैरे ठिकाणें पाहून कोठेंच नाखुश झाले नाहींत. साहेब पायानींच चालत होते. एवढ्या मोठ्या हुद्याचा कोणी नेटिव कामगा दार असता तर त्याजला दोन अडीच तास फिरावयास मोठी पंचाइत पडली असती. परंतु डेपुटी साहेबांस मिजवास बिलकूल नाहीं. यांचें लोकोपयोगी का माकडे व मुख्यत्वेंकरून गरीब गुरिबाकडे लक्ष विशेष आहे—येथें एक महार मांग वगैरे नीच जातीचे लोकांनीं आपल्याकडे एक विहिर दुरुस्त करून ठेविली होती ती एथील चीफ कान्स्टेबल यांणीं मेरमा हितीनें हिंदूचे उपयोगाकरितां त्यांजकडून घेतली होती. ती महार मांग यांसच द्यावी ह्मणून डेपुटी कमिशनर साहेबांनीं एकवार हुकूम दिला असून ती विहिर म हारमांग यांस मिळाली नाहीं. ही बा तमी हार्डिंगसाहेबास कळतांच त्यांणीं ताब डतोब विहिर गरीब महारलोकांस देवविली. असे साहेब बहादूर यांचें बारीक गोष्टीकडेही लक्ष आहे.

लायब्ररीमध्यें पुष्कळ गोष्टींची अजून जरूर आहे हें लक्षात आणून १० रुपये लायब्ररीचे सेक्रेटरी यांसजवळ दिले व मी हें डोनेशन दिलें आहे ह्मणून बोलले. स दर्हू रुपयांत लायब्ररीकरितां हांडी एक व लाकडी सामान आणण्याचा मंडळीचा बेत आहे. लायब्ररी ह्मणजे काय हें को णास ठाऊक नव्हतें. आतां दहा वीस मंडळी तींत येऊन बसते सबब दरमहा वर्गणी वाढण्याचा संभव आहे.

एथील इंग्रजी शाळा एथील हल्लींचे हेड मास्तर रा० नारायणराव यांचे कार

[illegible] असून देखील कमिशनर [illegible] केले होते त्या [illegible] ते [illegible] होऊन हल्ली पुष्कळ [illegible] सुधारणी आहे ह्मणून [illegible] दर्शित केले. ह्यावरून [illegible] कीं [illegible] मास्तर लोक बरी [illegible] येतात. नारायणराव हेड मास्तर [illegible] असल्यामुळें [illegible] नाहीत कीं काय, असा संशय [illegible] पुढे आपल्या पत्रीं कळविले आहे ते वाचकांस स्मरत असेल पण हल्लीं त्यांची शाळा सुधारत चालली आहे यावरून व ज्ञापनरीचेहि कामीं थोडी बहुत मेहेनत करून सेक्रेटरीचें काम त्यांनी पतकरले आहे यावरून अनुमान करतां येते कीं हे सरकारी कामाकडे व सार्वजनिक कामाकडे श्रम घेऊन झटत आहेत. सर्व लोक असे झटून आपलीं कामे करतील व उदार लोक द्रव्याश्रय देतील तर देशसुधारणेचीं कामें टेलिग्राफा प्रमाणें तडीस जातील ही गोष्ट निर्विवाद आहे. एडिटरराव आतां या वेळेस पुरे. जयगोपाल.

एक चिकित्सक

## यंत्राची अवश्यकता.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.—

वि. वि. महाराज पुढील मजकुरास कृपा करून आपले पत्रीं जागा मिळाल्यास मी आपला मोठा आभारी होईन

सांप्रत आपले लोकांत देशी कापड वापरावें ह्मणून बरीच आवड येत चालली आहे. व तें मिळण्याविषयीं कांहीं कांहीं ठिकाणीं दुकानेंहि जहाली आहेत. परंतु त्या दुकानांतून जें कापड असतें त्याचें सूत मात्र विलायती असतें. ह्यामुळें देशी ह्या शब्दास कमीपणा येतो. त्यास नाइलाज आहे. कारण देशामध्यें सुताचे यंत्र नसल्यामुळें तें मिळत नाहीं. पुणे वगैरे कित्येक ठिकाणीं सुताचें यंत्र व कापड विणण्याचे माग तयार होत आहेत. ह्मणून ऐकतों परंतु ते पूर्णत्वास आले किंवा नाहीं हें कांहीं समजत नाहीं. जर त्यांत कांहीं विपरित गोष्ट झाली असेल तर हिंदुस्थानावर जीं अनिष्ट अभ्रें वसलीं आहेत तीं नष्ट होतील असा संभव मुळींच दिसत नाहीं. हिंदुलोक देशी कापड वापरावें ह्मणून विच्यार करित आहेत ही बातमी इंग्रज लोकांस समजतांच त्यांनीं विलायतेस तीस लक्ष रुपयांचें भांडवल जमा करून आपला व्यापार वृद्धिंगत व्हावा ह्मणून हिंदुस्थानांत जिल्ह्या जिल्ह्यामीं गिरण्या घालण्याचा निश्चय केला आहे. केवढी ही त्यांची व्यापाराविषयीं दक्षता? आमच्या लोकांनीं तर व्यापाराविषयीं दुर्लक्ष केलें आहे. देशाची संपत्ती नाहींशी होऊन लोक भिकेस लागण्याचा जरी समय प्राप्त झाला आहे तरी श्रीमान व विद्वान लोक तिकडे लक्ष पुरवित नाहींत. कोणी कांहीं नवीन यंत्र शोधून काढलें तर श्रीमंत लोक त्यास द्रव्याची मदत करित नाहींत व विद्वान लोक त्यांस सुधारणा करण्याविषयीं झटत नाहींत. ह्यामुळें तें पूर्णत्वास न येतां कर्त्याचें धैर्य मात्र खचवितें. पत्रकर्ते महाराज ह्यांकडे शेट सावकार, श्रीमान व रा. रा. केरोपंत नाना छत्रे आदिकरून विद्वान लोक लक्ष पुरवून नवीन काढलेलीं सुताचीं यंत्रें व मागही पूर्ण दशेला लौकर आणण्याकरितां आपला उदार आश्रय देतील तर हिंदुस्थानच्या संपत्तीस जो पुष्कळ दिवस क्षयरोग जडला आहे त्यास त्यांनीं आपल्या परिश्रमाच्या योगें करून यंत्ररूपी रसायण पाजिल्यानें नाहींसा केल्याचें श्रेय त्यांस प्राप्त होईल. परंतु हिंदुस्थानाचें असें नशीब उदयास कोठून येणार? नवीन यंत्रें तयार होत आहेत ही वार्ता ऐकिल्यापासून वऱ्हाडांत त्यांची स्थापना व्हावी ह्मणून मी आज पुष्कळ दिवस इच्छा करित आहे परंतु तीं यंत्रें पूर्णत्वास येऊन जनास त्याचीं फळें फार लौकर व रुचकर मिळतील असें कोणीहि सांगत नाहीं व कोणत्याहि वर्तमानपत्रांत त्याविषयीं उल्लेख आढळत नाहीं. ह्यामुळें दिवसोंदिवस माझे आशेचा भंग मात्र होत चालला आहे. एडिटरराव पत्र विस्ताराच्या भीतीस्तव पुरे करितो. मला ह्या विषयीं आणखी पुष्कळ लिहिणें आहे आपली मेहरबानी असल्यास पुढें लिहीन कळावे मि० ज्ये. क. ११ श. १७९६

एक यंत्राचा अपेक्षित.

वऱ्हाडसमाचार

मिती अधिकआषाढ शुध्द ७ शके १७९६

## कमिशनर आफिसांतील जागा.

वऱ्हाडाला जुडिशियल व रिविन्यु असे दोन कमिशनर नुकतेच केले हें आमच्या वाचकांस ठाऊक आहेच; पण त्यांच्या हातांखालच्या आफिस नेमणुका अजून कायम झाल्या नाहींत. त्या हिंदुस्थान सरकारच्या पंततीस गेल्या आहेत त्याला बरेच दिवस झाले. कमिशनर मुकर केले त्या वेळीं त्यांच्या आफिसांतील नेमणुका मुकर केल्या असत्या तर कामाची हरकत झाली नसती व पावसाळ्यांत बदली होऊन जाणारा येणारांचा त्रास व गैरसोय हीं चुकलीं असतीं, पण नेटिवांच्या अडचणीकडे पहातो कोण? असतु.

ज्या नेमणुका पास होण्यास गेल्या आहेत त्या मोठ्या चमत्कारीक आहेत असें ह्मणतात. ह्मणजे रिविन्यु कमिशनर आफिसांतील हेड क्लार्काचें काम वाढलें ह्मणून त्यांस ३५० किंवा ४०० रुपये पगार होण्याची शिफारस झाली आहे, पण त्याप्रमाणें जुडीशियलकडील क्लार्क आफ धि कोर्टाचें काम वाढलें आहे तरी त्याचे २०० रुपये पगारावर एक रुपयाही वाढविण्याची शिफारस झाली नाहीं असें ह्मणतात. याचप्रमाणें रिविन्यु कमिशनरकडील क्लार्क आफ धि कोर्टास काम कमी झालें ह्मणून ती जागा एकदम १०० रुपये पगाराची करण्याविषयीं शिफारस झाली परंतु त्याचप्रमाणें जुडिशियल कमिशनरकडील हेडक्लार्कांचें काम कमी झालें ह्मणून त्या जागेचे तीनशांचे पावणेतीनशे करण्याची शिफारस झाली नाहीं या व्यवस्थेविषयीं लोक कुरकुर करितात व हेडक्लार्क क्रिश्चन व क्लार्क आफ धि कोर्ट नेटिव ह्मणून असा भेद झाला असावा अशी त्यांची कल्पना आहे. पण तींत कांहीं अर्थ नाहीं. आह्मी ह्मणतो ही नजरचूक असावी. जर जुडिशियलकडे तीनशें रुपये यांच्या हेडक्लार्काचें कांहीं काम नसेल तर त्यांना एकस्ट्रा असिस्टंट कमिशनरची जागा द्यावयाची होती. व ती जागा २५०ची करून रिविन्युकडील क्लार्क आफ धि कोर्ट यांस दिली असती तर दोघांसही प्रमोशन झाले असतें असें लोकांना वाटतें, पण सरकारास वाटेल तें खरें. त्यांचे जे बेत असतील तेच बहुधा अमलांत आले असतील. पण कदाचित तसें होण्यास अवकाश असेल तर आतां किंवा पुढें कधीं तरी या सूचनांचा विच्यार होईल तर फार चांगलें होईल.

## उमरावतीस कापडाच्या गिरणीची घाटाघाट.

आमचे समजण्यांत असे आलें आहे कीं, उमरावतीस मि० कालीन साहेब मुनसिपल कमिटीचे सेक्रटरी यांनीं सुताची व कापडाची एक गिरणी त्या ठिकाणीं उभारावी याविषयीं प्रयत्न चालविला आहे. इंग्लिश व नेटिव व्यापारी यांच्या मेळानें हें काम करावें असा त्यांचा विच्यार आहे त्यांनीं नेटिव व्यापाऱ्यांची एक दिवस सभा भरविली होती व त्यांनां ती गोष्ट समजून सांगितली. व सात असामी नेटिव डायरेक्टर नेमिले. व एक प्रास्पेकटस तयार केलें. त्यांत त्या मंडळीचें तीन लक्ष रुपये भांडवल असावें व १०० रुपयांचा एकेक शेर असावा असें ठरविलें आहे. त्याचा आतां परिणाम काय होईल तो पाहावा. गावांतील मोठमोठाले नेटिव व्यापारी ज्यांनां डायरेक्टर करण्याचा विचार आहे ते ह्मणतात कीं आह्मी या कामांत एक पैसाही भांडवल ह्मणून घालणार नाहीं. मग हें काम होणार कसें तें समजत नाहीं. शेट रामविलास पोकरमल ह्मणून एक सावकार आहेत ते या कामीं बरेंच झटत आहेत व भांडवल मिळवून देणार आहेत असें वर्तमान आहे. त्याप्रमाणें घडून आल्यास फार चांगलें होईल. पण बाकीच्या साहूलोकांचा निग्रह ऐकून आह्मास फार विस्मय वाटतो. ज्यांनां दात आहेत त्यांनां चणे नाहींत, व ज्याजवळ चणे आहेत त्यांना दात नाहींत अशासारखा हा प्रकार झालेला आहे. परमेश्वरानें ज्याना पैशाची सुस्थिती दिली आहे ते प्रस्तुतचा प्रसंग ओळखण्याचे कामीं अंध आहेत. व जे तशा कामीं चांगले डोळस आहेत ह्मणजे ज्याना खरी दृष्टी आहे त्यांनां पैशाचें चांगलें स्वास्थ्य नाहीं. आणि हीं कामें तर लक्षावधि रुपयांचीं आहेत. तेव्हां साधारण लोकांच्या हातून होणार कशीं तें उघड दिसत आहे. असतु. इतक्यानेंच आह्मी निराश होत नाहीं. एक दोन आठवड्यांत त्यामंडळीची पुन्हा सभा भरणार आहे व त्या प्रसंगाला ते आह्माला बोलावणार आहेत ते व्हा तसें झाल्यास आह्मी आपले सर्व विच्यार त्या सभेला खुलासानें कळवू ह्मणून आतां पुरे करितो.

## होळकर सरकारची राज्यव्यवस्था.

श्रीमंत तुकोजीराव बाबासाहेब होळकर हे स्वतः शहाणे असून राज्यकारभार मोठ्या दक्षतेनें चालवितात ही गोष्ट वारंवार वर्तमानपत्रांतून येत गेली आहेच. परंतु नुस्ते शहाणे आहेत, राज्यकारभार मोठ्या दक्षतेनें चालवितात इतकें ह्मटल्यानें त्यांचें शहाणपण कसें आहे व राज्यकारभार चालवितात त्यांत दक्षता कोणती दाखवितात यासंबंधींचा कांहीं बोध होत नाहीं. याजकरितां त्यांचे कारकीर्दीतील सांप्रतची राज्यरीति कशी आहे? होळकराची दक्षता कोणत्या प्रकारची असून प्रजेची स्थिति काय आहे या बाबदींत आह्मी आपले वाचकांस थोडीशी माहिती देतो.

'कुलेन शीलेन गुणेन कर्मणा' कोणाही मनुष्याविषयीं आपलें मत देतांनां त्याचें कूळ, त्याचें शील, त्याचे गुण, आणि त्याचें कर्म ह्मणजे वागणूक याजविषयीं विच्यार करण्याची प्रवृत्ती आहे. या न्यायानें श्रीमंत बाबासाहेब होळकर यांच्याविषयीं विच्यार करूः—होळकराचें कूळ प्रसिद्धीस येऊन सांप्रतची स्थिति त्यांस प्राप्त होण्यास केवळ त्यांचें शौर्यच कारण झालें आहे. व पेशव्याचे राज्यांत होळकर हे मोठे पटाईत योद्धे असें वाखाणले जाऊन त्यांनां जें राज्य मिळालें तें त्यांच्या तरवारीच्या बळावरच मिळालें आहे. हें यांच्या कुळाविषयीं झालें. त्यांचें शील पाहिलें असतां ते स्वभावानें फार सौम्य असून राज्याधिकाराचा डौल ह्मणून त्यांनां दाखविण्याची मोठी चौंड आहे. भाषण फार मिष्ट असून दुसऱ्याचें अंतःकरण नेहेमीं ते फार प्रफुल्लित ठेवित असतात. आतां त्यांचे गुणः—त्यांनां इंग्रजी, मराठी, फारशी, इत्यादि लिपि लिहितां व बोलतां येतात. संस्कृतांत त्यांचा बराच अधिकार आहे. ह्मणजे धर्मशास्त्राचा किंवा ज्योतिषशास्त्राचा विषय निघाल्यास बाबासाहेब स्वतः पूर्वपक्ष उत्तरपक्ष करित असतात असें ऐकण्यांत आहे. व थोडक्यांत इतकें ह्मटलें तर बस्स होईल कीं, त्यांनां दुर्व्यसन कोणतेंही नसून विद्येची व विद्वानांची फार प्रीति आहे; आणि नेहेमीं त्यांचा रिकामा वेळ वर्तमानपत्रें वाचण्यांत किंवा नवीन माहिती करून घेण्यांत जात असतो.

आतां शेवटचें पहाणें त्यांचें कर्मः—ह्या ठिकाणीं त्यांचे राज्यकारभारांत त्यांची वर्तणूक हें घेऊन आह्मी बोलतो. होळकर सरकारचें राज्य इतर मांडलिक राज्यांप्रमाणें आहे. यास्तव इतर संस्थानांतील अंदाधुंदी जशी कांहीं आपण वारंवार ऐकतो व त्याजवरून जसें कांहीं आपण सर्वकाळ दुःख मानतो त्याप्रकारची अंदाधुंदी होळकरशाईत नाहीं असें ह्मटलें असतां अतिशयोक्तीचा दोष येणार नाहीं.

होळकर सरकार श्रीमंत बाबासाहेब

स्वभावतः फार दक्ष व धूर्त आहेत. राज्यकारभार स्वतः पहातात व गरीब लोकांची दाद स्वतः घेतात यामुळें ते आपल्या प्रजेस प्रिय आहेत. त्यांचे राज्यांतील प्रजा इतर प्रजेहून बरीच सुखी आहे असें ह्मणण्यास कांहीं बाध दिसत नाहीं.

त्यांनीं राज्यकारभारसंबंधीं आपल्यास मदत मिळण्यासाठीं नव्या चालीचे प्रधान संग्रही ठेविले आहेत. त्यांचे नाव सर टी माधवराव आहे. माधवराव हे इंग्रजी विद्येत निष्णात, अनुभवीक, पोक्त व थोर मनाचे आहेत. माधवरावजी आजपावेतो अशींच कामें करीत असून त्रावणकोरचे संस्थान ज्यांचें हातून अगदी वर्णनीय स्थितीस येऊन पोचलें होतें. तेच हे माधवराव होत. माधवरावजी व बाबासाहेब यांचें सदोदित ऐक्य राहील तर माधवरावजी होळकर सरकारचे राज्याची व्यवस्था सुधारलेल्या व्यवस्थेप्रमाणें करून सोडतील यांत संशय नाहीं.

होळकर सरकारांनीं आपले प्रजेस इन्साफ वक्तशीर व चांगला मिळावा ह्मणून न्यायखातें अगदी स्वतंत्र करून त्या कामीं मोठमोठाले विद्वान अधिकारी नेमिले आहेत.

होळकर सरकारांनीं आपल्या प्रजेस विद्यामृतपान व्हावें या परोपकारबुध्दीनें तें खातें स्वतंत्र करण्याचा विचार मनात आणिला असून त्या कामीं चांगले विद्वान अधिकारी ठेविले आहेत.

प्रजेच्या वागणुकींत कांहीं धरबंध असावा व सर्वांस सारखे नियम असावेत ह्मणून होळकर सरकार नेमिलेले वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हातून आपले राज्यांत स्वल्प रीतीनें अमलांत येतील असे कायदे करवीत आहेत.

याचप्रकारच्या इतर व्यवस्थाही होत असून सरकार स्वतः सर्वगोष्टी पहातात, विच्यार करितात येणेंकरून जानांत्यांना आपापले काम मोठ्या उत्कंठेनें व तत्परतेनें करण्याचा हुरूप येऊन सर्वांस सरकारची दहशत आहे व हेंच प्रजेच्या सुखास कारण होत आहे असें आम्ही ह्मणतो.

आपल्या हिंदुस्थानांत जे राजे आहेत त्यापैकीं कोणी स्त्रीलंपट, कोणी डामडौली, कोणी अव्यवस्थित चित्ताचे असे आहेत. व यामुळे त्यांचीं राज्यें लवकरच रसातळास जाऊन पोचतील कीं काय, अशी भीति आहे. पण दुसरे कितीएक आहेत ते मोठे दक्ष, चतुर व काळ देश वर्तमान पाहून वागणारे असे आहेत. यामुळें त्यांचीं राज्येंही बिनघोक चालली आहेत. आणि त्यांच्या मनसुबेविषयीं लोकांनां शाश्वती वाटते. ह्या पैकीच होळकर सरकारचे राज्य हे [illegible] होय. यास्तव त्याचे राज्यांत उत्तम सुधारणा होणें व त्यांचे प्रजेनें सुखी असणें आणि त्यांचे राज्यव्यवस्थेचा दुसरे लोकांनीं कित्ता घेणें हे त्यांस मोठे भूषणास्पद आहे. आतां होळकरसरकार स्वतः दक्ष असून चांगली सुधारणा चहाणारे आहेत यास्तव त्यांणी जी कांहीं नवीन व्यवस्था केली आहे तींत अधिक सुधारणा करावी व ते आहेत त्यापेक्षां अधिक लोकप्रिय व्हावे अशी आमची इच्छा आहे; आणि तशा हेतूने त्यांनां आह्मी कांहीं सूचना करण्याचे मनांत आणिले आहे पण आज आरंभाखालींच जागा आणि वेळ निघून गेली ह्मणून पुढील अंकात त्या लिहू. कृपा करून त्या पहाण्याचे व त्याविषयीं विच्यार करण्याचे होळकरसरकार व त्यांचे मंत्री मनावर घेतील तर फार चांगलें होईल. व त्याप्रमाणें बंदोबस्त झाल्यास आह्मी आपल्या देशाची नवीच चाकरी बजाविली असें मानू

## वऱ्हाड.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं रा. रा. आत्माराम भिकाजी एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांजवर रजिस्टर खात्याच्या संबंधानें कांहीं आरोप येऊन कमिशन नेमून चौकशी झाली होती तिचे कागदपत्र रेसिडेंट साहेबाकडे गेले होते ते पाहून त्यांनीं आत्माराम यास त्या कामांत निर्दोषी ठरविलें. सदर्हू गृहस्थ आजारीपणाच्या सहा महिन्यांच्या रजेवर आहेत ती रजा पुरी झाली ह्मणजे ते आपले कामावर रुजू होतील.

—०००—

मुंबईच्या टाइम्स पत्रांत व त्यावरून दुसऱ्या कित्येक मराठी पत्रांत असें प्रसिद्ध झालें आहे कीं मे. दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब वऱ्हाडांतील असिस्टंट कमिशनर हे नांदुऱ्याच्या स्टेशनावर रिकाम्या असलेल्या पहिल्या क्लासच्या गाडींत बसावयास जात असता गार्डानें त्याशीं कांहीं दांडगाई केली. तिजबद्दल त्यानीं मि. कादर साहेब ट्राफिक म्यानेजर यांस लिहिले आहे व त्याकडून बंदोबस्त न झाल्यास ते न्यायाच्या कोर्टांत रा. बा. शंकर पांडुरंग प्रमाणे फिर्याद करणार आहेत. ही गोष्ट आमचे दस्तुर बहिमनजी साहेब यांजकडून आह्मांस कळली असती तर बरें झालें असतें. असतु. पुढील विच्यार तरी ते आह्मास समग्र कळवितील असें आह्मी इच्छितो.

—०००—

या आठवड्यांत चार दिवसांत पर्जन्य सात इंच पडला. व नदीला एक दोन पूरही येऊन गेले आणि आतां पेरण्याचीं कामें झपाट्यानें सुरू झालीं ह्मणून लोक फार खुश झाले आहेत.

—०००—

रा. रा. परशराम सखाराम गुप्ते उमरावतीचे माजी क्लार्क आफ धि कोर्ट आपले कामा निमित्त हैद्राबादेस गेले आहेत असें कळतें.

—०००—

वणी जिल्ह्यात एक एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर असावा असा ठराव झाला व रा. रा. आत्माराम भिकाजी यांनीं रजेवरून परत आल्यावर तिकडे जाऊन कामावर रुजू व्हावें असा त्यांस हुकूम मिळणार असें ह्मणतात. वा! ही आजाऱ्याची मोठीच सोय!

—०००—

मि० इनअप साहेब असिस्टंट कमिशनर यांनीं वऱ्हाडच्या कापसाबद्दल वार्षिक रिपोर्ट केला त्याची प्रत आह्माकडे पाठविली आहे तींतील मजकूर आह्मी आपले वाचकांकरितां पुढील अंकात घेऊ.

—०००—

क्या० मेकंजी साहेब अकोल्याचे डिपुटी कमिशनर चिखलदऱ्यास गेले होते ते गेल्या रविवारीं परत आले.

—०००—

जुडिशियल कमिशनर साहेब उमरावतीहून आपले क्लार्क आफ धि कोर्ट या सहवर्तमान काल सायंकाळीं येथें आले.

—०००—

विद्याखात्याचे डायरेक्टर डा० लिंकर साहेब काल येथें आले.

—०००—

रा.रा. श्रीराम भिकाजी उमरावती हायस्कूलचे हेड मास्तर येथें आले आहेत

शिगावाहून पत्र आल्यावरून कळतें कीं तिकडे पर्जन्य फार चांगला पडला— ९ वे तारखेस स्टेशनावरील एका खिश्ची नोकराचा बारा वर्षांचा मुलगा झाडावरून पडला व त्याचा हात मोडला. तो नेटिव डाक्टरांनीं पुन्हा बसविण्याचा इलाज न चालल्यामुळें कापून काढिला— शाळेकरितां ७००० रुपयांची नवीन इमारत झाली तींत १३ वे तारखेस शाळा नेली— डिपुटी इन्स्पेक्टर रा. रा. वामनराव बाळाजी तेथें जाऊन यांनीं तीन दिवस शाळेची परिक्षा घेतली. ६६ मुलांपैकी ४० ची परिक्षा झाली व त्यांत २३ मुलें स्टँडर्डमध्यें पास झालीं – रॉली ऑण ब्रदर्स या कंपनीचा दुसरा एक कुलप्रेस पुढील हंगामापासून येथें सुरू होणार आहे.

—०००—

अकोटाहून पत्र आल्यावरून कळतें कीं तिकडे पाऊस फार चांगला पडला— मि० मार्देसर दिनशाजी तहशिलदार कित्याबाहेर रहात होते ते कचेरींत पूर्वीं ज्या ठिकाणीं लायब्ररी होती तेथें रहावयास आले आहेत. तेणेंकरून पाहिजे ते वेळेस कचेरीला मुष्कील पडत नाहीं. हे स्वभावानें फार चांगले असून यांची काम करण्याची शैलीही उत्तम प्रकारची आहे. हैदराबादेकडून एक सरदार इकडे आले होते त्यांची सरबराई उत्तम प्रकारें यांनीं केल्यावरून ते खुश झाले व एक सोन्याचें कडें व मोत्याची कंठी त्यांनीं यांनां बक्षीस दिली. असें बक्षीस घेण्याची सरकारी नोकरांस मनाई आहे ह्मणून यांनीं कमिशनर साहेबाची परवानगी घेऊन नंतर देणगी स्वीकारिली.

येथें एक स्टांप वेंडर आहे तोच दस्त ऐवज लिहितो. ही बहिवाट कायदेशिर आहे काय?

## लेखक पाहिजेत.

शिळाप्रेसाचे कामाकरितां दोन लेखकांची जरूर आहे. ज्यांचीं मोडी व बाळबोध अक्षरें चांगलीं असतील आणि ज्यांनां प्रेससंबंधी माहिती चांगली असेल त्यांनीं आह्मांकडे अर्ज करावे पगार १२ रुपये पासून २० रुपये पावेतो लायकी पाहून मिळेल. कळावे तारीख २० माहे जून सन १८७४ इसवी

खंडेराव बाळाजी फडके
व० स० चे मालक

### मागाहून आलेल्या नोटिसा

नोटिस— रा. जयराम गणेश वकील मुक्काम उमरावती यांस नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी माझे मोकदम्यात वकील होते पण आतां काम करण्याचे नाकारलें सबब माझे पुराव्याचे कागदपत्र तुह्मापाशीं आहेत ते नोटिस पोचल्यापासून दोन दिवसांत रा० नारायण सखाराम वकील यांजपाशीं द्यावे व त्याची पावती घ्यावी. असें न कराल तर नुकसानी होईल ती कायदेशीर रीतीनें तुह्मापासून भरून घेतली जाईल कळावे तारीख १८ माहे जून सन १८७४

(सही) सारजा मर्द बाळकृष्ण भुसारी
इचे हातची निशाणी नांगर.

नोटिस बुधाजी वलद तुळजाजी पाटील वस्ती मौजे दिनोडा प्रगणे दहीहांडा तालुके अकोट यांस शिवलाल गुलाबचंद मारवाडी वस्ती दिनोडा प्रगणे दहीहांडा तालुके अकोट यांजकडून अशी नोटिस देण्यात येते कीं, तुह्मी गुमाणीराम अमेदीराम साहू दुकान दिनोडा यांजपासोन कर्जाऊ रकम घेत आले ती दुकान आह्मी सर्व असम्याचे खातेबाकी सुद्धां विकत घेतली सबब तुह्मास नोटिस दिली जाते की सदर्हु दुकानची खातेबाकी ऐन ३६०।–।।। व्याजाबद्दल २२९।। व गहाणखतें संवत १९२९ सालाबद्दल ९७ शिवाय व्याज असे एकंदर रकम ९४६ पावणेबवदाआणे तुह्माकडेस येणे असोन एक दोन वेळा तगादा केला परंतु देऊ दिलाऊच्या गोष्टी सांगितल्या परंतु सदरील रुपयाची काही आदाई केली नाहीं सबब नोटिस दिली आहे तर ही नोटिस पावल्या पासोन पंधरा दिवसाचे आंत आमचे दुकानी येऊन आदाई करावी सदरील मुदतीप्रमाणें तुह्मी न कराल तर रीतीप्रमाणें दिवाणींत दावा करून नोटिसीचे खर्चासुद्धा आदाई करण्याची तजवीज होईल कळावे तारीख १९ माहे जून सन १८७४

(सही) शिवलाल गुलाबचंद मारवाडी
दस्तुर रामलाल गुमास्ते

## वर्तमानसार

विलायतेस पार्लमेंट सभेंत हिंदुस्थानचे लोक मेंबर असावे अशाबाबे पुण्याच्या सार्वजनिक सभेनें खटपट करून एक अर्ज तयार केला तो गुरुवारचे ज्ञानप्रकाशांत छापला आहे वाचकांनीं वाचून पहावा.

रेवरेंड नारायण शेषाद्री विलायतेस गेले होते ते परत आले.

रा. सा. सखाराम कृष्ण शेट मुनसफ यांस वसयीस नेमले.

अलाहाबादेस स्टांप कमिशनरचे हेड असिस्टंट मि० ब्लांकेट यांस चोरीचे संशयावरून पकडलें आहे.

कपुरथळ्याचे राजे आजारी आहेत तोंपर्यंत जलंधरचे कमिशनरांनीं त्यांचा राज्य कारभार पहावा असें ठरलें आहे.

दुष्काळामुळें ढाका एथील न्हाव्यांनीं हजामतीचे दर वाढविले आहेत.

मुंबईस आलेक्झांड्रा ह्मणून कापडाची गिरणी आहे. तिला १००० चात्या व १०० माग नवीन जोडणार आहेत. व याचप्रमाणें निवराज बाळू यांच्याही गिरणींत अधिक चात्यांची व मागांची जोडणी होणार आहे.

मद्रासइलाख्यांत एका आफिसांतील मुख्य आपले हाताखालचे नोकरास कामावर येण्यास उशीर लागला ह्मणजे दरमिनिटास एक रुपया दंड घेत असतात. एक पत्रकर्ता ह्मणतो कीं कलकत्यास व मुंबईस अशी वहिवाट सुरू केली, तर बहूत कारकून लोकांस मुळींच पगार द्यावा लागणार नाहीं.

मद्रासइलाख्यांत, बंगालइलाख्यांत व मुंबईइलाख्यांत सर्वत्र चांगला पाऊस पडला.

[illegible] वाड्याच्या ताळेबंदावरचें लोणी चाट[illegible] असें एखादा अत्यंत लोभी मनुष्या[illegible] करण्याकरितां लोक ह्मणत असतात. असलेंच एक उदाहरण नुकतेंच प्रत्यक्ष घडून आल्याचें आह्मी ऐकलें. डा. [illegible] दाजी यांच्या शवावर घालून नेलेली [illegible] स्मशानांत शेणवी जातीच्या उपाध्या[illegible] कोणा भिरडू नांवाच्या एका शेणवी भटाळाच देवविली. हें खरें असेल तर देणारे व घेणारे या दोघांसही हें सर्वथा अप्रशस्त व अत्यंत निंद्य आहे. शय्यादानादि[illegible] याहूनही हें निंद्य होय. पंचवीस तीस पैशांचा लेरा असला ह्मणजे बं:, तो देऊन टाका नेल्या अंत्यजाला. आणि पंचवीस तीस रुपयांची शालजोडी असली ह्मणजे हा स्वजाति द्विजाला हरहर! काय आह्मी ब्राह्मण इतके लोभी व भिकार झालों! इतका नामध्ये अंत्यजाशींही अहंपूर्विका करण्यास आह्मी लाजूं नये! आतां अंत्यज लोक आह्मां ब्राह्मणांची टर उडवतील तर त्यांचा काय दोष आहे! आह्मी असें इच्छितों कीं, हा असा पहिला तसा हाच अशा प्रकारचा शेवटचा प्रसंग असो.

मद्रास येथें पुनर्विवाहाच्या सत्कृत्यास उत्तेजन मिळावें या हेतूनें सभा होऊन एक सरक्युलर तेथील हिंदु लोकांत फिरत आहे [illegible] या कामांत कायदे कौन्सिलचे हिंदु मेंबर यांनी पुढारीपणा घेतला आहे असें मद्रास स्टांडर्डवरून कळतें.

विद्वज्जनसमूह— विलायतेंत या सालीं पूर्वेकडील प्रदेशांतील गोष्टीविषयीं माहितगार अशा सर्व ठिकाणच्या विद्वज्जनांचा समूह जमणार आहे. त्या प्रसंगीं हिंदुस्थानांतील विद्वान गृहस्थ बंगाल्यांपैकीं बाबू राजेंद्र लालमित्र व प्रोफेसर महेशचंद्र विद्यारत्न आणि मुंबई कडील डा. भाऊ दाजी व प्रोफेसर रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे असावे ह्मणून या कामाकरितां नेमलेल्या मंडळीच्या अध्यक्षांनीं सुचविलें. त्याजवरून स्टेट सेक्रेटरी यांजकडून या गृहस्थांस प्रवासाबद्दलचा खर्च देऊन येण्याविषयीं सुचविलें ह्मणून इकडील सरकारास लिहून आलें आहे असें हि. पे. वरून कळतें. आतां डा. भाऊ तर गेलेच; परंतु बाकीचे गृहस्थ काय करतात तें पाहावें. इं. प्र.

कुलाब्याच्या दांडीसमोर समुद्रामध्यें मनोरा बांधिला आहे त्यास प्रॉंग—लाइट हौस असें नांव दिलें आहे. ह्या मनोऱ्यावर तारीख १ माहे नवंबरपासून बत्ती लावण्याची सुरवात होणार आहे. पुढें कुलाब्याच्या दीपदांडीवर बत्ती लावण्याची बंद होण्यांत येणार आहे असें ह्मणतात.

ब्राह्मविवाह—गेल्या ज्येष्ठशुद्ध ९ चे दिवशीं आसाम प्रदेशांतील गोवालपाडा येथें नवीन विधिनुसारें एक ब्राह्मविवाह झाला, नवऱ्याचें नांव श्रीयुक्त मथुरचंद्रनाथ हालदार. हे जातीचे ब्राह्मण असून विक्रमपुरचे राहणारे आहेत; नवरीचें नांव श्रीमती हरिसुंदरी उमर वर्षें १८ असून जातीची ब्राह्मणीण होती. हल्लीं ही बाई बगुडा एथील मुलींच्या शाळेवर शिक्षक आहे [illegible] लहान असतांच तिचा पहिला नवरा [illegible]. पुरोहिताचें काम गोवालपाडा ब्राह्मसमाजाचे उपासक श्रीयुक्त बाबू प्रसन्नकुमार घोष यांनीं केलें. [illegible] बरेच लोक आले होते असें धर्मतत्त्व [illegible].

दुष्काळामुळें रेल्वे कंपन्यांस चांगला नफा झाला. सिंध, पंजाब व दिल्ली रेल्वे कंपनीस यंदाच्या जानेवारीच्या १ल्या तारखेपासून ता० ४ एप्रिल पर्यंत तीन महिन्यांचे एकंदर साडेतेवीस लक्ष ६० उत्पन्न झालें. गतवर्षीं या रेल्वेस या तीन महिन्यांत साडेचवदा लक्ष ६० उत्पन्न झालें होतें. तसेंच ईस्ट इंडियन रेल्वे कंपनीस सन १८७३ च्या पहिल्या तीन महिन्यांच्या उत्पन्नापेक्षां यंदाच्यांत सुमारें बत्तीस लक्ष अधिक उत्पन्न झालें असें कळते.

काशीतील कित्येक लोकांनीं सभा भरून एतद्देशीय कापड वापरण्याचा ठराव केल्याचें समजतें. सु. प्र.

अल्हाबादेपासून पंचवीस कोसांवर एक गाव आहे. तेथें बारा वर्षांचे मुलास महारोगाचा उपद्रव होऊन तो मेला. नंतर त्याचे कमरेस मडकीं बांधून आईबापांनीं त्यास गंगेंत टाकून दिलें. सात दिवसांनीं पोलिसास एक प्रेत घाटावर आढळलें. त्यानंतर कावळे तोडण्याकरितां येईत व ते वारण्या विषयीं तें कांहीं यत्न करीत आहे असें त्यांचे दृष्टीस पडलें. नंतर तें प्रेत उचलून इस्पितळांत नेलें व तें मूल बरें होऊन घरीं आलें. जिवंत मुलगा नदींत फेकून दिला ह्मणून बापावर पोलिसांनीं फिर्याद चालविली होती पण शाबीद न झाल्या मुळें त्यास सोडून दिलें.

मुंबईचे सिनियर माजिस्ट्रेट मि० जान कानन हे आजारी असल्या कारणानें तीन महिन्यांची रजा घेऊन युरोपांत गेले होते. त्यांची प्रकृती तेथें [illegible] सुधारल्यावरून ते पुनः मुंबईस येण्यास निघाले होते. ते येत असतां त्यांची प्रकृती बिघडली ह्मणून त्यांस इजिप्तांत ठेऊन आगबोट निघाली. नंतर तारेनें त्यांचे मृत्यूचे दुःखकारक वर्तमान आलें. हे साहेब फार वर्षांपासून मुंबईस होते. बांबे ग्याझिट पत्राचे मालक असून ते तें वर्तमानपत्रहीं किती एक वर्षेंपर्यंत चालवित होते. हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांस स्वतंत्रता आणण्यास पुष्कळ अंशीं हेच कारणभूत झाले. त्या वेळीं कौन्सलर लोक कर्जबाजारी व गैर वर्तणुकीचे मनुष्य होते पण त्यांचे विरुद्ध लिहिण्याची कोणाचीही शक्ती नव्हती. त्या लोकांच्या गैर वर्तणुकीच्या गोष्टी बाहेर आणण्यास कानन साहेबांनीं आरंभ केला व सरकारानें तीन कौंसलरास कौंसलांतून दूर केलें. त्या दिवसापासून वर्तमानपत्रांचा थोड थोडा अंमल बसत चालला. हे साहेब स्वभावानें फार चांगले होते असें लोक ह्मणतात, यांचे जागेवर मि० कूपर मुंबईचे स्माल्कास कोर्टाचे अक्टिंग फर्स्ट जज हे नेमले जातील असी बोलवा आहे. मि० दोसाभाई फ्रामजी जे हल्लीं अक्टिंग सिनियर माजिस्ट्रेटाचें काम चालवित आहेत त्यांस ही जागा कायम मिळणार नाहीं असें वाटतें. अक्टिंग जागा ही त्यांस देऊं नये असें पुष्कळ युरोपियन लोकांचें ह्मणणें होतें. मग कायम जागा देण्याचें नांवही घ्यावयास नको. ज्ञा. प्र.

विक्टोरिया राणीचे वडील चिरंजीव प्रिन्स आफ वेल्स यांस कर्ज झाल्यामुळें त्यांची जमीन कर्जदार विकणार असें मुंबई ग्याझेटाचा बातमीदार लिहितो.

कच्छचे राव हे दिवाणगिरीच्या जागेवर, मि० कृष्णाजी लक्ष्मण नूलकर यांस नेमणार.

पुणे येथें थोडे दिवसांपूर्वीं जेव्हां महाराज होळकर सरकार यांची स्वारी आली होती, तेव्हां तेथील बाबा गोखले व नातू यांचे खासगी शाळांस मदत देण्याचें ठरविलें होतें. त्याप्रमाणें महाराजांनीं नुकतेंच बाबा गोखले यांचे शाळेस ८०० रुपये व नातूंचे शाळेस ४०० रुपये पाठवून दिल्याचें आमचे समजण्यांत आलें आहे.

शंखनाद. [illegible] मुसलमान लोकांनीं माजिस्ट्रेटाकडे अर्जी-फिर्याद केली होती कीं, हिंदू लोक शंख वाजवीत असल्यामुळें त्यांच्या नादापासून फार त्रास होतो. माजिस्ट्रेटानें असा निकाल केला कीं, हिंदूंनीं सकाळचे सात वाजण्याचे सुमारास, सुमारें ७ मिनिटें मात्र शंख वाजवावे; याप्रमाणें धर्मासंबंधी कामांत हात घालण्याचा माजिस्ट्रेटास काय अधिकार असेल तो असो.

शिंदे सरकारचे दिवाण दादासाहेब खडके आजारी असल्यामुळें शिंदेसरकार स्वतः दिवाणगिरीचें काम पहात असून सकाळचे ९ वाजल्यापासून ६ वाजेपर्यंत काम करितात.

**ईस्टइंडियाकंपनीच्या व्यापाराबद्दल हिंदुस्थानास भरावा लागलेला दंड**—ईस्ट इंडिया कंपनी ही मूळ, व्यापाऱ्यांची मंडळी होती व ती हिंदुस्थान वगैरे देशाशीं व्यापार करण्याकरितां विलायतेंत प्रथम स्थापन झाली. ही कंपनी प्रथम स्थापन करण्यास किती अडचण पडली होती वगैरे मजकूर आह्मी एकदा वाचकांस कळविला आहे. प्रथम व्यापारी ह्मणून हिंदुस्थानांत आल्यावर तीस सार्वभौमत्व प्राप्त झालें. सन १८५७त बंड झाल्यावर कंपनीच्यानें राज्यकारभार चांगला चालवत नाहीं ह्मणून विलायत सरकारानें या देशाचा राज्यकारभार आपल्याकडे घेतला. प्रथम राणी सरकारचें राज्य झालें तेव्हां रयतेस असें वाटलें होतें कीं कंपनीच्या राज्यापेक्षां, राणीच्या राज्यांत सुखप्राप्ती विशेष होईल. परंतु या आशेचा भंग कसा झाला आहे हे वाचकांच्या अनुभवी आहेच. ज्याप्रमाणें कंपनीचें राज्य गेल्यापासून हिंदुस्थानचें हित झालें नाहीं त्याप्रमाणेंच कंपनीच्या हातून या देशाचा व्यापार गेल्यापासूनही या देशाचें हित झालें नाहीं असें ह्मणण्यास चिंता नाहीं. हिंदुस्थानचा सर्व व्यापार पूर्वीप्रमाणें ईस्टइंडिया कंपनीच्या स्वाधीन आजपर्यंत असता तर, कदाचित, हल्लीं जितका विलायती माल हिंदुस्थानांत येत आहे तितका आला नसता व यामुळें देशी मालास, आतांपेक्षा कांहींतरी तेजी राहिली असती. सन १८३८ पर्यंत ईस्टइंडिया कंपनी खेरीज, विलायतच्या लोकांपैकीं, दुसरे कोणीही हिंदुस्थानाशीं व्यापार करूं नये असें होतें. परंतु या सालापासून, विलायतच्या पाहिजे त्या व्यापाऱ्यास, हिंदुस्थानाबरोबर व्यापार करण्याची मोकळीक मिळाल्यामुळें, हिंदुस्थानांत विलायती माल दिवसेंदिवस जास्त येऊं लागला इतकेंच नाहीं. परंतु, ईस्टइंडिया कंपनीच्या हातचा हिंदुस्थानचा व्यापार गेल्यापासून या देशाचें दुसरेंही एक मोठें नुकसान झालें. ईस्टइंडिया कंपनीस हिंदुस्थानच्या व्यापारापासून फार फायदा होत असे [illegible] व तीस या देशीं राज्यप्राप्ति [illegible] हे पाहून विलायतच्या इतर लोकांस [illegible] वाटूं लागलें व हिंदुस्थानाबरोबर आपणही व्यापार करावा असें त्यांस इच्छा [illegible] त्यामुळें, हिंदुस्थानाशीं फक्त ईस्टइंडिया कंपनीनें व्यापार करावा अशी जी बंदी होती ती मोडण्याविषयीं विलायतच्या लोकांनीं खटपट केली व ती सन १८३८ च्या सुमारास मोडली. बंदी मोड[illegible] ठराव झाला तेव्हां ईस्टइंडिया कं[illegible] ह्मणणें असें पडलें कीं, हिंदुस्थानच्या व्यापा[illegible] बंदी मो[illegible] आमचें नुकसान [illegible]र आहे तें भरून दिलें पाहिजे [illegible] हें ह्मणणें वास्तविक [illegible] होतें यांत संशय नाहीं. परंतु [illegible] कंपनीचें नुकसान कोणी भरून [illegible] त्याचा निकाल करण्याची, त्या [illegible] अधिकाऱ्यांस विशेष अडचण पड[illegible] हे उघड आहे. व्यापाराची [illegible] त्यापासून सर्व विलायत[illegible] दा होणार होता [illegible] करितां बंदी मोड[illegible] तथापि, ठराव [illegible] कीं कंपनीचें सदर्हू नुकसान हिंदुस्थानच्या खजीन्यांतून द्यावें. हिंदुस्थानाबरोबर व्यापार करण्याचा फक्त ईस्टइंडिया कंपनीस हक्क होता, तो मोडून, विलायतच्या सर्व लोकांस या देशाबरोबर व्यापाराची मोकळीक मिळाली ह्मणून, ईस्टइंडिया कंपनीच्या झालेल्या नुकसानी बद्दल हिंदुस्थानास भुरदंड किती द्यावा लागला तें पुढील हकीकतीवरून लक्षांत येईल. व्यापार संबंधी कंपनीचें एक सर नुकसान भरून देण्या विषयीं असा ठराव झाला कीं कंपनीस ६ कोटि रुपये द्यावे. परंतु ही रकम एकदम न देतां प्रथम ४० वर्षें पर्यंत या रकमेवर दरसाल दर शेंकडा १० $\frac{1}{2}$ टक्के व्याज द्यावें व तारीख ३० एप्रिल सन १८७४ रोजीं चाळीस वर्षें भरलीं त्या दिवशीं सहा कोटींच्या बदला १२ कोटि रुपये रोख द्यावे. या दिवशीं ही रकम देण्या करितां अशी तजवीज करून ठेवली होती कीं कंप[illegible] व्यापार संबंधा[illegible]ला पैकीं [illegible] कोटि रुपये सदर्हू तारखेस [illegible] १२ कोटि रुपये [illegible]नें ठेवले होते. परंतु सदर्हू [illegible] १२ कोटि रुपये होण्या बदल [illegible] ७ $\frac{1}{2}$ [illegible]टि रुपये झाल्याचें एका पत्रांत लिहिलें आहे. या वरून वाचकांच्या लक्षांत येईल कीं, ६ कोटि रुपयांवर दरसाल दर शेंकडा १०॥ रुपये व्याजाप्रमाणें चाळीस वर्षांचा अजमास केला ह्मणजे, सुमारें, २९ कोटि रुपये होतात. सन १८३४ पासून इतके रुपये ईस्टइंडिया कंपनीच्या भांडवलाच्या मालकांस पोंचले व १२ कोटि पुरे करण्या करितां आणखी ४॥ द्यावे लागणार आहेत. या प्रमाणें ईस्टइंडिया कंपनीचा हिंदुस्थानांबरोबर व्यापार करण्याचा हक्क मोडण्याबद्दल हिंदुस्थानास सरासरीं ३० कोटि रुपये दंड भरावा लागला! ने. ओ.

---

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांनी व. स. छा. छा. प्र. केलें.

REGISTERD NO 7, 1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० २८ माहे जून सन १८७४ इ० अंक २६

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,,अखेर | १ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,,दुसरे खेपेस | ०२ |

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयाच्या आहेत. हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटी प्रमाणे पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत १ एक आणा.

हें औषध गजकरणाशिवाय खरूस व नायटे यांजवरही चांगले प्रकारे लागू होतें.

### लेखक पाहिजेत.

शिळाप्रेसाचे कामाकरितां दोन लेखकांची जरूर आहे. ज्यांचीं मोडी व बाळबोध अक्षरें चांगलीं असतील आणि ज्यांना प्रमाणेंवरची माहिती चांगली असेल त्यांनीं आह्मांकडे अर्ज करावे पगार १२ रुपये पासून २० रुपये पावेतो लायकी पाहून मिळेल. कळावे तारीख २० माहे जून सन १८७४ इसवी

खंडेराव बाळाजी फडके
व० स०चे मालक

### नोटिसा.

नोटिस—रा० जयकिशन किसनराम साहू दुकान मुंबई नाव गुलाबराव गमान साहू दुकान खामगाव यासकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडे आमचे ११३३ रुपये बिलकुल ७ समंत १९२९ मितीचे घेणें आहे. त्याबद्दल तुह्माला हिशेब पाठविला असतां तुह्मी उत्तर पाठविलें त्यांत १०८१४ ची चूक काढून ११००८२ देणें कबूल केले. पुढें तुह्मावर आह्मी एक हुंडी केली असतां सकारली नाहीं त्यावरून तुह्माला हो मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांचे आंत सदर्हू मुद्दल रुपये व व्याज व नोटिशीचा खर्च असे आमचे दुकानावर तावडतोब पावते करावे. या प्रमाणें तुह्मी न केल्यास तुह्मांवर दिवाणी कोर्टांत शिरस्ते प्रमाणें फिर्याद करून मग तुह्मांला फिर्यादीचा हो खर्च देणे

पडेल यांजवर्षी आगाऊ कळविले आहे. कळावे तारीख २० माहे जून सन १८७४ इसवी.

(सही) गुलाबराव गजानन दस्तुर रामनारायण.

नोटिस—नारायणशिंग वल्लद केशोशिंग रजपूत राहाणार मौजे केळीवेळी परगणे दहिहंडे तालुके अकोट यास नोटिस देणार राघोशिंग वल्लद मनसाराम रजपूत राहाणार मौजे केळीवेळी प्रगणें व तालुके मजकूर यानकडून देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मापासून ठिके हजारलावणीवाले शेत दरसाल ३९ रुपये प्रमाणें आह्मास देऊन त्याचा पैसा सरकारी सारावद्दल आह्मी द्यावा, व फक्त तुह्मी सदरील शेताचा पांच वर्षें उपभोग घेऊन शेताची कुंधा काढी काढून सफाई करावी. त्याप्रमाणें तुह्मी सदर्हू शेत घेतलें असून त्याजबद्दल स्टांपकागदावर तारीख ८ माहे जुलई सन १८६८ इसवी रोजीं कबुलायत लिहून दिली. त्यापैकीं तुह्मी आह्मास दोन सालचा पैसा दिला. बाकी तीन सालचे पैशापैकी १३ रुपये दिले व बाकीचे रुपये घेणें राहिलें असून तुमचीं वर्षेंही पुरी झालीं. सबब तुह्मास ही नोटिस दिली आहे तर १५ दिवसांत आमचे रुपयांचा निकाल करावा. सदर्हू निकाल न केल्यास रीतीप्रमाणें दिवाणी कोर्टांत दावा करून नोटिशीचे खर्चासुद्धां सर्व रकम तुह्मापासून घेतली जाईल. कळावे तारीख २४ माहे जून सन १८७४ इसवी.

(सही) राघूशिंग वल्लद मनसाराम निशाणी खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

शेगावाहून वि. वि. मेहेरबानींनें खाली लिहिलेल्या चार ओळीस आपले येते अंकांत जागा मिळावी.

येथें रोहिणी नक्षत्राचे दोन तीन पर्जन्य पडून हल्लीं मृग नक्षत्रानेंही बरीच बहार पाडली आहे. या नक्षत्राचे एकंदर लहान मोठे तीन चार पाऊस पडले. त्यापैकीं तारीख १७ रोजीं रात्री दहापासून १२ वाजे तोंपर्यंत तर मेघराजांनीं फार उत्तम प्रकारची वृष्टी केली येणें करून सर्व लोकांचीं अंतःकरणें तूर्त प्रफुल्लित दिसत आहेत.

येथें गेले एप्रिल महिन्यांत एक खून झाला त्याबद्दल चौकशी होऊन आरोपी पकडल्याचे आपले एका अंकांत प्रसिद्ध झालें आहे तो खटला कमिट झाला असल्यामुळें त्याची चौकशी अकोलें येथें होणार आहे निकाल काय होतो तो पहावा.

येथील रेलवे स्टेशनावरील ख्रिस्ती जातीच्या कोणे एका नोकराचा बारा वर्षांचा मुलगा तारीख ९ मिनहूरोजीं झाडावरून खालीं पडल्यामुळें त्याचा डावा हात कोपरापाशीं अगदी मोडला. यामुळें त्यास येथील चारिटेबल डिस्पेन्सरींत हात नीट जोडलेले हाड बसविण्याकरितां आणिलें होतें पण कोपराचें हाड अगदींच मोडल्यामुळें तें पुन्हा बसविण्याचा इलाज चालला नाहीं यास्तव तारीख १४ रोजीं येथील नेटिव डाक्तरांनीं शस्त्राचे व हस्ताचे कौशल्यानें तो कापून काढिला. ईश्वर करो व तो मुलगा चांगला दुरुस्त होवो ह्मणजे आमचे लोकप्रिय डाक्तर यांस या कामीं यश येईल.

येथील ई. म. स्कुलाकरितां सात हजार रुपये खर्चून नवीन शाळागृह तयार केलें आहे त्याचा प्रवेश समारंभ तारीख १३ मिनहूरोजीं प्रातःकाळी आठवाजतां झाला. या समयास हनरूप साहेब बहादुर असिस्टंट कमिशनर जिल्हा अकोले हेही अनायासें करून येथें आले होते. तेणेंकरून या प्रसंगीं फार शोभा आली होती. गांवांतील पांचपंचवीस साहू व सभागृहस्थ व कित्येक कुळंबी असे अनेक प्रकारचे लोक येथील हेडमास्तर यांचे सूचनेवरून जमले होते. साहेब मजकुरांनीं अध्यक्ष स्थानीं बसून हिंदुस्थानी भाषेत फार सुरस भाषण करून असें दर्शविलें कीं, कांहीं वर्षांपूर्वीं येथील शाळेची स्थिति फार वाईट झाली होती पण अलीकडे तिची फार सुधारणा झाली आहे व उत्तरोत्तर याहून अधिक होईल असा सुमार दिसत आहे व याहून आनंदाची गोष्ट अशी आहे कीं, आजपावेतों शाळेंतील मुलांस बसण्याकरितां जागा अगदी खराब होती ती नद हल्लीं अशा उत्तम प्रकारच्या गृहांत आजपासून शाळा आणिल्यामुळें अगदी दूर झाली. आतां येथें जमलेल्या सर्व लोकांनीं आपल्या मुलांस सरकारी सदर्हू शाळेंत आणून त्यांजकडून उत्तम अभ्यास करवावा व असें केल्यापासून मुलें या शाळेंत चांगलीं हुषार होतील त्यांना आह्मी सरकारी कामाच्या जागा देण्यास इच्छितो. व इकडे मुख्यत्वेंकरून कुणबी लोकांनीं विशेष लक्ष द्यावें. हें भाषण झाल्यावर शाळेचे कमिटी संबंधींही थोडेंसें भाषण झालें आणि नंतर सभा विसर्जन झाली.

एथील हेडमास्तर यांणीं मागे सुमारे दोन वर्षें होत आलीं येथें एक सभा स्थापन केली होती ती तीन चार महिने चालून नंतर स्थलसंकोचामुळें व आणखी कांहीं कारणामुळें तहकूब राहिली होती. सांप्रत नवीन शाळेची जागा त्यांच्या स्वाधीन झाल्यापासून त्यांनीं ती सभा पुनः उर्जित दशेस आणण्याचा हेतु मनांत आणिला आहे असें दिसतें. कारण गेले रविवारीं ह्मणजे तारीख १४ मिनहू रोजीं सायंकाळी एथील सर्व कामदार मंडळी इ० स्कुलांत जमली होती व त्या सभेत —— करण्यापासून नफा व तोटा' या विषयावर संभाषण होऊन पुष्कळ वादविवाद झाला व नंतर कांहीं वेदांत विषयावर चर्चा होऊन सभा विसर्जन झाली अशीं स्तुत्य कृत्यें अशा ठिकाणीं होऊं लागलीं हें पाहून फार आनंद होतो.

येथें एक कापसाचा फुलप्रेस आहे व पुढील हंगामाकरितां मराठी आणि —— ' ह्या कंपनीचा दुसरा एक फुलप्रेस सुरू होणार आहे. या सर्व गोष्टीवरून शेगांव हें दिवसेंदिवस महत्वास चढूं लागलें आहे असें दिसतें. आतां पत्रविस्ताराची माफी मागून पुरें करितो. कळावे तारीख १८ माहे जून सन १८७४ मुक्काम शेगांव

एक ग्रामस्थ

नाशिक तारीख १५ जून सन १८७४.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि० वि० पो खालीं जो मजकूर लिहितो त्यास येत्या अंकीं पूर्ववत आश्रय द्याल अशी पूर्ण आशा आहे.

येथें हल्लीं दोन चार पाऊस पडून उष्णता बरीच कमी झाली आहे. परंतु त्याच्या योगानें जिकडे म्युनिसिपल कामिटी लक्ष कमी असतें तिकडे दुर्गंधी अतिशय सुटते. व फार त्रास होतो. व —— दुर्गंधीनें मध्यांत कांहीं दिवसांनीं एकादा रोगही उत्पन्न होईल अशी भीति आहे. गोदेच्या सुरकोंडयापासून जुन्या बाजाराकडे जो रस्ता जातो तो दुर्गंधीनें नेहमीं व्याप्त असतो. तिकडे म्युनिसिपाल कमिटी सेक्रेटरी लक्ष देतील तर फार चांगलें होईल.

मागें पोस्टांतील बाळकृष्ण नावाच्या शिपायास ५० रुपये दंड झाला होता; परंतु येथील डिप्युटी कमिशनर साहेब यांस दया येऊन यांनीं त्यापैकीं पंचवीस रुपये त्याला माफ केले.

येथें दोन चार दिवसांपूर्वीं एक बाई पुरुषाचा वेष धारण करून एका मनुष्याचे घरीं चोरी करावयास गेली होती. —— हल्लीं सापडली आहे. निकाल झाल्यावर कळवीन.

येथील देवेंठचें शाळागृह बांधणें सुरू आहे. तिकडे डेप्युटी इन्स्पेक्टर साहेब ऊन अथवा पाऊस न ह्मणतां मोठ्या हिमतीनें झटतात. हें काम थोडक्याच दिवसांत संपेल.

तारीख १२ माहे जून रोजीं श्रीबालाजीचे देवळांत संतर्पण झालें. त्या वेळेस सुमारे ७०० लोक जमले होते. परमेश्वरानें भोजनास हरकत वगैरे कांहीं केली नाहीं भोजनाचे वेळीं जो चमत्कार पाहिला तो खालीं लिहिल्याप्रमाणें:—

आवारांत चोहोंकडून मनुष्यें भोजनास बसलीं होतीं. त्यांत उत्तर व पूर्व बाजूचा भाग खेरीजकरून बाकी सर्व ब्राह्मण होते. उत्तरेकडच्या बाजूस देवळास टेकून एक नेमाहित शूद्राची बाई प्रसाद घेण्यास

आली होती त्या वेळेस वाढण्याचा प्रसंग प्राप्त होता; इतक्यांत देवळाचे कारभारी मामलेदार साहेब हे तिरस्कारयुक्त या गरीब भिकाऱ्याला वाईटपणाने बोलले त्यांचा संवाद असा होता:—

अहि, तू देवळाशी टेकून कां बसलीस? ती म्हणाली“ बाबा तुम्ही फार शिवी देऊं नका” असें म्हणून आपल्या मुलास काखेंत घेऊन बाजूकडे निघाली; इतक्यांत मदरहू कारभारी रागावून व बोलले बाटा वून म्हणाले“ रांडे हे कोण तुझा बाप लागतो! हे घेऊन जा नाहीं तर मोठे पाऊल काढून देईन” नंतर ती बाई, पाळेक्या वाटीचे भाच बांधून वेत होती तो ती भोजनाच्या मागरही पुढे आपल्या नाकावर घेऊन बसली या प्रमाणें त्या गरीब भिकारीचे वाईट प्रसाद बराच भोवला.

नंतर मदरहू गृहस्थ फिरत फिरत आमोरकरांच्या बाजूस गेले व तेथें त्यांच्या ओळखीचे कुळंबी वगैरे लोकांची ब्राह्मणांच्या अगोदर सोय केली. नंतर ते लोक ब्राह्मणांच्या अगोदर जेवावयास बसले. त्या समयीं एथील संभावित गृहस्थां पैकीं भिक्षुक गजानन भटजी तेथें होते ते फार भारी यांस म्हणाले“ कारभारी बाबा, हा कां तुमची चाल? या विषयीं तुम्हास कांहीं वाटतें कीं नाहीं!” नंतर“ त्यांचें, काय होतें त्याला काय होतें असें म्हणत व हसत निघून गेले.

येथें राहिले लोक आले होते ते हल्लीं निघून गेले. कळावें लोभ करावा.

एक वाशिमकर बातमीदार.

## जन्मदारिद्र्याविषयीं

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० पत्रकर्ते महाराज, आपणास पूर्वी कबूल केल्या प्रमाणें 'जन्म दारिद्र्यास वैभव प्राप्त झालें असतां जीं अघोर कृत्यें घडतात' तीं आपली आपलेकडे लिहून पाठविलीं आहेत. तरी कृपा करून त्यास आपल्या पत्राच्या एखाद्या कोपऱ्यास जागा देऊन माझी मनीषा तृप्त करावी एवढी प्रार्थना आहे.

आपल्या एका अंकामध्यें बहुतेक भयंकर प्रसंग वर्णिले आहेत तथापि जे कांहीं अवशेष राहिले आहेत. ते आतां सांगतो—

समजा एक मोठा हुद्देदार, थोडासा विद्वान असा गृहस्थ एखाद्या संस्थानामध्यें म्हणा किंवा एखाद्या तालुक्यांत किंवा एखाद्या जिल्ह्यांत अथवा कोणतीही सरकारी नोकरी करीत आहे. आतां अशा मोठ्या हुद्द्यावर असतां तो वाईट आचरणानें आपणास अमान्य करून घेण्यास कसा पात्र होतो ते पहा. अशा प्रकारच्या गृहस्थानें नाव आपण स ठेऊं या. या क्षुल्लक विषय वासना जबरदस्त परंतु करतो काय बिचारा पडला मोठ्या हुद्द्यावर! कांहीं हूं चूं केलें की मिकडे तिकडे दुष्कीर्तीचा डंका वाजणार. परंतु विषय वासनेचा प्रकोप झाला म्हणजे अज्ञानानें बापडा अंध होतो. सन्मार्ग मुळींच दिसेनासा होतो. कोणीं केलेले सदुपदेश त्याला त्या मार्गावरील तीक्ष्ण कंटकवत् भासूं लागतात. ज्या ज्या रीतीने इच्छितार्थ तडीस जाईल त्या त्या रीति करण्यास तो प्रवृत्त होतो. अशागयाची इच्छा ही वाईट असल्या कारणानें ती तृप्त करण्याचे मार्गही फार वाईट असतात. अशा प्रसंगीं त्याचें पाप तोंडें बांधून तो एकीकडे ठेवतो, आपल्या करून घेण्यास तयार होतो. स्वैपाक करणारा ब्राह्मण असो, किंवा घरकाम करणारा या पाच सात रुपयांचा चाकर असो, अथवा हांजी हांजी करणारा व नित्य खुशामत करणारा कुळकर्णी एखादा महेलकरी असो अथवा एखादा लाळघ्या कारकून असो नवा पगाराचा असो, त्यांच्या त्यांच्या बायकांशीं म्हणून तो विषयप्राप्ति करीत जेव्हां चे असते त्यांचे त्यांची ती मोठ्या चिनतवारीने विनवणी करू लागतो. याप्रमाणें व्यभिचार करणाऱ्यांचा प्रकार! दुर्व्यसनाची वृद्धि करतांना कपट गुप्तत्वाचा भाव मनांत न आणतां परस्परांशीं मोठ्या सख्यानें वर्तन करितात, परंतु ती क्षणिक सुखाची घटी निघून गेली म्हणजे त्यास आपापल्या कामावर हजर व्हावें लागतें. येथें एक असणार राव साहेब, दुसरे असणार पंत, तिसरे दादा, चवथे श्यामजीपंत, पांचवा कृष्णा उमेदवार, सहावा शेकू शिपाई चोबरून राव साहेब म्हणणारा. आतां या सहानीही एक प्रकारचीच वाईट कृत्यें केलेलीं असतात तेव्हां ते एकमेकाची किंमत किती आहे हे मनांत समजत असतात. परंतु यदा कदाचित यांच्या लागडी मध्ये कांहीं कारणावरून बेबनाव झाला तर जी कांहीं गम्मत किंवा फार्स उडतो तो लिहिण्यास नीच काय परंतु मोठमोठ्या बहादूर ग्रंथकारांची लेखणी पुर्तपणीं चालणार नाहीं. ज्याप्रमाणें कच्च्या मृत्तिकेच्या पात्रास किंचित आघातानें चोहोकडून उदकाच्या धारा लागतात. त्याप्रमाणें क्षणाच्या तंट्यानें ते लोकांपाशीं एकमेकांचे दुर्गुण वर्णन करू लागतात. तोंडपुजे व हांजी हांजी करणारे असतात तेच लाडकन दोष देणारे होतात. कां असें करूं नका, अशाचा परिणाम फार वाईट होईल असें आम्ही पूर्वीच सांगत नव्हतों कां? शेवटीं असा परिणाम झालाना? असे म्हणून चवघे चोहोकडून दोषाचा भडिमार करितात. कटपट करणाऱ्या कारकुनाला, शिपायाला किंवा त्या फुकट्या गल्लिकुत्र्याला कोणी कांहीं पुसत नाहीं, परंतु मोठ्या हुद्देदाराची मान पाचावर धारण नसते. त्यास तोंड दाखविण्यास जागा रहात नाहीं. पाप कर्माचा धूर एकादा डोळ्यावरून गेला, म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी कळूं लागतात. परंतु मग काय? प्राण जाऊन प्रेत हातीं आल्याप्रमाणें होते. वरातीमागून घोड्याचा काय उपयोग? तद्वत् दुष्ट कृत्यांचा परिणाम झाल्यावर पुढें जरी शुद्धी आली तरी ती काय कामाची? पश्चात्ताप तर हात धुऊन पाठीमागें लागतो. मनाला स्वास्थ्य म्हणून तो घटकाभर होऊ देत नाहीं, अशा प्रसंगीं एखादा तरणोपाय करण्यास संधी सांपडली तर नशीबच म्हणायाचें. सद्वर्तन न केल्या बद्दलचा गुन्हा एकीकडेस राहतो पूर्वी कामकाजामध्यें आचरलेले एखादे पाप पुढे उभे रहाते आणि लवकरच चाकरीवर घाला पडतो व प्रसंगवशात तुरुंगांत ही जावें लागते व मग डोळे उघडतात. याजकरितां आधीं विचार झाला तर चांगला. या संबंधानें आम्ही थोडा उपदेश करावयाचा आहे तो पुढील पत्रीं करीन. कळावे हे विनंती.

एक हिंदू धर्मेच्छुपाळा.

वऱ्हाडसमाचार

तिथी अधिकआषाढ शुद्ध १४ शके १७९६

## वऱ्हाडप्रांत परत जाईल काय?

आमचे वाचकांस आठवण असेल कीं, मागें महिन्याचे अखेरास याच विषयावर आम्ही एक निबंध लिहिला होता. अलीकडे तर ज्याच्या त्याच्या तोंडीं हीच गोष्ट झाली आहे कीं, वऱ्हाड प्रांत निजाम सरकारास हे खास परत जाणार. व या गोष्टीला असें एक कारण झालें आहे कीं, बडोद्याचे नामांकित सावकार गोपाळराव मैराळ यांचें एक दुकान हैद्राबादेस नवीन स्थापन झालें आहे व त्याला दिवाणांनीं पुष्कळ सहाय दिलें आहे. त्या धोरणानें लोक असेही बोलतात कीं, कांटिंजन्टच्या वार्षिक खर्चाकरितां वऱ्हाड प्रांत इंग्रजसरकारच्या अमानतींत आहे तर कान्टिजंटला जितका खर्च लागतो तितके वर्षास व्याज येईल एवढी रकम म्हणजे नऊ कोटि रुपये बडोद्याचे सावकारापासून निजाम सरकार कर्ज घेऊन इंग्रज सरकारास देणार व आपला वऱ्हाडप्रांत परत घेणार. या बातमीमध्ये फारसे तथ्य असेल असे वाटत नाहीं. इंग्रजसरकारचे ५० लक्ष रुपये निजामसरकाराकडे कर्ज होते त्यासाठीं हा प्रांत सन १८५३ सालीं गहाण घेतला पुढें तें कर्ज ८ वर्षे पावेतो मुळींच फिटलें नाहीं. पुढें सन १८६० सालीं नवा तहनामा झाला तेव्हां इंग्रजसरकारानीं सदरहू कर्ज निजामसरकारास माफ केलें अशी मागील गोष्ट आहे. तर आतां नऊ कोट रुपये नवीन कर्ज घ्यावयाचें ते फेडावयास किती काळ पाहिजे! व तें एकदम एका सावकाराकडे आजचे काळास मिळूं शकण्याचा संभव आहे कीं काय, हें पाहण्याच्या व समजण्याच्या गोष्टी फार बारीक आहेत सबब आम्ही तितक्या खोल पाण्यांत शिरत नाहीं. अनुभव येईल तो खरा.

आतां इतके उघड आहे कीं जर रकमेकरितांच कोणी कोणास मुलूख गहाण दाखल दिलेला आहे तर ती रकम ऋणको देऊं लागला असतां धनकोनें रकम आम्हांस नको मुलूख आम्हापाशीं आहे तोच बरा आहे असें म्हणणे रास्त होणार नाहीं. कारण हा कांहीं गहाण लहाणाचा प्रकार नव्हे तथापि त्यांतील मर्यादा पाहिल्या पाहिजेत. कारण हें राजकीय काम आहे. तहनाम्यांत उभय सरकारांचा स्पष्ट लेख असा आहे म्हणतात कीं त्यांतील एकानेंच आपला विचार आतां बदलला असतां कांहीं करू म्हणवत नाहीं. व इंग्रज सरकार म्हणतात कीं असा फेरफाराची आम्हांस जरूर नाहीं असी बातमी आहे तेव्हां हे घडण्यास कांहीं एकलोक वर्तमानपत्रांनीं स्पष्ट लिहिलें आहे कीं मुलुख परत जाण्याच्या या बातमीस बिलकूल आधार नाहीं. व कोणी म्हणतात कीं पत्रव्यवहार चालू आहे. पण त्याचें स्वरूपाविषयीं किंवा निकाला विषयीं कोणास कांहीं पत्ता लागत नाहीं.

कोणी असे म्हणतात कीं निजाम सरकार अजून अल्पवयस्क आहेत व सर्व कारभार दिवाण साहेब सर सालरजंग यांच्या धोरणानें चालतो. व त्यांची आजपर्यंतची वागणूक इंग्लिश सरकारास खुष राखून बहुमान मिळविल्याची आहे. तर ते आतां हें प्रकरण इंग्लिश सरकारच्या इच्छेविरुद्ध उपस्थित करू शकणार नाहींत. लोक कोही गोष्ट मनांत आणण्यासारखी नाहीं असे नाहीं इंग्लिशसरकारचे अधिकारी आम्हाला द्रव्य नको, मुलुखच पाहिजे असें टाइम्स पत्रांत लिहिल्या प्रमाणें म्हणत असतील तर मुलुख परत देण्याविषयींचा आग्रह त्यांच्या नाखुशीनेंही कदाचित कारण होईल. असतु तें कसेंही असो. द्रव्याकरितां मुलुख अमानतींत आहे तर तो द्रव्य दिलें असतां परत मिळणें रास्त आहे असें आम्हांस वाटते व याच प्रमाणें मुंबईच्या थोर व वजनदार टाईम्स आफ इंडिया नामक इंग्लिश पत्रकर्त्याचेंही मत आहे. हे पाहून आम्हास संतोष वाटतो.

सन १८५३ सालीं तहनाम्यावरून वऱ्हाडप्रांत इंग्रजसरकारानें हस्तगत करून घेतला त्यावेळची हैद्राबादची स्थिति आमचे बंधु ज्ञानप्रकाशकर्ते यांनीं वर्णन केली आहे ती अशी:— निजामसरकार वर्षांतून एकादे दिवशीं बाहेर पडत. बाकी सर्व दिवस जनानखान्यांत असत; राज्यव्यवस्था वजीर पाहत. शहरांत खून झाल्या शिवाय एक दिवस जातनसे. अशी अव्यवस्था होती आणि लार्डडालहौसी त्यावेळचे गवरनरजनरल यांना मुलूख गिळकृत करण्याचें वेड होतें सबब हा मुलूख इंग्लिशांनीं घेतला. व या तहनाम्यांतील दोन पक्षकारास त्यांनीं वाघ आणि शेळीयाची उपमा दिली आहे. असतु. हे कसेंही असो

आमचे वाचकांस पुन्हाही आम्ही कळवितो कीं सुमार वर्षभर वाटाघाट चालू आहे व अनेक प्रकारच्या गप्पा निघत आहेत. त्यांतीलच प्रकार प्रस्तुतचा आहे. व तो घडून येण्याविषयीं कांहीं प्रमाण नाहीं, उलट पाहिलें तर त्या बातम्या खोट्या आहेत व मुलखाची अदलाबदल होत नाहीं अशा विषयींच्याच बातम्या साधार दिसतात.

## होळकर सरकारची राज्य-व्यवस्था.

राजांनीं प्रजेचें पुत्रवत् पालन करावें अशी नीति आहे. व त्या दृष्टीनें पाहूं गेलें असतां राजाचीं जीं कर्तव्यकर्मे आहेत त्यांपैकींच प्रजेस विद्यादान देणें हे पहिलें

कर्तव्यकर्म आहे असें ह्मटलें पाहिजे. होळकर सरकारांनीं आपले राजधानीचे शहरांत मोठें विद्यालय स्थापन केलें आहे. व तें चांगल्या चालत आहे; परंतु त्या भागांचीं देशांत विद्यादान देण्याचीं साधनें अद्याप जशीं पाहिजेत तशीं नाहींत. यावरून प्रजा फार अज्ञान व अडाणी आहे. तर त्या भागांचे विद्याखात्यावर अधिकारी नेमिले त्याप्रमाणें ते खातें [illegible] वाढवून गांवो गांव शाळा स्थापन कराव्यात.

दुसरें कर्तव्यकर्म राजाचें हें आहे कीं, आपल्या प्रजेचे शरिराचें संरक्षण करावें. या शरिराचें संरक्षण करण्याचे राजास साधन ठिकठिकाणीं दवाखाने स्थापन करणें हें होय. होळकर सरकारचे देशांत यथास्थित दवाखाने नसल्यास ते त्वरित स्थापन करावेत व प्रजेचें शरिरसंरक्षणाचें श्रेय घ्यावें.

तिसरें राजाचें कर्तव्यकर्म हें आहे कीं त्यांणीं प्रजेच्या मालमत्तेचें संरक्षण करावें—मालमत्तेचें संरक्षण करण्याचें सांप्रत काळीं एक साधन ह्मटलें ह्मणजे देशांत पोलिस असणें हें होय. होळकरसरकारचे राज्यांत पोलिसखातें असावें तसें स्वतंत्र नाहीं. यामुळें चोरट्यांचा गवगवा फार माजला आहे. तर तो बंदोबस्त अवश्य झाला पाहिजे. तेणेंकरून होळकरशाहींतील खेडे गांवांतून हल्लीं जी गुन्हेगारांची सूड उगविण्याची विलक्षण चाल आहे ती मोडून एकाकरितां दुसऱ्या लोकांस आपले संपत्तीस व जीवितास मुकण्याचे प्रसंग येतात ते टळतील.

आपले देशांत कारबाज लोकांस द्रव्य संपादन करण्याची जी इजारे घेण्याची सवड होळकर सरकारांनीं ठेविली आहे ती एकदम मोडून टाकली पाहिजे असें आह्मांस वाटतें. इजारे देण्याची चाल फार जुनी आहे व ती पुष्कळ देशांत अजून चालू आहे; परंतु ती प्रजेच्या सुखास प्रतिबंध करणारी आहे यांत संशय नाहीं. इजारे दिले ह्मणजे इजारदार स्वतः मालक बनतात व एकाद्या गरीब कुणब्यानें पोटास पाठ बांधून दातांनीं तृण वेचून आपल्या जीवितास आश्रय ह्मणून तयार केलेली जमीन यत्किंचित कारणाकरितां इजारदार द्रव्याचे लोभानें त्याजकडून काढतो हा एक आणि सरकारी सान्याबद्दल कुळाची मालमिळकत अटकाऊन ठेवण्यास अगर विकण्यास वगैरे इजारदारास सवड असल्यानें तो स्वतःचा व्यापार त्या लोकांशीं करून त्या संबंधानें फसलेला पैसा जुलमानें वसूल करूं शकतो इतकेच नव्हे. एक जबरदस्त अधिकार त्याचे हातीं असल्यानें त्यास स्वाभावीक द्रव्य मिळविण्याचीं लालसा उत्पन्न होऊन ते हटकून व्यापार करितात हा दुसरा, असे दोन विचार सूक्ष्म [illegible] मनांत आणिले असतां इजारदार प्रजेच्या असंतोषाचे व दारिद्र्याचे मूळ होत असें दिसून येतें. याजकरितां त्याचें प्राबल्य अशा प्रांत देशांत सहसा नसावें असें आह्मी इच्छितों.

देशांत जमीनीची लागवड होण्यास व चहूकडे शांतता आणि आबादी रहाण्यास मुख्य साधन जमीनीचें क्षेत्रफळ व तिजवरील राजाचें स्वामित्व हें नियमित असणें फार अगत्याचें होय. तसें नसलें ह्मणजे त्या सर्व देशांत अशा प्रकारचा सर्वकाळ राहून लोकांस जमीन लागवड करण्याचा हुरूप राहणार नाहीं. आणि क्षेत्रफळ व स्वामित्व नियत असलें ह्मणजे निर्भयपणें जमीन लागवडीस येईल इतकेंच नव्हे. देशांत जमीनीची मोजणी होऊन सारा ठराव रहाणें हें सुधारलेल्या राज्यव्यवस्थेचें चिन्ह आहे व तेणेंकरून प्रजेस आपली संपत्ती वाढविण्यास उत्तेजन येतें. होळकर सरकारचे राज्यांत जमीन कमी लागवडीची असल्याचें लोक ह्मणतात याचें कारण एक तर जमीनीची मोजणी नाहीं हें असावें व दुसरें इजारे देण्याची चाल असल्यामुळें जमीनीवर कुळाची मालकी रहात नाहीं हें असावें. जमीनीवर कुळाची मालकी असावी व त्याजला ती विकण्यास किंवा हवी ती व्यवस्था करण्यास अधिकार असावे.

आपले राज्यांतील देशांची व लोकांची स्थिति पाहून त्यांना मानवतील असे कायदे ठरविण्याकरितां एक कौंसल नेमावें. व नवीन कायदे प्रजेच्या हितासाठीं प्रसार करावे. तेणेंकरून कोणाची वागणूक गैरकायदेशीर आहे हें सहज लक्षांत येतें. व तशा वागणारास शासन झालें ह्मणजे इतरांस कायदा मोडूं नये असें वाटतें आणि तसें झालें ह्मणजे पाहिजे त्यांना पाहिजे तसें वर्ततां यावयाचें नाहीं.

न्यायखातें स्वतंत्र केलें त्याप्रमाणें अधिकारविषयीं कायद्यानें मर्यादा करून द्यावी. व त्या मर्यादेचे आंत किंवा बाहेर त्यांनीं जाऊं नये व त्यांना कोणी तसें भाग पाडूं नये अशाविषयीं सरकारचें लक्ष असावें असें झालें ह्मणजे स्थापन केलेल्या कोर्टांपासून प्रजेस इन्साफ मिळून ती सरकारास दुवा देईल.

आपण आपले न्यायाधीश या ह्मणीप्रमाणें हल्लीं जी पोलिसचीं व न्यायाचीं कामें एका अधिकाऱ्याकडेस आहेत तीं काढून दोन अधिकार निरनिराळ्या मनुष्यास द्यावेत. ह्मणजे तेणेंकरून एकाची चूक दुसऱ्यास सुधारतां येते. एकाचे हातीं दोन अधिकार असल्यास चूक ह्मणून दिसावयाचीच नाहीं.

तात्पर्य ज्याजला जो अधिकार दिला त्याजकडेस तितकी स्वतंत्रता राहिल्यास त्या कर्माचे बरे वाईटाबद्दल त्याजला दोष देता येतो. व त्याजला नीट मार्गावर आणता येते. ते अधिकार मर्यादित असल्यास कोणावरच बोजा न रहातां घडलेल्या दुष्कर्माचे अधिकारी राजास व्हावें लागतें. तो केवळ शीण आहे इतकेंच नव्हे, सुधारणेच्या पायास तो अडथळा समजला पाहिजे. प्रजेच्या हिताचे कायदे करण्याचें काम राजाचें असून ते अमलांत आणण्याचें काम कामदाराचें आहे. आणि पुन्हा कायदा अमलांत बरोबर आणिला कीं नाहीं हें पहाणें राजाचें आहे. सारांश कामदारांनीं अमलांत आणण्याचें काम बरोबर बजाविलें कीं नाहीं इतकेंमात्र कायदे केल्यानंतर राजाचें पाहणें असावें.

शेवटीं श्रीमंत बाबासाहेब होळकर यांना विनयपूर्वक आह्मी इतकेंच सुचवितों कीं आज जे कांहीं प्रजेच्या व स्वतःच्या हक्काचे संरक्षणार्थ आपण स्वतः खपत असतां त्याऐवजी प्रजेस आपले हक्क काय आहेत हे समजण्याचें जें साधन ते योजून तिला हुषार करावी ह्मणजे प्रजेचें साधारण पणाचें सांप्रतच्या मनूंत राज्यसंरक्षणाचें उत्तम साधन आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

इंदूर राजधानींतील मंत्रीमंडळही बहुतेक हुषार आणि राजाज्ञापेक्ष आहे. त्यांनींही या आमच्या सूचना मनांत घेऊन त्यांची अमलबजावणी होण्याचे कामीं राजास सहाय केल्यास या सर्व सुधारणा फार त्वरित होण्याजोग्या आहेत तरी त्यांनींही अगत्य या गोष्टींकडे लक्ष द्यावें अशी आह्मी त्यांस सही शिफारस करितों.

## वऱ्हाड.

या सान्या आठवड्यांत पावसाचा थेंब नाहीं. वारा सुसाट्याचा व त्रासदायक सुटतो. पेरण्याचीं कामें आटपत आलीं व सर्व मेघराजानीं पुन्हा लवकर कृपादृष्टी करून वृष्टी केली पाहिजे असें लोक बोलतात.

—ooo—

मे० दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब असिस्टंट कमिशनर यांचा रेल्वे कंपनीच्या गार्डानें पहिले क्लासचे गाडींत बसण्याचे प्रसंगीं अपमान केल्याची गोष्ट सर्वत्र प्रसिद्ध झाली आहे; पण तेणेंकरून व दुसऱ्या मागील एकदोन गोष्टींवरून लोकांस स्पष्ट असें वाटूं लागलें आहे कीं, हा या थोर गृहस्थाचा अपमान नव्हे, जाणूनबुजून कंपनीचे नोकरांनीं असे काळे व कंपनीनें त्याविषयीं खबरदारी न घेणें यांत कंपनीचे बदनाम आहे. व येणेंकरून न तिला जो डाग लागेल तो कशानेंही निघणार नाहीं. याजकरितां कंपनीनें आपलेच हिताकरितां अशा कामीं जपावें हें फार अवश्यक आहे. अस्तु.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं मे० दस्तुर बहिमनजी साहेब यांनीं ट्राफिक म्यानेजर यांस आपले हकीकतीचा जबाब विच्यारिल्या वरून त्यांनीं त्या गोष्टीची चौकशी केली व गार्डाकडून क्षमा मागण्याविषयींचें पत्र घेऊन बहिमनजी साहेब यांजकडे पाठविलें. व गार्डाच्या अपराधाबद्दल ट्राफिक म्यानेजर यांनींही फार दिलगिरी दाखविली. त्यावरून बहिमनजी साहेब यांनीं थोर मनानें त्यास माफी दिली व पुढें काम चालविण्याचे सर्व विच्यार सोडून दिले. हें बरें झालें पण एवढ्यावर कंपनीचे धुंद नोकर आपली धुंदी काढून टाकतील तर अधिक बरें होईल.

ही बहिमनजी जामासजी साहेबाची गोष्ट लिहितांना सर्व वर्तमान पत्रकर्त्यांनीं त्यांचें खरें नाव लिहिण्या कडे दुर्लक्ष करून बेहिमनजी जमशेटजी असें लिहिलें आहे गैरमाहित पत्रकाराविषयीं असो पण त्यांस जाणणारे आमचे पुणेकर व उमरावतीकर बंधू तरी त्यांचें नाव असें अशुद्ध न लिहिते तर बरें होतें.

—ooo—

अकोला हायस्कुलांतील १०० रुपयाचे असिस्टंट मास्तर मि० पांडुरंग दामोदर दवणकर यांस अकोला मिडलक्लास स्कुलावर तितक्याच पगारावर हेडमास्तर नेमिलें व तेथील हेडमास्तर मि० सुंदर दामोदर यांस खामगावास मिडलक्लास स्कुलावर हेडमास्तर नेमिलें व मि० निळकंठ नारायण भट यांस येथील हायस्कुलांत असिस्टंट मास्तर नेमिलें.

हायस्कुलाचे हेडमास्तर मि० एटकिन साहेब यांनीं पांडुरंग दामोदर या विषयीं फार नालस्तीचा रिपोर्ट केला होता व त्यांचे पगारावेंही नुकसान व्हावें असें त्यांचें मत होतें पण आमच्या अनुभविक व पोक्तबुद्धीच्या डा० सिंक्लेर साहेबांस तसें वाटलें नाहीं व त्यांनीं तसें केलेंही नाहीं हेंच योग्य होय. मनोवृद्ध, तपोवृद्ध, ज्ञानवृद्ध यांची योग्यता जी मोठी वर्णिली आहे ती त्यांच्या अशाच [illegible] आहे. पोरबुद्धीच्या हूड माणसांनीं हा बोध घ्यावा व उच्छृंखलपणा टाकावा.

—ooo—

रा० बुक साहेब रजेवर गेले होते ते परत येऊन आपले जागेवर रुजू झाले.

—ooo—

कापसाचे सट्टे बंदी [illegible] आणण्याचा ठराव [illegible] नंट साहेबांनीं माफ केला. व पूर्ववत् सांध्या कामदारांस सट्टे बंदी होण्याचा ठराव झाला.

—ooo—

एका पोलिस शिपायाला एका मुसलमान कसबिणीनें विष घातलें. हा मुकद्दमा डिपुटी कमिशनर साहेबांपुढें चालू आहे.

## जाहिरखबर

अकोल्याच्या म्युनिसिपालिटीच्या सफाईचा ह्मणजे रस्ते झाडणें व कचरा भरून नेणें याविषयींचा येत्या जुलईपासून एक वर्षाचा मक्ता देण्याचा आहे तो घेण्याची ज्यांची खुशी असेल त्यांनीं टेंडरांत म्यु० क० चे आफिसांत सोमवार तारीख २९ जून रोजीं दिवसा ४ वाजता अर्ज म्यानेजिंग कमिटीपुढें आणून द्यावे ह्मणजे त्यांचा विच्यार करून मक्ता कायम केला जाईल सर्वांस कळावें. तारीख २७ माहे जून सन १८७४ इसवी.

मक्तयाच्या शर्ती कमिटीचे आफिसांत दाखविल्या जातील.

Pandoorung Damodar
सेक्रेटरी

## वर्तमानसार

मद्रास इलाख्याचे खजिन्यांत या वर्षी शिल्लक फार कमी राहिली कारण सरकार संबंधानें एक कोटि बारा लक्ष रुपये कलकत्त्यास पाठविले. व लोकांनीं सुमार १४ लक्ष रुपये पाठविले.

मधुसूदन नांवाचा एक १४ वर्षांचा मुलगा कलकत्त्याहून पळून विलायतेस गेला होता तिकडे पुष्कळ वर्षें राहून व तेथें बहुतेक प्रांत फिरून तीन वेळ अमेरिकेस जाऊन वगैरे हल्लीं कलकत्त्यास आला आहे. याचें हल्लीं [illegible] असें आहे.

मद्रासेंत पुढील फेब्रुवारी महिन्यांत कलाकौशल्याचें प्रदर्शन होणार आहे.

ले० क० पाडिंगटन साहेब मुंबई इलाख्यांतील इज्युकेशनल इन्स्पेक्टर नोकरीचा राजिनामा देणार.

१६वे तारखेस सुरतेस मोठें वादळ झालें व कित्येक घरें पडलीं. १३वे तारखेस भावनगरासही असेंच झालें व एक भिंत पडली तिखालीं २ मनुष्यें मरण पावलीं. उमरावतीसही वादळ झालें होतें व कित्येक सरकारी हापिसांवरील [illegible] उडून गेले.

मुंबईचे माजी म्युनिसिपाल कमिशनर मि. आर्थर क्राफर्ड एकाएकी प्रकृति बिघडल्यामुळे गेल्या मागबोटींतून विलायतेस गेले.

नवीन ब्यांकेचा विचार— बा. ग्या. च्या ऐकण्यांत आले आहे कीं, कितीएक एतद्देशीय व्यापारी लोक मुंबईत एक ब्यांक काढण्याचा विचार करीत आहेत. त्या ब्यांकेचे भांडवल पंचवीस लक्ष रु. असून भाग शंभरांचे असावे असें आहे.

पुणे येथें नागलोकांकरितां निराळें धर्मार्थ दवाखान्याची स्थापना रा. रा. गणेश वासुदेव जोशी यांची मातोश्री सावित्रीबाई भ्रतार वासुदेव शिवराम जोशी यांच्या द्रव्यसाह्याने अधिकआषाढ शुद्ध ८ पासून सदाशिवपेठेंत बाळाजीनाईक भेळकर यांच्या घराच्या पुढच्याबाजूस झाली आहे. वैद्यकिया करणारे रा. गोविंदराव घोडाणीकर. १० वर्षांच्या आंतील मुलांसही येथें धर्मार्थ औषध मिळेल, अशी छापील सूचना रा. सा. सदाशिव बल्लाळ गोडबोले यांच्या सहीचो प्रसिद्ध झाली आहे.

जेथें सरकारी तारहपीस आहे तेथें सरकारी बातमी रेलवेच्या तारअफिसाकडून पाठवूं नये असा सरकारचा हुकूम झाला.

पेशावरचे आडिशनल कमिशनर यांनीं खून करणाऱ्या लोकांस फाशी न देतां यांची सर्व स्थावर जंगम मालमिळकत सरकारांत घ्यावी अशी कल्पना काढली आहे असें समजतें.

अयोध्येचे जुडिशियल कमिशनर यांनीं वकिलीच्या परिक्षेस फी पन्नास रु० ठरविली आहे.

लार्ड नार्थब्रूक यांच्या पाठीमागें सर बार्टल फ्रियर गवर्नर जनरल झाले तर कर्नेल गालिसन त्यांचे प्रायवेट सेक्रेटरी होतील असें लंडनमध्यें माहितगार लोकांचें अनुमान आहे.

मुंबईच्या मुसलमान व पार्शी लोकांच्या तंट्याबद्दल सर फिलिफ वोडहौस यांस विलायत सरकार बहुधा परत बोलाविल म्हणजे कामावरून दूर केल्याबद्दल विलायत सरकाराकडून लवकरच पत्र येईल असें इं. आ. कर्ते म्हणतात.

आग्र्यापासून तीन मैलांवर शिकंदर रस्त्यावर वाट मारली. चोरटे हत्यारबंद व घोड्यांवर बसलेले होते. त्यांनीं एका उंटाच्या गाडीवर हल्ला केला आणि पुष्कळ पैसा नेला.

ठराव — लोकफंडाच्या पैशांतून पायऱ्यांच्या बारवा बांधूं नयेत म्हणून जो थोड्या दिवसांपूर्वीं चमत्कारिक ठराव झाला आहे. त्याच मासल्याचा हल्लीं त्या फंडाच्या पैशातून, चावड्या अगर धर्मशाळा बांधू नयेत म्हणून ठराव झाल्याचे समजतें.

पांढरे कोळसे— आस्ट्रेलियामध्यें पांढरे कोळसे सांपडले आहेत, ते लवकर व चांगले जळतात. हे कोळसे तेथें पुष्कळ ठिकाणीं आहेत व त्यांजकरितां फारसें खणावे वगैरे लागत नाहीं. याचा सर्पणा ऐवजी पुष्कळ उपयोग करतात.

बंगालच्या दुष्काळानिमित्त ता. ३ जूनपर्यंत जमलेला एकंदर फंड २८,६३,४१२ रु. २ आणे १ पै यांपैकीं लोकांकडील वर्गणीचे १८,४६,२१४ रु. ३ आणे ११ पै व सरकाराकडून या फंडास मदत म्हणून १०,१७,१०७, रु. १४ आणे ९ पै या प्रमाणें आहे.

कलकत्यास बंगाल एशियाटिक सोसाइटीची सभा मार्च महिन्यांत भरली होती त्यावेळेस कावळ्याचा एक कोठा दाखविला, तो कोठा टेलिग्राफच्या तारांच्या तुकड्यांचा बांधलेला होता. सोडावाटर बाटलीस बारीक तारा असतात त्यांचे कोठे कावळे बांधतात असें कोणी त्या प्रसंगीं सांगितलें. यावरून एक सभासद बोलले कीं, कावळे देखील आपलीं घरें बांधण्यांत सुधारणा करूं लागले; परंतु नेटिव लोकांनीं आपलीं घरें बांधण्यांत फारशी सुधारणा केली नाहीं. इं. प्र.

मद्रास टाइमसवरून असें समजतें कीं, त्रिचनापल्ली एथें एक हिंदु मुलगा एका एस. पी. जी. ख्रिस्ती मिशनांतील उपदेशाकडे गेला आणि त्यानें त्यास असें कळविलें कीं मी ख्रिस्तीधर्म स्वीकारावयास तयार आहे, मला बाप्तिस्मा द्यावा. पुढें त्या उपदेशकानें त्यास आपल्या घरीं जेवण्याची तयारी करून रात्रीस निजावयास बोलाविलें. मध्यरात्रीं पहातात तों तो मुलगा त्या उपदेशकाचें गाठोडें व एक अंगरखा घेऊन चालता झाला. अंगरख्याच्या खिशांत कांहीं रुपये होते.

ब्राह्मविवाह— ढाका एथील एक मजाउदीन नांवाचा धर्मज्ञानी मुसलमान गृहस्थ ब्राह्मधर्मानुयायी झाला आहे. त्यानें एका रंगपूर एथील मुसलमान ज्ञातींतील ब्राह्मधर्म स्वीकारलेल्या बाई बरोबर लग्न लाविलें. पुरोहिताचें काम एका ब्राह्मधर्मोपदेशकानें चालविलें. सु. प.

थोड्या दिवसांपूर्वीं ठाण्याच्या रेलवे स्टेशनावर एक बोहरी कांहीं छत्र्यांच्या पेट्या इंदुरास पाठवित असतां संशय आल्यावरून त्या फोडून पहातां आंत बंदुका व दारू निघाली. यावरून हीं हत्यारें होळकर सरकारानें मागविलीं असावींत, असें मुंबई ग्याझिटानें लिहिलें होतें त्यावरून सदहू हत्यारें होळकर सरकारानें मागविलीं नसून त्याशीं होळकर सरकारचा कांहींएक संबंध नाहीं असें सर टी माधवराव दिवाण यांनीं मुंबई ग्याझेटास पत्र लिहिलें आहे.

ट्रामवे कंपनीनें कुलाब्यापासून कोटापर्यंत व पायधुणीपासून कोटापर्यंत जाण्यास दोन आणे दर ठेविला आहे. ने. ओ.

## हिंदुस्थानांत गोऱ्यालोकांची वसाहत करण्याविषयीं खटपट.

अमेरिका, आस्ट्रेलिया वगैरे ठिकाणीं ज्याप्रमाणें इंग्लंड व ऐर्लंड आदिकरून युरोपांतल्या कांहीं देशांतील लोकांच्या वसाहती झाल्या आहेत त्याप्रमाणें हिंदुस्थानांत गोऱ्यालोकांनीं वसाहत करावी कीं नाहीं, हा विचार बहुत दिवसांपासून सुरू असून त्याचा अजून सरकारमार्फत निकाल झाला नाहीं. स्वदेशांत सुखप्राप्ती होऊन चरितार्थ चालत आहे तोंपर्यंत स्वदेश सोडून परदेशीं जाण्याची मनुष्यास इच्छा होत नाहीं. तेव्हां स्वदेश सोडून परदेशीं वसाहत करण्याकरितां जाणारांचा मुख्य उद्देश काय असावा हें लिहिणें नको. हिंदुस्थानांत विलायतच्या लोकांनीं वसाहत करावी असें ज्यांचें मत आहे, ते या देशीं वसाहत करण्याविषयीं मुख्य कारण असें दाखवितात कीं, या देशांत गोरे लोक पुष्कळ झाल्यापासून राज्यास मोठी बळकटी येईल व प्रसंगीं वसाहतींच्या लोकांची फौजेस मोठी मदत होईल. हिंदुस्थानांत वसाहत करूं नये असें ज्या साहेबांचें मत आहे ते आपल्या मताच्या पुष्टीकरणार्थ अशीं कारणें दाखवितात कीं, गोऱ्या लोकांची या देशांत वस्ती झाल्यापासून काळ्यालोकांस मोठा उपद्रव होईल व या देशांत वसाहत करून रहाणारे गोरे व काळे एक झाले असतां, कदाचित् अमेरिके प्रमाणें हिंदुस्थान इंग्लंडच्या हातून जाईल. गोरे व काळे एक होऊन विलायतच्या हातून हिंदुस्थान जाण्याच्या कालांतराच्या गोष्टी आहेत. हिंदुस्थानांत गोऱ्यांच्या वसाहती झाल्या तथापि असें होण्याचा संभव क्वचित आहे. परंतु वसाहती झाल्यापासून काळ्या लोकांस तूर्त अवर्णनीय उपद्रव होणार आहे यांत संशय नाहीं गोऱ्या लोकांची अमेरिकेंत वस्ती होण्या पूर्वीं त्या देशांत तेथील मूळच्या रानटी लोकांची बरीच मोठी वस्ती होती. परंतु गोऱ्यांच्या वस्ती पुळें त्यांची बहुतेक वस्ती नाहींशी झाली असून आतां, मूळच्या लोकांपैकीं अगदीं च थोडे लोक राहिले आहेत व तेही समूळ नाहींसे होण्याचा समय अगदीं जवळ आला आहे. गोऱ्या लोकांच्या वसाहती हिंदुस्थानांत झाल्यापासून असा प्रसंग आह्मा काळ्या लोकांवर आजलीच येणार आहे. असें जरी नाहीं ( कारण हिंदुस्थानची वस्ती फार मोठी आहे ) तथापि गोऱ्यांच्या वसाहतीपासून गोऱ्या काळ्यांच्या कलहास जास्त जागा होऊन कलहाचा परिणाम बहुतकरून काळ्यांस सोसावा लागणार आहे. इतकेंच कीं हिंदुस्थानांत गोऱ्यांच्या वसाहती होण्याचा प्रसंग ईश्वरानें आणूं नये म्हणजे झालें. या देशांत विलायतच्या लोकांनीं वसाहती कराव्यात कीं नाहीं या गोष्टीचा अजून सरकार मार्फत निकाल झाला नाहीं हें आह्मी वर लिहिलें आहेस. तथापि या देशीं वसाहत करण्याचा हेतु सिद्धीस नेण्याकरितां प्लिमथ शहरीं एक सभा स्थापन झाली असून तिणें या कामीं खटपट चालविली आहे. या सभेची तारीख १९ माहे मे रोजीं सभा भरली होती त्या वेळीं असा ठराव झाला कीं हिंदुस्थानांतील काम धंदे वाढावेत म्हणून त्या देशांत युरोपियन लोकांनीं वसाहती करण्याकडे सरकारानें लक्ष देणें महत्वाचें आहे म्हणून हिंदुस्थानचे सेक्रेटरी आवस्टेट मार्किस आव सालिसबरी यांच्याकडे अर्ज करावा. सभेचे अध्यक्ष यांणीं असें बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थानांत वसाहत करून चहा, रेशिम, ताग, वगैरे पदार्थांची लागवड वाढविल्यानें ब्रिटिश व्यापाऱ्यांचा फायदा होणार आहे, व विलायतेहून हिंदुस्थानांत वसाहत करणारे लोक नेणें, ते सरकारानें द्रव्याची मदत देऊन नेण्याविषयीं सभेनें खटपट केली आहे. याप्रमाणें वसाहत करण्याची तजवीज केली असतां, ती करणारांचा फायदा होऊन अखेर हिंदुस्थानचा व्यापार वाढणार आहे. ' स्वतःच्या फायद्याकरितां नसून केवळ हिंदुस्थानच्या फायद्याकरितां वसाहती होणार आहेत ' हें सभेचें म्हणणें सरकारानें मान्य केलें म्हणजे, विलायतेहून हिंदुस्थानांत वसाहतीकरितां येणारांचा सर्व आह्मास दावा काय होणार हें उघडच आहे! हे असो. परंतु प्रामाणिक, सुधारलेले व ख्रिस्तिधर्माचा अभिमान बाळगणारे असे जे विलायतेचे लोक, त्यांस, हिंदुस्थानच्या फायद्याच्या निमित्तानें या देशांत वसाहत करण्याकरितां येण्याप्रीत्यर्थ, सरकारची मदत मागण्याची यत्किंचितही शंका वाटत नाहीं हें पाहून आह्मास आश्चर्य व दुःख वाटतें. हिंदुस्थानांत गोऱ्यालोकांच्या वसाहती झाल्यापासून या देशाचा काहींमात्र फायदा नसून मोठें नुकसान आहे, या देशांत मनुष्यवस्ती इतकी वाढ झाली आहे कीं, ज्यांत पोटभर अन्न मिळण्याची पंचाईत झाली आहे दुष्काळानें तर या देशांत आपलें घरच केलें आहे. कोणास कामधंदा नाहीं म्हणून जिकडे तिकडे रडारड आहे. असें असतां व अमेरिका, आस्ट्रेलिया वगैरे देशांत युरोपिअन लोकांच्या मोठमोठाल्या वसाहती झाल्या असतां, हे लोक, या देशांतही, आपलीं घरें दारें करण्याची इच्छा ठेवितात. याबाबतींत लार्ड सालिसबरी यांस अर्ज करण्याविषयीं ज्या गृहस्थानें सूचना केली, त्यानें असें बोलून दाखविलें कीं, हिंदुस्थानांत कारागिर लोकांचा फार तोटा आहे. याकरितां हिंदुस्थानच्या खर्चानें त्या देशीं थोडे कारागिर लोक पाठविले असतां त्या देशाचा व्यापार वाढेल इतकेंच नाहीं परंतु ख्रिस्ति धर्माचा प्रसार होण्यास ही बरीच मदत होईल. ' ज्या प्रकारचे कारागिर लोक हल्लीं पाहिजे आहेत त्याप्रकारच्या कारागिरांचा तोटा आहे तर, काळ्या लोकांस कारागिरी शिकविली म्हणजे थोड्या खर्चांत हवे तितके मिळणार आहेत. परंतु असें करण्याचें एका इंग्रजाच्या तरी मनांत आहे काय? विलायतचे कारागिर या देशांत पाठविल्यापासून हिंदुस्थानचा व्यापार वाढत आहे तर, या देशांतच हे लोक तयार केल्यापासून व्यापार वाढणार नाहीं काय? परंतु तसें केलें तर सर्व भाताचा नैवेद्य करणं होईल? या देशाच्या स्वाभाविक प्रकारच्या संपत्तीकडे पाहून युरोपियन लोकांच्या तोंडास कसें पाणी सुटत आहे हें, या प्रसंगीं, मुंबईचे माजी इन्स्पेक्टर जनरल आव हास्पिटल डाकतर आर्किबाल्ड ग्रेहाम जें कांहीं बोलले त्यावरून लक्षांत येईल. हे म्हणाले कीं, आसामप्रांतांतील डोंगर, दार्जीलिंग, वायव्य प्रांतांतील गंगा व यमुनेमधील भाग वगैरे ठिकाणीं वसाहत करण्यासारखा सुंदर देश असून त्यांत वसाहती केल्यापासून फायदा होईल. नंतर यांणीं हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचें वर्णन करून असें सांगितलें कीं, कापूस, चहा, साखर, नीळ, ताग, रेशीम वगैरे अनेक पदार्थ हिंदुस्थानांत इतके उत्पन्न करितां येतील कीं या पदार्थांकरितां इंग्लंडास दुसऱ्या देशावर अवलंबून रहावें लागणार नाहीं. ने० ओ०

---

हें पत्र अकोला येथे संडेराव बाळाजी फडके यांनी व स० छा. छा. प. केलें.